अहवाल क्रमांक : १७०

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या वाशिम जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या लेख्यांवरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत**

## चोविसावा अहवाल

(सदर अहवाल दिनांक    जून, २०१९ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१९

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या वाशिम जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या लेख्यांवरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत

## चोविसावा अहवाल

## पंचायती राज समिति
## (सन २०१७-२०१८)

**समिति प्रमुख**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(५) ॲड. राहुल कुल, वि.स.स.
(६) श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.
(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(८) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.
(९) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.
(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.
(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.
(१७) प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स.
(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.
(२२) प्रा.डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.
(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.
(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित** :

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.
(२९) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय** :

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)
(२) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

## पंचायती राज समिती
## (सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिती प्रमुख**

१. *श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
५. श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.
६. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
७. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
८. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
९. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
१०. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.
१४. ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स.
१५. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१६. श्री. अमित झनक, वि.स.स.
१७. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१८. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
१९. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२०. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२१. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२२. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२३. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
२४. **रिक्त
२५. **रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी.

* सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजीपासून श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची 'कार्यकारी समिती प्रमुख ' म्हणून नामनियुक्ती केली आहे.

** सन्माननीय समिती प्रमुख श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त

## पंचायती राज समिती
## (सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.
३. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
५. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
६. श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.
७. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
८. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
९. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
१०. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१४. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.
१५. ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स.
१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१७. श्री. अमित झनक, वि.स.स.
१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. पांडुरंग फुंडकर; वि.प.स.
२२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय** :

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)
(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा चोविसावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता समिती दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी केले. समिती पध्दतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो  परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ  शकणार  नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पध्दतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र  योजना अस्तित्वात  आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय, योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय, योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुध्दा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पध्दत जोपासली आहे. या पध्दतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करुन आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करुन विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना

सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील

सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पध्दती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पध्दतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचाऱ्यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करुन ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे,

पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करुन काही चांगल्या बाबींचे समर्थन करुन संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०१२-१३ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुर्नविलोकन व सन २०१३-१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-१८ साठी गठीत झालेल्या समितीने वाशिम जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने वाशिम जिल्हा परिषदेस दिनांक १७, १८ व १९ जानेवारी, २०१८ रोजी भेट देऊन श्री. गणेश पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता गठीत झालेल्या समितीने वाशिम जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्दयांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक २ व २२ जानेवारी, २०१९ रोजी जिल्हा परिषद, वाशिम संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या, प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री. अनुप कुमार, प्रधान सचिव, कृषी व पदुम (पशुसंवर्धन) विभाग, श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. एकनाथ डवले, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्रीमती विनिता वेद सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. चंद्रशेखर जोशी, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, डॉ.सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. फु.स.मेश्राम, सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री. दिनेश डिंगळे, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. सु.नि.गावडे, सह सचिव, वने (भूसंपादन) विभाग, श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग, डॉ. प्रमोद शिंदे, उप सचिव, रोजगार हमी योजना विभाग, श्री. विजय चौधरी, उप सचिव, पशुसंवर्धन विभाग, डॉ.एस.एस.पंचपोर, अवर सचिव, पशुसंवर्धन विभाग, श्री. अ.प्र.अहिरे, अवर सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. विजयकुमार कलवले, सहाय्यक संचालक, मृद व जलसंधारण विभाग, तसेच श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेख्यांवरील लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या वाशिम जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्दयांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २६ फेब्रुवारी, २०१९.

**सुधीर पारवे**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| अ. क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | परिच्छेद क्रमांक (४) | पृष्ठ क्रमांक (५) |
|---|---|---|---|---|
| (१) | एक | जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता १ ते ४ थी मधील अनुसूचित जाती, जमातीच्या विद्यार्थ्यांना विशेष सुविधा अंतर्गत गणवेश व लेखन साहित्य पुरवठा करण्यासाठी केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत (सन २०१२-१३) | ३.१८०/३ | १ |
| (२) | दोन | साठवण तलाव माळेगांव नजिक किन्ही येथील साठवण तलाव बांधकाम खर्चातील अनियमिततेबाबत (सन २०१२-१३) | ३.४५१/७ | ९ |
| (३) | तीन | पाझर तलाव दुधखेडा बांधकामातील अनियमिततेबाबत (सन २०१२-१३) | ३.४५२/११ | १६ |
| (४) | चार | अनुसूचित जाती/नवबौध्द लाभार्थ्यांना विशेष घटक योजनेंतर्गत ७५ टक्के अनुदानावर दुधाळ जनावरे गट पुरविणेबाबत (सन २०१२-१३) | ३.७४९ | २२ |
| (५) | पाच | २०% जिल्हा/वन महसूल निधी अंतर्गत मागासवर्गीयांना पेट्रोकेरोसिन इंजिन पुरविणेबाबत (सन २०१२-१३) | ३.८९०/२ | २८ |
| (६) | सहा | ग्रामपंचायत चांडस ता.मालेगांव अंतर्गत दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत मर्यादेपेक्षा जास्त अनुदान देण्यातील अनियमिततेबाबत (सन २०१२-१३) | ३.८९३/६ | ३२ |
| (७) | सात | तेराव्या वित्त आयोगाच्या निधीतून केलेल्या बांधकाम खर्चातील अनियमिततेबाबत (पंचायत समिती कारंजा) (सन २०१२-१३) | ४.१६७/१८ | ३६ |
| (८) | आठ | खाजगी विहिर/बोअर अधिग्रहण मोबदला रक्कमेचे जादा प्रदानाबाबत (पंचायत समिती, मंगरुळपीर) (सन २०१२-१३) | ४.२३०/८ | ४० |
| (९) | नऊ | लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणेबाबत (सन २०१२-१३) | | ४२ |
| (१०) | दहा | सर्वसाधारण शिफारशी | | ५२ |
| | | **परिशिष्ट (‘अ’ व ‘ब’) शासनाचे आदेश व परिपत्रके आणि समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त** | | |

## प्रकरण एक

## जिल्हा परिषद, वाशिम

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता १ ते ४ थी मधील अनुसूचित जाती, जमातीच्या विद्यार्थ्यांना विशेष सुविधा अंतर्गत गणवेश व लेखन साहित्य पुरवठा करण्यासाठी केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.१८०/३ (सन २०१२-१३)**

शिक्षण विभागात विविध लेखाशिर्षाखाली प्राप्त अनुदानापैकी २०% रुपये ८,६४,१५०/- हे जिल्हा स्तरावर खर्च करण्यात आले त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) जिल्हाधिकारी सदस्य सचिव, नियोजन समिती वाशिम यांचे स्तरावरुन सन २०११-१२ मधील अखर्चित अनुदान सन २०१२-१३ मध्ये खर्ची टाकणेबाबत जिल्हा परिषद वाशिम स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ०२ (१) दिनांक ०२ फेब्रुवारी, २०१३ अन्वये मागील वर्षातील अखर्चित निधी खर्च करण्यास मंजुरी घेवून मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश क्रमांक ५९८/२०१३/दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१३ अन्वये तात्रिक मंजुरी प्रदान करण्यात आली. जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत अनुदान प्राप्त झाले असतांना त्यांचे स्तरावरुन खर्चास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

२) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम १५३(१) अन्वये व पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार करारनामा करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

३) महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय क्रमांक भा.ख.सं.१०८८/ (२५१२)/उद्योग ६, मंत्रालय, मुंबई दिनांक ०२ जानेवारी, १९९२ मधील परि.८.४ मधील तरतुदीनुसार साहित्याच्या मालाच्या दर्जाविषयी तपासणी करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. पुरवठा आदेशातील अट क्रमांक ७ नुसार साहित्याची चाचणी झाल्यानंतर देयकाचे प्रदान करण्यात यावे. परंतु विभागाने साहित्याच्या चाचणी अहवालाची १० % रक्कम रुपये ६८,८४१/- रोखून ठेवण्यात आल्याचे दिसून आले त्यामुळे पुरवठादाराचे स्तरावरुन चाचणी केली नाही असे निदर्शनास येते.

४) देयकानुसार दिनांक २२/०३/२०१३ रोजी मालाचा पुरवठा करण्यात आल्याचे दिसून येते. साठा नोंदवहीला पृष्ठ क्रमांक ३३० वर साहित्याची नोंद घेण्यात आली परंतु दिनांक नमूद नाही. करिता शैक्षणिक सत्र सुरु होण्यापूर्वी साहित्य प्राप्त झाल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

५) पंचायत समिती निहाय पुरवठादाराचे स्तरावरुन साहित्य वितरीत करण्यात आले. परंतु साठा नोंदवहीला दिनांक नमुद करण्यात आला नसल्यामुळे शैक्षणिक सत्र सुरु होण्यापूर्वी शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले नसल्याची बाब सकृत दर्शनी निदर्शनास येते. सबब योजनेचा उद्देश सफल झाला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) सन २०११-१२ मधील गणवेश व लेखन साहित्य जिल्हा वार्षिक योजनेच्या निधी वितरण आदेश क्रमांक नियोजन/ कक्ष-१५/जिवायो/२०११-१२/३०४ अन्वये जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे.

शासन निर्णय क्रमांक जिवायो १००७/प्र.क्र.३९/का.१४४४ दिनांक १६ फेब्रुवारी, २००८ (परिशिष्ट क्र. १.१) अन्वये जिल्हा वार्षिक योजनेच्या कामांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार मंत्रालयीन विभागाच्या कार्यान्वयीन यंत्रणेस देण्यात आले आहेत. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांनी आदेश क्रमांक जाक्र/जिपवा/प्राशि/आस्था/गणवेश व लेखन/३९८/२०१३ दिनांक ६ फेब्रुवारी, २०१३ नुसार तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे.

२) संबंधित पुरवठादार संस्थेने अटी व शर्ती मान्य असल्याबाबत पुरवठा आदेशाच्या कार्यालयीन स्थळप्रतीवर लिहून दिले आहे. सोबत रु. १००/- चा कोरा मुद्रांक दिला आहे. सदर अभिलेखे दप्तरी उपलब्ध आहेत.

३) पुरवठादाराने केलेल्या साहित्याची तपासणी करण्यात आलेली आहे. सदर तपासणी अहवाल दप्तरी उपलब्ध आहे. दरकरारातील अटी व शर्तीनुसार ९०% रक्कम माल पुरवठा केल्यानंतर व उर्वरित १०% रक्कम अटी व शर्तीनुसार मालाच्या गुणवत्तेची खात्री पटल्यानंतर प्रदान करण्यात आली.

४) व ५) पंचायत समिती निहाय लेखन साहित्य पुरविल्याचा दिनांकाबाबतचा तपशिल खालीप्रमाणे आहे :—

| अ.क्र. | पंचायत समिती | लेखनपाटी संख्या | पंचायत समिती प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| १) | वाशिम | ६९०० | ३०/०३/२०१३ |
| २) | मालेगांव | ७६०० | १६/०४/२०१३ |
| ३) | रिसोड | ७५५० | ३०/०३/२०१३ |
| ४) | मंगरुळपीर | ६६०० | ३१/०३/२०१३ |
| ५) | मानोरा | ५३७० | २८/०६/२०१३ |
| ६) | कारंजा | ५४४१ | ३०/०३/२०१३ |
| | एकूण | ३९४६१ | |

साहित्याची नोंद साठा पुस्तक नमुना ३३ मध्ये पान क्र. ९९ वर घेण्यात आली असुन पंचायत समिती स्तरावर लेखन पाटी साहित्याचा पुरवठा आदेशातील अटी व शर्ती नुसार दोन तालुक्यात विलंबाने पुरवठा झाला आहे.

परंतु शैक्षणिक सत्राआरंभी शाळास्तरावर साहित्याचे वाटप करण्यात आले असुन त्याबाबतचे गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती यांचे प्रमाणपत्र दप्तरी उपलब्ध आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

वाशिम जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, लेखी स्पष्टीकरणातील पृष्ठ क्रमांक १३ वर शासन निर्णय क्रमांक जिवायो १००७/प्र.क्र.३९/का.१४४४, दिनांक १६ फेब्रुवारी, २००८ अन्वये जिल्हा वार्षिक योजनेच्या कामांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार मंत्रालयीन विभागाच्या कार्यान्वयीन यंत्रणेस देण्यात आले आहेत. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तांत्रिक मान्यता दिली आहे. समितीचा मूळ प्रश्न असा आहे की, मुख्य कार्यकारी अधिकारी तांत्रिक अधिकारी आहेत का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीस विदित केले की, यासंबंधी शिक्षणाधिकारी खाते प्रमुख आहेत.

यावर पुढे समितीने अशी विचारणा केली की, खातेप्रमुख शिक्षणाधिकारी असल्यामुळे त्यांना तांत्रिक मंजुरीचे अधिकार आहेत. परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुरवठा आदेश दिला व त्याकरिता झालेला खर्च जिल्हा परिषदेच्या खात्यातून करण्यात आला. लेखी स्पष्टीकरणामध्ये दिलेली माहिती दिशाभूल करणारी आहे. यावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, लेखी स्पष्टीकरणात नमूद केलेला नियम हा नियोजन विभागाशी संबंधित आहे. यावर पुढे समितीने अशी विचारणा केली की, नियोजन विभागाच्या शासन निर्णयात ३.२ मध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्थांकडे प्राप्त होणारा निधी प्रचलित पध्दतीनुसार खर्च करण्याचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थांना राहतील. शासनाचे प्रतिनिधी म्हणून आपल्याला या सर्व गोष्टींची माहिती असणे अत्यावश्यक आहे. आता आपल्याला या सर्व गोष्टींना सामोरे जावे लागेल. यावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस आश्वासित केले की, ही बाब तपासून घेण्यात येईल. यावर यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीस विदित केले की, ३.२ नुसार प्रचलित पध्दतीनुसार प्रशासकीय मान्यतेचे अधिकाराचे स्तर ठरवून दिलेले आहेत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ज्या विभागाकडून प्रशासकीय मान्यता दिली जाते त्याच विभागाकडून तांत्रिक मान्यता दिली जाते. परंतु सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तांत्रिक मान्यता दिली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीस विदित केले की, नियम ३.२ नुसार प्रचलित पध्दतीने प्रशासकीय मान्यतेचे अधिकार दिलेले आहेत.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिली आहे. हे दोन्ही आदेश एकत्रित काढले आहेत काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीस विदित केले की, हे दोन्ही आदेश वेगवेगळे काढले आहेत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, प्रशासकीय मान्यता विभागाची होती. तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार खाते प्रमुखांना आहेत. या प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तांत्रिक मान्यता दिली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय प्रमुख आहेत. जिल्हा परिषदेची व्यवस्था सुरळित चालते किंवा नाही हे पाहण्यासाठी त्यांना शासनाने पाठविले आहे. करारनामा करण्यात आलेला नाही काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीस विदित केले की,पुरवठा आदेशाच्या अटी व शर्ती १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर लिहून दिलेल्या नाहीत.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, करारनाम्याच्या अटी व शर्तीची प्रत देखील अनेक मुख्याध्यापकांकडे नसते. अनेक ठिकाणी गणवेशाचे वाटप विलंबाने झाले आहे. १०० रुपयाच्या स्टॅम्पपेपरवर लिहून दिले म्हणजे आपली जबाबदारी संपते काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीस विदित केले की, करारनामा करावयास पाहिजे होता. ही बाब तपासून मी समितीला अहवाल सादर करतो. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, यासंदर्भातील तपासणी अहवाल कोणी सादर केला आहे. तपासणीचा अहवाल लेखा परिक्षण करतेवेळी का सादर केला नाही.यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीस विदित केले की, तपासणीचा अहवाल Superintendent Company of pvt Ltd. मुंबई यांनी दिलेला आहे. दिनांक ३० मार्च, २०१३ रोजी सदर अहवाल प्राप्त झालेला आहे.

यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी समितीस माहिती दिली की, १० टक्के रकमेच्या कामांची छाननी करण्यात येते असल्यामुळे १० टक्के तपासणी वेळच्या वेळी करणे आवश्यक आहे. समितीने असे मत व्यक्त केले की, नमुन्याचा चाचणी अहवाल न घेता अन्नधान्य वाटप कसे काय करण्यात आले आहे. चाचणी अहवाल येण्याअगोदर ९० टक्के रक्कम कंत्राटदार घेऊन टाकतो, ही अत्यंत वाईट सवय आहे. विभागाकडून १० टक्के मालाचा तपासणी अहवाल न घेता पुढील कार्यवाही करण्यात येते हे अतिशय चुकीचे आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीस विदित केले की, तपासणी अहवाल दिनांक ३० मार्च, २०१३ रोजी आला होता व दिनांक ३१ मार्च, २०१३ रोजी देयक अदा करण्यात आले आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, गणवेशाचा पुरवठा केव्हा झालेला आहे. यावर प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस विदीत केले की, केंद्र प्रमुख व गट शिक्षणाधिकारी यांनी माहे जून, २०१३ मध्ये गणवेशाचे वाटप केले आहे. माहे मार्च, २०१३ मध्ये पुरवठा झाल्यामुळे सन २०१२-१३ चे साहित्याचे वाटप सन २०१३-१४ मध्ये करण्यात आले आहे. सन २०१३-१४ मध्ये निधी आला होता त्यामुळे त्या वर्षात वाटप करण्यात आले आहे. दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१३ पासून गणवेश व इतर साहित्याचा पुरवठा करणे ही योजना बंद केली होती. सन २०१३-१४ मध्ये लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता असल्यामुळे खरेदी करण्यात आली नाही. गणवेश व इतर साहित्य देण्यात आले नाही. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २०१२-१३ चे अनुदान सन २०१३-१४ मध्ये खर्च करण्यात आले आहे काय, यावर प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस विदीत केले की, माहे मार्च महिन्यात खरेदी करण्यात आली. साहित्याचे वाटप सन २०१३-१४ मध्ये करण्यात आले. सन २०१३-१४ मध्ये निधी आला होता. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी समितीस माहिती दिली की, सन २०११-१२ मध्ये गणवेश साहित्याची रक्कम सन २०११-१२ मध्ये खर्च झाली. सन २०१२-१३ ची रक्कम सन २०१३-१४ मध्ये खर्च केली त्यामुळे सन २०११-१२ मध्ये साहित्याचे वाटप झाले नाही. ही मूळ रक्कम सन २०११-१२ ची होती. सन २०११-१२ चा निधी दिनांक ३१ मार्च, २०१२ मध्ये मंजूर झाला होता. त्यामुळे सन २०११-१२ मध्ये खर्च होऊ शकला नाही. त्यामुळे सन २०१२-१३ मध्ये सदर खर्चास मान्यता घेऊन सन २०१३ मध्ये रक्कम खर्च करण्यात आली आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हापरिषदेमध्ये अखर्चित निधी असतो. ३१ मार्च, २०१२ रोजी निधी आलेला नाही. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, दिनांक ३१ मार्च, २०१२ रोजी पुरवठा आदेश दिले व दिनांक ३१ मार्च रोजी वाटप केले. त्यामुळे दिनांक १ एप्रिल, २०१३ पासून ही प्रक्रिया सुरु करण्यात आली होती काय, दिनांक ३१ मार्च २०१२ रोजी निधी आला दिनांक १ एप्रिल, २०१२ ते ३१ मार्च २०१३ हे आर्थिक वर्षे होते. कार्यरंभ आदेश (वर्क ऑर्डर) फेब्रुवारी महिन्यात देण्यात आला आहे. यावर प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस विदित केले की, सन २०१२-१३ चे वाटप करण्यासाठी दिनांक २ फेब्रुवारी २०१३ रोजी स्थायी समितीची मान्यता घेण्यात आली होती.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, दिनांक ३१ मार्च २०१२ रोजी निधी आला त्यानंतर त्या निधीचे नियोजन करावयास पाहिजे होते. जानेवारी व फेब्रुवारी महिन्यात विषय समितीमध्ये ठराव मंजूर करुन घ्यायला पाहिजे होता. ११ महिन्यानंतर सदर विषय स्थायी समितीमध्ये सादर करण्यात आला असून मंजूरी घेण्यात आली होती. यासाठी विलंब करण्यात आलेला आहे. प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या म्हणण्यानुसार ऑक्टोबर महिन्यापासून आचारसंहिता लागू झाली होती. माहे नोव्हेंबर महिन्यात आचारसंहिता होती. स्थायी समितीची मान्यता फेब्रुवारी महिन्यात घेण्यात आली होती. नियमानुसार कोणतीच कार्यवाही करण्यात आल्याचे दिसून येत नाही. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता १ ते ४ मधील अनुसूचित जाती, जमातीच्या विद्यार्थ्यांना विशेष सुविधे अंतर्गत गणवेश व लेखन साहित्य पुरवठा करणे खर्चातील अनियमिततेबाबत सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. वेळेत विद्यार्थ्यांना गणवेश व इतर साहित्याचे वाटप होणे आवश्यक होते. सन २०१३-१४ च्या साहित्याचे वाटप वेळेत न करणे, तपासणी अहवाल लेखा परिक्षणाच्या वेळी न दाखविणे, अशा या सर्व अनियमितता झालेल्या आहेत, याबाबत सविस्तर चौकशी करुन समितीला एक महिन्याच्या आत अहवाल सादर करण्यात यावा तसेच या विषयाबाबत संबंधित सचिवांची साक्ष समितीकडून घेण्यात येईल असे समितीने निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता १ ते ४ मधील अनुसुचित जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांना विशेष सुविधेअंतर्गत सन २०१३-१४ मधे गणवेश व लेखन साहित्य पुरवठा वेळेत पुरवठा न करणे आणि तपासणी अहवाल लेखा परिक्षणाच्या वेळी सादर न करण्याची कारणे काय आहेत, या बाबत जबाबदार असणाऱ्या संबधित अधिकारी/ कर्मचारी यांचेविरुध्द नियम ७ अन्वये कोणती कारवाई करण्यात आली ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

खरेदी करण्यात आलेल्या साहित्याचा पुरवठा संबधित पुरवठादाराने खालीलप्रमाणे पंचायत समितीस्तरावर केलेला आहे.

| अ.क्र. | पंचायत समिती | पुरवठा करण्यात आलेले साहीत्य संख्या | पुरवठा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | वाशिम | ६९०० | ३०.०३.१३ | वेळेवर पुरवठा |
| २) | मालेगाव | ७६०० | १६.०४.१३ | २ आठवडे विलंब |
| ३) | रिसोड | ७५५० | ३०.०३.१३ | वेळेवर पुरवठा |
| ४) | मानोरा | ५३७० | २८.०६.१३ | १२ आठवडे विलंब |
| ५) | मंगरुळपीर | ६६०० | ३१.०३.१३ | वेळेवर पुरवठा |
| ६) | कारंजा | ५४४१ | ३०.०३.१३ | वेळेवर पुरवठा |
| | एकूण | ३९४६१ | | वेळेवर पुरवठा |

त्यापैकी मालेगाव २ आठवडे व मानोरा १२ आठवडे एवढा कालावधी उशीराने पुरवठा केलेल्या एकूण मालाच्या विलंबाबाबत दंड आकारणी रुपये ७५७९/- पुरवठादाराकडून वसूल करण्यात आली आहे .

पुरवठा करण्यात आलेल्या साहित्याची तपासणी करण्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्रं.जिपवा / शिप्रा /लेसा /११२३/२०१२-१३ दिनांक २२ मार्च २०१३ अन्वये दि.सुपरिटेन्डस कंपनी ऑफ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या (शासनमान्य) कंपनीला पत्र देण्यात आले होते. त्यानुसार साहित्याचा तपासणी अहवाल दिनांक ३० मार्च २०१३ रोजी प्राप्त झाला होता. साहित्याचा दर्जा चांगला असल्याबाबत प्रमाणित केल्यावरुन साहित्य पुरवठा करण्यात आले आहे. साहित्याच्या तपासणी बाबत अहवाल सुध्दा दप्तरी उपलब्ध असुन, सन २०१२-१३ च्या लेखा परिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यामुळे या बाबत संबधित असणा-या जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द नियम ७ अन्वये कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. करीता अनुपालन मान्य करण्यात यावे ही विनंती.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, वाशिम यांच्या अभिप्रायाशी सहमत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने वाशिम जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीला प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी माहिती दिली की, पूर्वी ८०:२० या प्रमाणावर आपण गणवेश व लेखन साहित्याचा पुरवठा करीत होतो. जेवढा निधी मिळेल त्याच्या ८० टक्के गणवेशावर व २० टक्के लेखन साहित्यावर असे ते होते. यामध्ये दर करार देण्यात आला होता. जिल्हा परिषदेने आदेश दिले. परंतु, पुरवठादाराकडून दोन तालुक्यांमध्ये उशीर झाला होता. मालेगावमध्ये २ आठवडे तर मानोरामध्ये १२ आठवडे उशिराने पुरवठा झाला होता. कार्यरंभ आदेशामध्ये जी तारीख होती त्यापेक्षा उशिरा पुरवठा केला तर करारामध्ये अशी अट होती की, प्रत्येक आठवड्याच्या विलंबाकरिता किंमतीच्या ०.५ टक्के इतकी रक्कम त्यांना दंड आकारावयांची होती. त्यानुसार त्यांना दंड आकारण्यात आलेला आहे. एकूण ७५७९/- रुपयांचा दंड झाला. हा दंड तसे पाहिले तर कमी दिसतो कारण फक्त दोन तालुक्यामध्ये उशीर झाला होता. एका तालुक्यात २ आठवडे तर दुसऱ्या तालुक्यामध्ये १२ आठवड्यांचा उशीर झाला होता. प्रत्येक आठवड्यासाठी ०.५ टक्के या प्रमाणे दंडाची तरतूद होती. तसा दंड त्यांनी त्यांच्याकडून वसूल केलेला आहे. बाकी लोकांना त्याने कार्यरंभ आदेशामध्ये नमूद केलेल्या वेळेप्रमाणे पुरवठा केला होता. त्या पुरवठादारावर दंडाबाबतची कारवाई करण्यात आलेली आहे.

विभागाने दिलेल्या माहितीमध्ये असे नमूद केले आहे की, याबाबत संबंधित असणाऱ्या जबाबदार अधिकारी, कर्मचारी यांच्या विरुध्द नियम ७ अन्वये कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. अनुपालन मान्य करण्यात यावे, असे विभागाने सांगितले त्यांच्यावर कारवाई केली. मात्र विभागाने दिलेल्या माहितीमध्ये कारवाई करण्यात आली नाही, यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की,

पुरवठादाराने उशिरा पुरवठा केला होता. गणवेश खरेदी प्रक्रियेसाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम ठरवून दिला होता तद्‌नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, कालबध्द कार्यक्रम ठरवून दिला असेल तर शिक्षण अधिकाऱ्यांच्या स्तरावर हे पैसे किती दिवस पडून होते, किती दिवसांत ते शाळेला द्यायचे होते, शाळेला पैसे दिल्यानंतर शाळा समितीने किती दिवसांत गणवेश खरेदी करायची होती, तेवढ्या दिवसांत पुरवठा आदेश दिले होते काय, हे तपासणे आवश्यक आहे नसल्यास शाळा समिती किंवा मुख्याध्यापक जबाबदार असतील. मुख्याध्यापकांना पैसे दिले नसतील तर शिक्षण अधिकारी जबाबदार असतील, हे सर्व उपस्थित झालेले मुद्दे तपासले पाहिजेत. शासनाने कालबध्द कालावधी ठरवून दिला असेल की, एवढ्या कालावधीत मुलांना गणवेश मिळाले पाहिजेत आणि त्या कालावधीत मुलांना ते मिळत नसतील व त्याकरिता फक्त एका पुरवठादाराला दोषी धरत असू म्हणजे अंतिम टप्प्यामध्ये त्याला १५ दिवसांचा कालावधी देतो व त्या १५ दिवसांच्या कालावधीत पुरवठा केला नाही म्हणून त्याला दंड आकारणी करतो. आपल्याला पुरवठा आदेश किती दिवसांत करायचा होता, कुठल्या महिन्यापर्यंत करायचा होता, याबाबतचा कालबध्द कार्यक्रम शासनाने ठरवून दिला आहे, त्या कालबध्द कार्यक्रमाप्रमाणे जर कार्यवाही झाली नसेल तर, सर्वच दोषी असतील. यामध्ये कुठेही कालबध्द कार्यक्रमाप्रमाणे कार्यवाही झालेली दिसत नाही.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदीत केले की, पुरवठा आदेश दिल्यानंतर जो काही उशीर झाला त्याबद्दल पुरवठादारावर जी कारवाई करणे अपेक्षित होते ती करण्यात आली. परंतु, ही वस्तुस्थिती आहे की, त्यांना जो आदेश दिला होता त्या प्रमाणे त्यांनी पुरवठा आदेश देण्यामध्ये उशीर केलेला आहे असे अभिलेख्यावरुन दिसते.यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, त्या शाळेकडे पैसे किती दिवसांत आले, त्यांनी प्रक्रिया किती दिवसात केली म्हणजे निविदा केव्हा काढली, निविदा भरायला किती मुदत दिली होती. कालबध्द कार्यक्रमानुसार कार्यवाही केली आहे काय, यावर समितीने असे मत व्यक्त केले की, दर करारवर होते त्यांच्या नेमणूकीबाबत वगैरे कोणत्याही प्रकारच्या अनियमिततेचे काही कारण नाही.

यावर समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेकडे पैसे केव्हा प्राप्त झाले, ते किती दिवसांत शाळांना वितरीत करायचे होते, त्या कालावधीत ते वितरीत करण्यात आले आहेत काय, त्या कालावधीत जर ते वितरित केले गेले नसतील तर ती जबाबदारी शिक्षण अधिकाऱ्यांवर निश्चित केली पाहिजे किंवा शिक्षण अधिकाऱ्यांनी नस्ती सादर केली व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सही केली असे काही आहे काय, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सही केली किंवा मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी पैसे वितरित केले नाहीत का, निधी वितरण आदेश मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना उशिरा मिळाले आहेत काय, यावर सह सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, माहे मार्च, २०१२ मध्ये जिल्हा परिषदेकडे निधी प्राप्त झालेला आहे. माहे मार्च, २०१३ मध्ये याबद्दलचे आदेश देण्यात आले.

तद्‌नंतर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, ही वस्तुस्थिती आहे की, त्यांनी उशिरा कार्यरंभ आदेश दिले त्याबाबतचा उहापोह या उत्तरामध्ये नाही. पुरवठा आदेश दिल्यानंतर पुरवठादाराने जो उशीर केला त्याबाबतचा उहापोह या उत्तरामध्ये आहे त्यांनी पुरवठादाराने उशीर केल्याबाबत दंड केला त्याबाबतचे उत्तर दिलेले आहे. जिल्हा परिषद स्तरावर कार्यारंभ आदेश देण्यास जो उशीर झाला, त्याबाबतचा उहापोह यामध्ये दिसत नाही, ही वस्तुस्थिती आहे. पुरवठादाराने जो उशीर केला त्याबद्दल कारवाई केली यावर समितीने असे मत व्यक्त केले की,तेवढे दिवस गणवेशाचा पुरवठा केला नसेल असा त्याचा अर्थ होऊ शकतो किंवा शिलाई झाली नसेल हे देखील कारण असू शकते. वर्षभर मुलांचे पैसे ठेवले. ठरवून दिलेल्या कालबध्द कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली नसेल तर कोणावर कारवाई करण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात येते, खाते प्रमुखांवर कायद्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आहे, त्यांच्याकडे दुर्लक्ष आहे. शेवटच्या माणसावर कारवाई होते परंतु, ज्यांनी खरे तर त्याची अंमलबजावणी केली पाहिजे ते करीत नाहीत त्यांच्यावर कारवाई होणे आवश्यक आहे.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, माहे मार्च, २०१२ मध्ये पैसे देण्यात आले. राज्य सरकारची कोणतीही दिरंगाई झाली नाही. जिल्हा परिषदेला पैसे मिळाल्यानंतर कार्यारंभ आदेश देण्यासाठी जो काही ७-८ महिन्यांचा कालावधी घेतला या उशिराबाबतचा उहापोह उत्तरामध्ये नाही. समितीची परवानगी असेल तर शिक्षण विभागातर्फे याच्याबद्दल पुन्हा तपासणी करुन घेतील की, या आठ महिन्यांच्या उशिरासाठी कोण जबाबदार आहेत, समितीने पुढे अशी विचारणा केली की, हे सर्व पाहण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून आहे, विविध कामांकरिता विविध लेखाशिर्षाअंतर्गत जो निधी प्राप्त होतो त्याबाबत बैठका वगैरे घेतल्या जातात, १-१ वर्ष पैसे पडून राहत असतील तर ज्याच्याकडे ते पैसे वर्ग केले जातात, ज्याच्याकडे ते लेखाशिर्ष आहे त्यांनी केले नसेल तर त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, ही चूक मान्य आहे की, जिल्हा परिषदेमध्ये जे ८-९ महिने जादा लागले ते लागायला नको होते. त्याबाबतचा उहापोह यामध्ये नाही त्यामध्ये जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही. एकदा कार्यारंभ आदेश दिल्यानंतर पुरवठादाराने जो उशीर केला, त्याबाबत त्याच्यावर कारवाई करण्यात आली. समितीची परवानगी असेल तर मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असे आदेशित करु शकतो की, माहे मार्च, २०१२ मध्ये विभागाने पैसे पाठविले व दर करार त्या ठिकाणी होता त्यानंतर जिल्हा

परिषद पातळीवर जो काही विलंब लागला त्याबाबतची जी काही जबाबदारी आहे त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सन २०१२-२०१३ मध्ये जे कोणी अधिकारी होते त्यावेळी जी वस्तुस्थिती असेल तो अहवाल त्यांनी चौकशी प्रमाणे दाखल करावा तो समितीला सादर करण्यात येईल सर्वच योजनेत विभागाकडे जेवढे आक्षेप येतात त्यामध्ये जबाबदारी जिल्हा परिषदेच्या खाते प्रमुखांची आहे. खालच्या लहान कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येते. इतके दिवस पैसे पडून राहिले त्याकरिता विभागाने शिक्षण अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली, यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जो काही महिन्यांचा उशीर लागला, त्याबाबतचे विश्लेषण करुन समितीला सादर करावे.

सदरहू विश्लेषणाचा अहवाल केलेल्या कारवाई सहित समितीस सादर करावा. तेव्हाचे पदभार असलेले अधिकारी सेवानिवृत्त झाले असतील. त्यांच्या कक्षात जे अधिकारी असतील त्यांनी विहित कालावधीत नस्ती पुढे पाठविली नाही. त्यांनी शासन निर्णयाचे वाचन का केले नाही, हे खाते प्रमुखांनी पहायचे नाही काय, यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, हे सर्व त्यांच्या चौकशीमध्ये येईल.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, यामुळे समितीचे समाधान होणार नाही. त्यावेळेस जे दोन अधिकारी होते ज्यांच्याकडे हा कार्यभार होता, त्याबाबत समितीला अशी माहिती दिलेली आहे की, ते दोन्ही अधिकारी गेल्या ६ वर्षांमध्ये सेवानिवृत्त झालेले आहेत. मात्र एक समाधान आहे की, पुन्हा असे होणार नाही कारण आता पैसे थेट एस.एम.सी.कडे पाठविले जात आहेत. मध्यंतरी आपण १ वर्ष डी.बी.टी. करुन लोकांच्या खात्यामध्ये पैसे जमा करण्याचा प्रयोग केला होता. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, दिनांक ३१ मार्चला प्रत्येक जिल्हा परिषदेचा किती रुपये निधी शिल्लक आहे हे जर ग्रामविकास विभागाने ऑनलाईन पाहिले तर, ग्रामविकास विभागाकडे १० मिनिटांत पूर्ण राज्याचे अभिलेखे येऊ शकतात. लेखन साहित्य व गणवेशासाठी दिनांक २२ मार्च, २०१२ रोजी पैसे दिले. ते पैसे दिनांक ३१ मार्चपर्यंत खर्च करणे अपेक्षित नव्हते परंतु, जूनमध्ये शाळा सुरु होण्यापूर्वी हे लेखन साहित्य व गणवेश मुलांना पुरविणे अपेक्षित आहे. साधारणपणे दिनांक १५ ते २२ जून दरम्यान शाळा सुरु होतात. त्यापूर्वी गणवेश व लेखन साहित्य पुरविणे अपेक्षित होते. दिनांक २२ मार्चला पैसे मिळाले ते माहे एप्रिलच्या पहिल्या आठवड्यामध्ये कार्यारंभ आदेश देऊ शकले असते परंतु, त्यावेळेस जिल्हा परिषदेकडे पूर्ण वेळ अधिकारी नव्हते आणि जे अधिकारी होते व ज्यांची जबाबदारी होती ते सध्या सेवानिवृत्त झाले आहेत. परंतु आता यंत्रणेमध्ये प्रगती झाली आहे ती फक्त माहितीसाठी सांगत आहे. पुढे समितीने असे मत व्यक्त केले की, एक वर्षाचा कालखंड झाल्यावरही तो निधी पडून राहिला. त्याचा उल्लेख यामध्ये नाही. त्या विद्यार्थ्यांना गणवेश व इतर लेखन साहित्यापासून वंचित ठेवण्याचे काम झालेले आहे, असे दिसून येत आहे. संपूर्ण राज्यामध्ये अशाच पध्दतीने विद्यार्थ्यांना गणवेश व लेखन साहित्यापासून वंचित राहावे लागत आहे भविष्यात अशा प्रकारे विलंब होऊ नये याकरिता मार्गदर्शक तत्वे ठरवून दिली आहेत त्यांची अंमलबजावणी झाली पाहिजे. परंतु यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा संबंधित अधिकारी कार्यवाही करीत नसल्यास ते देखील कारवाईसाठी पात्र ठरु शकतात. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी भरारी पथक तयार करुन कामांची पाहणी केली पाहिजे. त्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महिन्याला आढावा घेऊन खाते प्रमुखांच्या बैठका घेतल्या पाहिजे. त्यामध्ये निधी अखर्चित राहिला असल्यास तो निधी का अखर्चित राहिला हे पाहण्याची मुख्य कार्यकारी अधिकारी यांची जबाबदारी आहे. यासंदर्भात राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये शासन स्तरावरुन पत्रक काढून कळविण्यात यावे. तसेच सदर बाबींचा त्याच स्तरावर निपटारा झाला पाहिजे. सदर बाबीवर वेळीच निपटारा न झाल्याने यासंदर्भात समितीच्या बैठकीमध्ये विनाकारण चर्चा होऊन समितीचा अमूल्य वेळ वाया जात असतो. पुरवठादारावर करण्यात आलेली दंडात्मक कारवाई पुरेशी आहे काय हे देखील तपासून पाहण्यात यावे.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, एकूण माल पुरवठयाच्या विलंबाबाबत पुरवठादाराकडून ७ हजार रुपयांपर्यंत दंड आकारणी करण्यात आली. तसेच या संदर्भात अशा अटी व शर्ती आहेत की, मालाचा पुरवठा करण्यास विहित कालावधीनंतर जेवढे आठवडे विलंब झाला असेल त्या प्रत्येक आठवडयाकरिता एकूण मालाच्या किंमतीच्या ०.५ टक्के यानुसार दंडाची रक्कम आकारावी. पुरवठादाराने मालेगाव तालुक्यात २ आठवडे व मानोरा तालुक्यात ६ आठवडे वगळता उर्वरित सर्व तालुक्यांमध्ये वेळेवर मालाचा पुरवठा केला होता. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, या संदर्भात नियमानुसार दंडात्मक कारवाई करुन पुरवठादाराकडून वसुली केली पाहिजे. या संदर्भात समितीला दिलेले उत्तर समाधानकारक नाही. तसेच ज्या अधिकाऱ्याने दंड आकारणी केली त्याने हेतुपुरस्सर काम करुन कार्यवाही केली असल्यास तो अधिकारी देखील कारवाईकरिता पात्र आहे. तसेच यासंबंधी संबंधितांवर कारवाई करुन त्याबाबतचा अहवाल १५ दिवसांमध्ये समितीकडे सादर करावा.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, अशाप्रकारे विलंब होत असल्यामुळे लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये थेट लाभ हस्तांतरण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु ते पूर्णतः यशस्वी न झाल्यामुळे यावर्षी पासून एसएमसीकडे त्यांच्या नावावर थेट पैसे देण्याची कार्यवाही सुरु केली आहे. परंतु काही एसएमसीमध्ये वेळेवर पैसे दिले जात नसतील तर याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी काळजी घेतली पाहिजे. याचा मूळ उद्देश विद्यार्थ्यांना विशेष सुविधेअंतर्गत गणवेश व लेखन साहित्य मिळाले पाहिजे. यावर समितीने पुढे अशी

विचारणा केली की, या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वेळेवर काळजी घेतली पाहिजे. याकरिता सहा महिने किंवा एक वर्षांचा विलंब होता कामा नये.जिल्हा परिषदेला आयएसओ मानांकन करीत असताना प्रत्येक जबाबदारी ठरवून दिल्यानंतर त्याची आयएसओमध्ये अंमलबजावणी झाल्याचे अभिलेख्यामध्ये दाखविण्यात येत असते. त्यानुसार प्रत्येक जिल्हा परिषदेने आयएसओमध्ये अंमलबजावणी झाल्याबाबत अभिलेख्याकरिता नस्तीमध्ये टिप्पणी सादर केली पाहिजे. यावर समितीने असे निदेश दिले की, या संदर्भात तात्काळ कार्यवाही करावी.

### अभिप्राय व शिफारशी

सन २०१२-१३ या वर्षामध्ये वाशिम जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील इयत्ता १ ली ते ४ थी मधील अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना विशेष सुविधा अंतर्गत गणवेश व लेखन साहित्य पुरवठा करण्यासाठी शिक्षण विभागात विविध लेखाशिर्षाखाली प्राप्त अनुदानापैकी २० टक्के रक्कम रूपये ८,६४,१५०/- हे जिल्हा स्तरावर  खर्च करण्यात आले याबाबत पुढील प्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी, सदस्य, सचिव, नियोजन समिती वाशिम यांचे स्तरावरून सन २०११-१२ मधील अखर्चित अनुदान सन २०१२-१३ मध्ये खर्ची टाकणेबाबत वाशिम जिल्हा परिषदेच्या स्थायी समिती सभा ठरावान्वये अखर्चित निधी खर्च करण्यास मंजुरी घेवून मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.  पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार करारनामा करण्यात आला नाही, साहित्याच्या दर्जा विषयी तपासणी करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे साहित्याच्या चाचणी अहवालाची १० टक्के रक्कम रू. ६८,८४१/- रोखून ठेवण्याची कार्यवाही केल्याचे निदर्शनास आले नाही.  साठा नोंदवही मध्ये दिनांक नमूद करण्यात आला नाही, त्यामुळे शैक्षणिक सत्र सुरू होण्यापूर्वी साहित्य प्राप्त झाल्याबाबत पडताळणी करता आली नाही.  उपरोक्त लेखा आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, यांची साक्ष घेतली असता, साक्षी दरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, खाते प्रमुख शिक्षणाधिकारी असल्यामुळे त्यांना तांत्रिक मंजूरीचे अधिकार आहेत, परंतु पुरवठा आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी दिला व त्याकरिता झालेला खर्च जिल्हा परिषदेच्या खात्यातून करण्यात आला. तथापि जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहिती नुसार खुलाशामध्ये जिल्हा वार्षिक योजनेच्या कामांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार मंत्रालयीन विभागाच्या कार्यान्वयीन यंत्रणेस देण्यात आले आहेत. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे त्यामुळे प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेबाबत संदिग्धता असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. त्यामुळे याबाबत स्पष्टता असणे आवश्यक आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १५३(१) अन्वये पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार करारनामा करणे आवश्यक होते, केवळ १०० रूपयांच्या मुद्रांक शुल्क असलेल्या पेपरवर लिहून दिल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची जबाबदारी पूर्ण होत नाही. करारनाम्याच्या अटी व शर्तीची प्रत देखील अनेक मुख्याध्यापकांकडे नसल्याचे दिसून आले आहे. अनेक ठिकाणी गणवेशाचे वाटप विलंबाने झालेले आहे याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.  लेखन साहित्याच्या मालाच्या दर्जा विषयीचा तपासणी अहवाल लेखापरिक्षण करतेवेळी सादर केला नाही, असा लेखा आक्षेप नोंदविण्यात आला असताना साक्षीदरम्यान तपासणीचा अहवाल सुप्रिटेन्डंट कंपनी प्रा.लि. मुंबई यांचेकडून दिनांक ३० मार्च, २०१३ रोजी अहवाल प्राप्त झालेला आहे असे समितीला विदीत करण्यात आले आहे.

सन २०११-१२ मध्ये गणवेश साहित्यांची रक्कम सन २०११-१२ मध्ये खर्च झाली सन २०१२-१३ ची रक्कम सन २०१३-१४ मध्ये खर्च केली सन २०११-१२ मध्ये साहित्याचे वाटप झाले नाही. सन २०१२-१३ चा निधी दिनांक ३१ मार्च, २०१२ मध्ये मंजूर झाला होता. त्यामुळे सन २०११-१२ मध्ये निधी खर्च होऊ शकला नाही. त्यामुळे सन २०१२ -१३ मध्ये सदर खर्चास मान्यता घेऊन सन २०१३ मध्ये रक्कम खर्च करण्यात आली.  दिनांक ३१ मार्च, २०१२ रोजी निधी आल्यानंतर निधीचे नियोजन करावयास पाहिजे होते. माहे जानेवारी व फेब्रुवारी महिन्यात विषय समिती मध्ये ठराव मंजूर करून घेणे आवश्यक होते, ११ महिन्यानंतर सदर विषय स्थायी समितीमध्ये सादर करण्यात आला व मंजुरी घेण्यात आली होती यासाठी विलंब करण्यात आल्याचे दिसून येते. वेळेत विद्यार्थ्यांना गणवेश व इतर साहित्याचे वाटप होणे आवश्यक होते सन २०१३-१४ च्या साहित्याचे वाटप वेळेत न करणे, तपासणी अहवाल लेखापरिक्षणाच्या वेळी न दाखवणे या सर्व अनियमितता झाल्याचे दिसून येत आहे.

लेखन पाटी खरेदी वर्ष २०१२-१३ मध्ये शिक्षणाधिकारी (प्राथमिक) हे पद रिक्त होते उक्त पदाचा कार्यभार श्री. रंगराव काळे, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, वाशिम यांच्याकडे दिनांक १ एप्रिल, २०१२ ते दिनांक १० जानेवारी, २०१३ पर्यंत होता. तथापि श्री. रंगराव काळे हे दिनांक ३१ ऑगस्ट, २०१७ रोजी  सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्याविरूध्द कार्यवाही करता येणार नाही असे नमूद करण्यात आले असले तरी श्री. **काळे यांचे विरूध्द वेळीच कारवाई करणे अभिप्रेत होते त्यामुळे याप्रकरणी समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.** चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार पंचायत समिती, मालेगाव व पंचायत समिती, मानोरा येथे अनुक्रमे दोन आठवडे व

बारा आठवडे विलंबाने लेखन पाटीचा पुरवठा केल्याने संबंधित पुरवठादारकडून रूपये ८,७६०/- दंड वसूल करण्यात आला आहे, याबाबत समिती समाधान व्यक्त करीत आहे.

समितीने दिनांक २ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, जिल्हा परिषदेत पूर्वी ८०: २० गुणोत्तरानुसार ८० टक्के गणवेशावर व २० टक्के लेखन साहित्यावर निधी खर्च होत असे कार्यारंभ आदेशामधील तारखेपेक्षा विलंबाने पुरवठा केल्यास प्रत्येक आठवडयाच्या विलंबाकरिता किंमतीच्या ०.५ टक्के आकारण्याबाबत करारामध्ये अट समाविष्ट करण्यात आली होती, त्यानुसार पुरवठादाराकडून दंड वसूल करण्यात आला आहे.

शासन ठरवून दिलेल्या कालबध्द कार्यक्रमानुसार गणवेश व लेखन साहित्य विद्यार्थ्यांना मिळाले पाहिजे याकरिता जिल्हा परिषदेकडे निधी प्राप्त झाल्यानंतर विहित मुदतीत तो निधी वितरीत करण्यात आला नाही तर ती जबाबदारी शिक्षणाधिकाऱ्यांवर निश्चित करण्यात यावी. प्रस्तुत लेखी उत्तरामध्ये जिल्हा परिषद स्तरावर कार्यारंभ आदेश देण्यास ८ महिन्यांचा विलंब झाला असूनही त्याबाबतचा खुलासा करण्यात आलेला नाही. याबाबत समिती आश्चर्य व्यक्त करीत आहे. विद्यार्थ्यांना गणवेश व लेखन साहित्य विहित कालावधीत प्राप्त झाले आहे किंवा नाही याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी भरारी पथक तयार करून पाहणी केली पाहिजे. **तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विविध लेखाशिर्षा अंतर्गत जिल्हा परिषदेला प्राप्त होणाऱ्या निधीबाबत दर महिन्याला खाते प्रमुखांच्या बैठका घेणे आवश्यक आहे. निधी अखर्चित राहिला असल्यास मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे. यासंदर्भात शासनाने दिलेला निधी वेळेत व वेळापत्रकाप्रमाणे खर्च होणे आवश्यक आहे. अन्यथा ज्या उद्देशाने शासन निधी देते तो उद्देश निधी अखर्चित राहिल्यास सफल होत नाही. यास्तव भविष्यात ज्या योजनेसाठी निधी प्राप्त झाला ते विहित वेळेत वेळापत्रकाप्रमाणे कटाकाक्षाने व काटेकोरपणे खर्च होण्याबाबत जिल्हा परिषदेने दक्षता घ्यावी. ज्या जिल्हा परिषदा निधी विहित वेळेत व वेळापत्रकाप्रमाणे खर्च करणार नाही अशा जिल्हापरिषदांवर शासनाने कठोर कारवाई करण्यासंदर्भात ठोस पावले उचलावीत अशी समितीची शिफारस आहे. उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

## प्रकरण दोन

### जिल्हा परिषद, वाशिम

### साठवण तलाव माळेगांव नजिक किन्ही येथील साठवण तलाव बांधकाम खर्चातील अनियमिततेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.४५१/७ (सन २०१२-१३)**

जिल्हा परिषद सिंचन विभाग यांनी माळेगांव नजिक किन्ही येथील साठवण तलाव बांधकामावर रुपये १,२३,७६,०८१/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) साठवण तलाव बांधकामाचा ठेका सन १९९६-९७ मध्ये एन.के.बिल्डर्स यांना दिला असून सदर कामाची मुदत दि. २६ डिसेंबर, १९९८ पर्यंत असताना विहित मुदतीत काम पुर्ण केले नाही. सदर कामाचे पाचवे धावते देयक कामास मुदत वाढ नसतांना तसेच वाढीव परिमाणास बी-१ करारमान्यातील अट क्र. ३८ नुसार सक्षम मंजुरी प्रदान केले आहे. सदचे काम दिनांक ३१ मार्च, १९९८ नंतर बंद होते. सन २००४ मधील प्रदान करतांना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १०३ भंग केला आहे.

२) सदर कामास सन २००९-१० मध्ये सुधारित तांत्रिक मंजुरी घेतली असुन कंत्राटदारास विनादंड मुदत वाढ मंजुर करुन सन २०११-१२ मधील अखर्चित निधी लेखाशिर्ष २७०२-४७५४ या मुख्य लेखाशिर्षातुन २७०२-७२४३ या लेखाशिर्षात नियमबाहय वर्ग करुन कंत्राटदारास प्रदान केले.

३) बांधकामाचे मोजमापानुसार कंत्राटदारास एकूण आठ देयकामध्ये एकूण (up date) since previous आठवे बिलापावेतो मापन पुस्तीकेनुसार कंत्राटदारास रुपये १,१२,६४२/- चे अतिप्रदान झाले असून सदरची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

४) कामाची विनादंड मुदतवाढ मंजुरीबाबत आदेश क्रमांक व दिनांक नमूद केला नाही.

५) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. विमास/१०९८/प्र.क्र.२/९८ दिनांक १९ ऑगस्ट, १९९८ नुसार बांधकाम विमा १ % रुपये ६२५४०/- व १ % उपकर रुपये ६२५४०/- असे एकूण रुपये १२५०८०/- वसूल करुन योग्य लेखाशिर्षात जमा करणे आवश्यक आहे.

६) गौण खनिज कराची दिनांक ११ फेब्रुवारी, २०१० च्या अधिसुचनेनुसार सुधारीत दराने वसुली होणे आवश्यक आहे.

७) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए २००८/प्र.क्र.४२०/वित्त-९ दिनांक १ जून, २००८ मधील तरतुदीचे पालन केले नाही.

८) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता, १९६८ चे नियम ११४ व १५३ नुसार तसेच सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता नियम ३१३ ते ३१५ नुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे.

९) महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक संकिर्ण २००९/(४६५/२००९) औप्र-२ दिनांक १५ फेब्रुवारी, २०१० मधील बाब १ ते १९ नुसार कामाचे प्राकलने व सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त करतांना त्यानुसार विभागाने कार्यवाही केली नाही.

१०) विहित टक्केवारीनुसार कार्यकारी अभियंता यांनी कामाची तपासणी केल्याचे मापनपुस्तिकेत दिनांकित नोंद केली नाही. कामावर वापरलेल्या साहित्याची शासनमान्य संस्थेकडून साहित्याची गुणवत्ता तपासणी अहवाल उपलब्ध केले नाहीत. कामाचे छायाचित्र कामाचे प्रगती नुसार नस्तीत ठेवण्यात आले नाही. कामाची माहिती फलक लावल्याचे ऐवज नस्तीत ठेवले नाही. अपूर्ण काम त्वरीत पूर्ण होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) योजनेचे कामास अधीक्षक अभियंता यांनी केलेल्या शिफारशीचे आधारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.वाशिम यांनी दि. ३१ मार्च, २००४ चे आदेशाव्दारे मुदतवाढ मंजूर केली आहे.

पाचवे धावते देयकात अदायगीस प्रस्तावित वाढीव परिमाणाच्या बाबींचे करारनाम्यातील कलम ३८(२) बाब प्रस्तावास अधिक्षक अभियंता यांनी आदेश क्र. ८०४१ दि. ०७ सप्टेंबर, १९९९ नुसार वाढीव परिमाणास मंजुरी प्रदान केली आहे.

उपरोक्त नुसार मुदतवाढ दिली असून त्याकरीताची आर्थिक तरतूद उपलब्ध असल्याने तसेच ३८/२ बाब प्रस्तावास मंजूरी घेऊन प्रमाणक क्र. २३१९ नुसार दि. ३१ मार्च, २००४ रोजी कामाचे पाचवे धावते देयकाची अदायगी करण्यात आली आहे. नियम १०३ चा भंग झालेला नाही.

२) सदर काम मुळात २७०२-१४८८ या लेखाशिर्षा अंतर्गत हाती घेण्यात आहे होते. परंतु सन २००७ मध्ये प्राप्त मार्गदर्शक सुचनेनुसार २७०२-४७५४ या लेखाशिर्षाअंतर्गत योजनेचा समावेश पंतप्रधान पॅकेज स्टेटपुल योजनेअंतर्गत करण्यात आला होता. तथापि, यातूनही पुरेसा निधी प्राप्त होत नसल्याने अधिक्षक अभियंता यांना विभागाचे पत्र क्र ६२२ दि. १३ मार्च, २०१२ नुसार सदर काम २७०२-७२४३ या लेखाशिर्षांतर्गत पूर्ण करण्यास व खर्च करण्यास परवानगी मागण्यात आली होती. यास अधिक्षक अभियंता यांनी त्यांचे पत्र क्र. ७९६ दि. १४ मार्च, २०१२ नुसार मंजुरी प्राप्त आहे. याच आधारे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश क्र. ७८६ दि. ३० मार्च, २०१२ व्दारे २७०२-७२४३ या लेखाशिर्षातून खर्च करण्याची परवानगी दिल्यानुसार, कंत्राटदारास देयकाची अदायगी उपलब्ध निधी नुसार करण्यात आली आहे.

३) कामाचे तिसरे धावते देयक रु. १६,४४,०१५/- चे होते. त्यातून रुपये १,१२,५६०/- ची कपात करुन रुपये १५,३१,४५५/- चे देयक अदा केले आहे.

कामाचे चौथे धावते देयक रु. २,६४,९६६/- ऐवजी रु. २६४९६५/- चे तर आठवे धावते देयक रु. ११,१३,२०६/- ऐवजी ११,१४,१२५/- असे अनुक्रमे रु. १/- व रु.८१/- असे एकूण रु.८२/- चे कंत्राटदारास कमी प्रदान करण्यात आले आहे. कागदपत्राची वरीलप्रमाणे खात्री केली असता रुपये १,१२,६४२/- चे अतिप्रदान झालेले नाही.

४) कामाची मुदतवाढ मंजूरीबाबत आदेश क्रमांक व दिनांक नमुद केला नव्हता. तथापि कागदपत्रांची पडताळणी केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक ३१ मार्च, २००४ रोजी मुदतवाढ मंजुर केली आहे.

५) दिनांक १७ जून, २०१० चे शासन निर्णयानुसार ज्या कामाचे करार ०१ जुलै, २०१० व तदनंतर करतील अशा सर्व इमारती व इतर बांधकामावर उपकराची रक्कम लागू राहणार आहे. प्रस्तुत कामाचा करार सन ९६-९७ मध्ये झाला असल्यामुळे १ % उपकर वसूल केलेला नाही. १% विमा रक्कम रुपये ६२,५४०/- वसूल करण्यात येत आहे.

६) गौण खनिज कराची दिनांक ११ फेब्रुवारी २०१० च्या अधिसूचनेनुसार रु. २००/- प्रति ब्रास एवढया सुधारित दराने वसुली करण्यात आलेली आहे.

७) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक झेडपीए २००८/प्र.क्र.४२०/वित्त-९ दिनांक १० जून, २००८ मधील तरतुदीचे पालन करण्यात आले आहे.

८) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ११४ व १५३ नुसार तसेच सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता नियम ३१३ ते ३१५ नुसार मुख्य अभियंता यांची सुधारित तांत्रिक मान्यता जा.क्र. ९५२ दि. २४ फेब्रुवारी, २०१० नुसार तर जिल्हा परिषद सर्व साधारण सभा विषय ठराव क्र. ११ दि. १४ ऑगस्ट, २००९ नुसार सुधारित प्रशासकीय मान्यता आहे.

९) शासन परिपत्रक दि. १५ जानेवारी, २०१० नुसार सक्षम प्राधिकरणाचे मान्यतेनुसारच योजनेचे सुधारित अंदाजपत्रक तयार करुन त्यास मुख्य अभियंता यांचे जा.क्र. ९५२ दि. २४ फेब्रुवारी, २०१० नुसार सुधारित तांत्रिक मान्यता तसेच ठराव क्र. ११ दि. १४ ऑगस्ट, २००९ नुसार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची सुधारित प्रशासकीय मान्यता आहे.

१०) विहित टक्केवारीनुसार वेळोवेळी कार्यरत कार्यकारी अभियंता यांनी कामाची तपासणी केली असून तशा नोंदी मोजमाप पुस्तिकेत नोंदविण्यात आल्या आहेत.

कामावर वापरलेल्या साहित्याची शासन मान्य संस्थेकडून गुणवत्ता तपासणी अहवाल, कामाचे वेळोवेळीची छायाचित्रे तसेच माहिती फलक लावल्याचे दस्तऐवज दप्तरी ठेवण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी यांनी दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ ला उर्वरित जमिनीचा ताबा दिला आहे. सद्यस्थितीत कामास दिनांक ३० डिसेंबर, २०१८ पर्यंत मुदतवाढ दिली असून काम प्रगतीपथावर आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

वाशिम जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सन १९९८ पासून काम बंद असण्याची कारणे काय, काम पुन्हा केव्हा सुरु केले, काम विहित मुदतीत पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत, काम विहित मुदतीत पूर्ण करुन घेण्याबाबत खात्याने काय कार्यवाही केली, काम विहित मुदतीत पूर्ण न झाल्याने जास्तीचा किती खर्च झाला, काम विहीत मुदतीत पूर्ण न झाल्याने निविदा अटी व शर्तीनुसार कारवाई न करण्याचे प्रयोजन काय, कामाची मूळ रक्कम किती होती, सुधारित तांत्रिक मंजुरीनंतर कामाची रक्कम किती झाली, रकमेमध्ये वाढ झाली असल्यास त्याची कारणे काय, कामाची मुदतवाढ कोणत्या दिनांकापर्यंत दिली होती, त्यानंतर काम सुरु केले आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत.

यावर कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग यांनी समितीस विदीत केले की,  सन १९९६ मध्ये या प्रकल्पाचे काम सुरु केले होते. त्यानंतर भूसंपादन व अति उच्च दाब वाहिनीमुळे प्रकल्पामध्ये अडचणी आल्या. भूसंपादन वेळेत न झाल्यामुळे जमिन ताब्यात मिळाली नाही. त्यामुळे प्रकल्पाचे काम पूर्ण करता आलेले नाही. आता दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ रोजी उर्वरित जमिन ताब्यात मिळाली आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, जमिन ताब्यात नसताना निविदा का काढण्यात आली. यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस खुलासा केला की,  सन १९९६-९७ मध्ये मूळ प्रस्तावाला मान्यता होती. दिनांक २७ डिसेंबर, १९९६ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला. एकूण जमिनी पैकी २७.५० हेक्टर जमिन ताब्यात होती. उर्वरित तीन शेतकऱ्यांची ८.२९ हेक्टर जमीन ताब्यात नव्हती. यावर समितीने पुढे विचारणा केली की, सदर प्रकल्पासाठी एकूण किती जमिनीची आवश्यकता होती. जमीन ताब्यात नसताना निविदा कशी काढण्यात आली. शासन निर्णयानुसार एकूण जमिनीच्या ७० टक्के जमीन ताब्यात असेल तर निविदा काढता येत नाही. ९० टक्के जमीन ताब्यात असेल तर निविदा काढता येते. आता या तलावाचे काम पूर्ण झाले आहे काय, यावर कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग यांनी समितीस विदित केले की, उर्वरित जमीन आता ताब्यात मिळालेली आहे. त्यामुळे घळभरणीचे काम झालेले आहे. सदर काम लवकर पूर्ण करण्यात येणार आहे. तद्नंतर यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदीत केले की, सदर काम सुरु असून ते अंतिम टप्प्यात आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विभाग प्रमुखांशी पूर्वचर्चा केलेली नाही. विभाग प्रमुख म्हणतात काम पूर्ण झाले, मुख्य कार्यकारी अधिकारी सांगतात की काम अंतिम टप्प्यात आहे, त्यामुळे याठिकाणी एकवाक्यता आढळून येत नाही.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ रोजी उर्वरित जमीन ताब्यात मिळालेली आहे. घळ भरणीचे काम पूर्ण झाले आहे. आठ दिवसापूर्वी सदर कामाची पाहणी केली आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, मूळ प्रशासकीय मान्यता किती रुपयांची होती व सुधारीत प्रशासकीय मान्यता किती रुपयांची आहे. यावर अतिरिक्त  मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीस विदित केले की, मुळ प्रशासकीय मान्यता ९० लाख ६० हजार रुपयांची होती. सुधारीत प्रशासकीय मान्यता २ कोटी ०८ लाख ७० हजार रुपयांची आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, मुळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा १ कोटी ८ लाख रुपयांनी कामाची किंमत वाढली आहे. सदर वाढीव निधीस कोण जबाबदार आहे. त्याच प्रमाणे इतके वर्षे पाणीसाठा न झाल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. या कामावर १ कोटी ८ लाख रुपये जादा खर्च झाला आहे. सन २०१७ मध्ये जमीन ताब्यात मिळालेली आहे. भूसंपादनाचा मोबदला १८८८ च्या कायद्यानुसार दिलेला आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदीत केले की, सदर जमिनीचे अवॉर्ड पूर्वी झाले होते. आता काही जमीन ताब्यात घेण्यात आली आहे. दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ रोजी काही अवॉर्ड झाले आहेत.

यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीस विदीत केले की, जमिनीचा अंतिम मोबदला सन २००५ मध्ये देण्यात आला आहे. कार्यारंभ आदेश दिनांक २७ डिसेंबर, १९९६ रोजी दिला होता. २४ महिने काम करण्यास मुदत होती. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, २० वर्षानंतर त्याच ठेकेदाराने सदर काम केले आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, जमीन हस्तांतरणाचा एक विषय होता. निधीची कमतरता होती. जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठपुरावा करुन निधी मिळावयास पाहिजे होता. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की,  सन १९९६-९७ मध्ये मूळ प्रशासकीय मान्यता घेण्यात आली होती. दिनांक २८ डिसेंबर, १९९८ पर्यंत कामाची मुदत होती. यामध्ये २० ते २२ वर्षाचा कालखंड गेला आहे. सदर काम एन.के.बिल्डर्स यांना दिले होते. २२ वर्षानंतर सदर काम त्यांनीच पूर्ण केले आहे काय, यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीस विदित केले की, उर्वरित जमीन सन २०१७ मध्ये मिळालेली आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, दिनांक २७ डिसेंबर, १९९६ रोजी कार्यारंभ आदेश दिलेला आहे. दोन वर्षात काम पूर्ण करायचे होते. २२ वर्षापासून एकच कंत्राटदार आहे.या कामाला प्रशासकीय मान्यता कोणी दिली होती. सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्याची आवश्यकता का भासली. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीस विदित केले की, सदर कामासाठी निधीची कमतरता होती, त्यामुळे प्रकल्पाची किंमत वाढत होती.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, त्यावेळी किती निधी उपलब्ध होता. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदीत केले की, त्यावेळी ५० टक्के निधी उपलब्ध होता. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, निधीच्या अधीन राहून काम सुरु करण्याची अट टाकण्यात आली  होती काय, यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगांव यांनी समितीस विदीत केले की, निधी मंजूर करण्याचे अधिकार सार्वजनिक बांधकाम विभागास होते. प्रस्तावाला अंतिम मान्यता मिळाल्यानंतर स्वतंत्ररित्या तरतूद करण्यात आली होती. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, कार्यारंभ आदेश देतांना या सर्व बाबींची माहिती देण्यात आली होती काय, जिल्हा परिषदेमध्ये जिल्हा नियोजन समिती असते त्या समितीसमोर हा विषय ठेवण्यात आला होता काय, असा विषय जिल्हापरिषदेच्या जलव्यवस्थापन समितीसमोर ठेवायचा असतो. त्यासंदर्भात आढावा घेण्यात आला आहे काय, जलव्यवस्थापन समितीचे सचिव मुख्य कार्यकारी अधिकारी असतात. साठवण तलाव करावा अशी लोकांची मागणी होती काय,

यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगांव यांनी अशी माहिती दिली की, अति उच्च दाब विद्युत वाहिनी तेथे असल्यामुळे जमीन संपादनास विलंब झाला आहे. साठवण तलाव करावा अशी लोकांची मागणी होती. यावर समितीने असे निदेश दिले की, या विषयाबाबत जलसंधारण सचिव यांची साक्ष घेण्यात येईल. श्री. कोटकर हे सन २००५ पासून येथे कार्यरत आहेत. यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगांव यांनी समितीस विदीत केले की, सन २००५ ते २०१० पर्यंत ते कारंजा येथे होते. सन २०१० पासून वाशिम येथे कार्यरत आहेत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २०१७ मध्ये साठवण तलावासाठी जमीन ताब्यात घेतली आहे. शेतकऱ्यांना सन २०१४ मध्ये मोबदला दिला आहे. सर्व जमीन मालकांना वाढीव दराने मोबदला मिळाला पाहिजे. यावर यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, मागे अवॉर्ड झालेले आहे. भूसंपादनाची कार्यवाही जिल्हाधिकारी यांच्यामार्फत होते.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, सदर जमीन सन २०१७ मध्ये ताब्यात मिळाली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, जमिनीचा मोबदला पूर्वीच दिलेला आहे. जमीन मालक ताबा देत नव्हते. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, शेतकऱ्यांनी जमिनीचा वाढीव मोबदला देण्याची मागणी केली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदीत केले की, वाढीव पैसे देण्याची मागणी होती. त्यांनी त्या संदर्भात न्यायालयात जायला पाहिजे होते. मात्र ते न्यायालयात गेले नव्हते. धरणाशी संबंधित कोणीही न्यायालयात गेले नाही. यावर उप आयुक्त, (आस्थापना), आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग यांनी समितीस विदित केले की, विभागीय आयुक्त कार्यालयातील चौकशीचे काम पाहणारे उप आयुक्त दर्जाचे अधिकारी पाठवावेत, असे त्या पत्रात लिहिले होते. आम्ही या संदर्भात विभागीय आयुक्तांना सांगितल्यावर विभागीय आयुक्तांनी सांगितले की, सहायक आयुक्त चौकशीचे काम पाहतात, त्यांना पाठवावे. त्यामुळे सहायक आयुक्तांना पाठविले होते. यावर पुढे समितीने अशी विचारणा केली की, आपण नोटीस कोणाच्या नावाने पाठविली होती, विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या नावाने अग्रेषित केले होते आणि त्यामध्ये उप आयुक्त असे म्हटले होते. मात्र सहायक आयुक्त उपस्थित झाले. आयुक्तांनी सहायक आयुक्तांना पाठविले, ते आले होते. मात्र त्यांना या कामाची माहिती नव्हती, त्यामुळे आतापर्यंत समितीच्या दौऱ्याच्या बैठकीत उप आयुक्तच येतात, सहायक आयुक्त कधी आले नव्हते. विभागीय आयुक्तांनी जिल्हा परिषदेची तपासणी दरवर्षी कोणत्या मुद्यांवर करावी, या विषयाच्या संदर्भात सहायक आयुक्त समाधानकारक उत्तर देऊ शकले नाहीत.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, साठवण तलाव माळेगाव नजिक किन्ही बांधकाम खर्चात अनियमितता झाली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ८० टक्के रक्कम भूसंपादनाची होती, ती दिनांक २९ ऑगस्ट, २००० ला दिली होती. माहे जानेवारी, २००५ ला उर्वरित २० टक्के रक्कम दिली होती, त्यानुसार ८०:२० प्रमाणे रक्कम जमा केली आहे. लाभार्थ्यांना ठरवून पैसे वाटप करण्याची जबाबदारी त्यांची होती, त्यांनी आपल्याला ताबा द्यायचा होता, ३५ हेक्टरपैकी फक्त २७.५ हेक्टरचा ताबा मिळाला पाहिजे होता, ३ शेतकऱ्यांचा, ८.२९ हेक्टर संबंधात विरोध होता. ते काम करु देत नव्हते. साईड प्लॅन पूर्ण झालेले होते, फक्त गॉर्जचे काम राहिले होते. ताबा माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये मिळाल्यानंतर ते काम पूर्ण झाले आहे.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन १९९८ पासून काम बंद असणे, प्रशासकीय मान्यता ९० लाख रुपयांची असणे, सुधारीत मान्यता २०८ लाख रुपयांची असणे, भूसंपादनाच्या संदर्भात फार मोठ्या प्रमाणात अनियमितता असणे, ॲवॉर्डच्या पूर्वीच पूर्ण जमिनीचे अधिग्रहण झालेले असणे, जमीन ताब्यात नसताना कामाला कार्यारंभ आदेश दिले असणे, असे अनेक प्रश्न समितीने उपस्थित केले आहेत. जमीन ताब्यात नसताना कार्यारंभ आदेश कसा दिला, याबाबत शंका उपस्थित करण्यात आली. जिल्हा परिषदेच्या जलव्यवस्थापन समितीमध्ये हा मुद्दा घेऊन सातत्याने पाठपुरावा झाला पाहिजे होता, तो झालेला नाही. या प्रकल्पाला फार विलंब झालेला आहे. शेतकरी पाण्यापासून, सिंचनापासून वंचित राहिलेला आहे. मोबदल्याच्या संदर्भातही विलंब झालेला आहे. हे प्रकरण गंभीर स्वरुपाचे दिसत आहे. त्यामुळे समिती जलसंधारण, जलसंपदा या विभागांच्या प्रधान सचिवांना साक्षीसाठी बोलाविणार आहे. दोन्ही विभागांचे सचिव जबाबदार आहेत. प्रकल्प पूर्णत्वाला जाण्यासाठी २२ वर्षे का लागली, महत्त्वाचा प्रश्न आहे.

यावर समितीने पुढे असे निदेश दिले की, जमिनीचा मोबदला देण्यामध्ये विलंब झालेला आहे. नियम १४ (२) अन्वये नवीन तरतुदीप्रमाणे मोबदला दिला पाहिजे होता, मात्र तोही दिलेला नाही. या संदर्भात माहिती घ्यावी. जलसंपदा, जलसंधारण, ग्रामविकास, महसूल या विभागांच्या प्रधान सचिवांना या मुद्याच्या संदर्भात साक्षीसाठी बोलाविण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**१ )** साठवण तलाव माळेगाव नजिक किन्ही प्रकल्पाच्या कामाची सद्य स्थिती काय आहे ? तसेच मुळ प्रशासकिय मान्यतेपेक्षा किती रकमेच्या कामाच्या वाढीव खर्चास मंजुरी देण्यात आली, या कामास प्रशासकिय मान्यता, तांत्रिक मान्यता तसेच सुधारीत प्रशासकिय मान्यता केंव्हा घेण्यात आली ?

**२)** उपरोक्त साठवण तलावामध्ये जमीन अधिग्रहण करण्यात आली आहे त्याकरिता नियम १४ (२) अन्वये जमीनीचा मोबदला देण्यामध्ये विलंब झालेला असुन प्रकल्प बाधितांना किती रक्कमेचा मोबदला देण्यात आला आहे याची तपशीलवार माहिती सादर करण्यात यावी, या संपुर्ण प्रकरणाची चौकशी केली आहे का, त्यात काय आढळुन आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.

साठवण तलाव माळेगांव नजिक किन्ही तालुका मालेगाव जिल्हा वाशिम या योजनांचे काम जुन २०१८ मध्ये पूर्ण झाले असून सद्यिस्थितीत १००% जलसाठा निर्माण झाला आहे.

अंतिम टप्यात केवळ ३ कास्तकारांची ०८.२९ हे जमीन ताब्यात नसल्यामुळे सदर प्रकरणात मा.जिल्हाधिकारी वाशिम यांचे आदेशानुसार तहसीलदार मालेगांव यांनी पोलिस संरक्षण देवून दिनांक १५ नोव्हेंबर २०१७ रोजी उपरोक्त जमिनीचा ताबा विभागास दिल्यानुसार विभागाने माहे जून-२०१८ अखेर योजनेचे काम पूर्ण केले.

मुळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा अद्यावत सुधारीत प्रशासकीय मान्यतेनुसार रु.२,००,०१,१३०/-एवढी वाढ झाली आहे. वेळोवेळी घेण्यात आलेल्या तांत्रीक व प्रशासकीय मान्यतेचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | विवरण | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| १) | मुळ ता.मा. | ५४२२३६७ | अधि.अभियंता यांचे आदेश क्रमांक १२६ दि.३०/११/९६ रु.१६,९९,५५०/- |
| | | | अधि.अभियंता यांचे आदेश क्रमांक १२७ दि.३०/११/९६ रु.२३,७१,३९०/- |
| | | | का.अभियंता यांचे आदेश क्रमांक ७५दि.१३/१२/९६ रु.८८,१९१२/- |
| | | | का.अभियंता यांचे आदेश क्रमांक ७६ दि.१३/१२/९६ रु.४६३८५२ /- |
| २) | सुधारित ता.मा | ११९४४७६९० | अधि.अभियंता यांचे आदेश क्रमांक ४८९ दि.०२ /०९/९९ रु.६०९१९७५/- |
| | | | अधि.अभियंता यांचे जा.क्र. ६०७४ दि.३०/०८/९९ रु.५३५५७१५/- |
| ३) | सु/सुधारित ता.मा | १६६०८९७७ | मुख्य.अभियंता यांचे आदेश क्रमांक ९५२ दि.२४/०२/१० रु.११३८७८७७/- |
| | | | अधि.अभियंता यांचे आदेश क्रमांक ०३ दि.२२/०३/१० रु.५२२५२२११००/- |
| ४) | अद्यावत सु/सुधारित ता. मा. | २२८३६१५१ | अधि.अभियंता यांचे ता.मा.क्र.५/पीबी/३ दि.१२/१०/१८ |
| ५) | मुळ प्र.मा. | ९०६०००० | जि.प.सर्व.साधा.सभा.वि.क्र.५ दि.८/१०/९६ |
| ६) | सुधारित प्र.मा. | १३७४५२०० | जि.प.सर्व.साधा.सभा.वि.क्र.११ दि.१५/१२/९९ |
| ७) | सु/सुधारित प्र.मा. | २०८१८६०० | जि.प.सर्व.साधा.सभा.वि.क्र.११ दि.१४/०८/०९ |
| ८) | अद्यावत सु/सुधारित प्र.मा. | २९९६११३९ | जि.प.सर्व.साधा.सभा.वि.क्र.९.४ दि.८/८/१८ |

भुसंपादन कायदयातील नियम १४ (२) चे तरतुदी नुसार वांरवार पाठपुराव्याअंती मा.जिल्हाधिकारी यांचे आदेशानुसार तहसीलदार मालेगाव यांनी दिनांक १५/११/२०१७ ला ताबा विभागास दिला आहे.

सदर प्रकरणी प्रकल्पास आवश्यक संपादीत जमीनी करीता पुढील प्रमाणे एकुण रू.४२,०५,९०६ /- चा मोबदला देण्यात आला आहे.

| अ.क्र. | विवरण | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १) | प्रमाणक क्र.३८८ | २९/०९/२००० | ४३६०२५/- |
| २) | देयक क्र.१० | १३/०१/२००५ | ७४२७४५/- |
| ३) | धनादेश क्र.३०१३३० | ३०/०३/२००७ | २५००००/- |
| ४) | धनादेश क्र.०२७५७७ | ३१/०३/२०१६ | २७७७१३६/- |
| ५) | | एकूण | ४२०५९०६/- |

प्रकल्पास झालेल्या विलंबाची चौकशी केली असता योजनेचे कामास आवश्यक जमिनी पैकी ३ कास्तकारांची (श्री. वसंतराव उत्तमराव घुगे-४.२९ हे श्री. विश्वास आत्माराम घुगे-२.०० हे श्री. किशोर आत्माराम घुगे-२.०० हे ०८.२९ हे एवढी जमीन विभागाचे ताब्यात नसून हया कास्तकरांना निवाडयाचे मुल्यांकनानुसार जमिनीचे दर मान्य नसल्याने सदर जमिनीचा ताबा विभागास दिला नाही. विभागाने वेळोवेळी मागणी केल्यानूसार भुसंपादन मोबदला देखील भुसंपादन अधिकारी यांचे कडे जमा केला आहे.

वरील प्रमाणे नमुद बाबी निदर्शनास आल्यानुसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. वाशिम यांनी दि.९ नोव्हेंबर, २०१७ला सदर बाब जिल्हाधिकारी वाशिम यांचे निदर्शनास आणुन दिली असता मा.जिल्हाधिकारी यांचे आदेशानुसार तहसीलदार मालेगाव यांनी प्रलंबित ३ कास्तकारांच्या ८.२९ हे एवढया जमिनीचा दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ ला ताबा विभागास दिला आहे. त्यानुसार विभागाने माहे जून,२०१८ मध्ये योजनेचे संपुर्ण काम पुर्ण केले असुन १०० % जलसाठा निर्माण केला आहे.

जमीन ताब्यात मिळाल्याबरोबर विभागाने काम हाती घेऊन पुर्ण केले असल्याने कारवाई करण्यात आली नाही.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**मृद व जलसंधारण विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, वाशिम यांनी दिलेल्या माहितीशी सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने वाशिम जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सदर साठवण तलावासाठी मुळ प्रशासकीय मान्यता ५४.२२ लाख रुपये होती. समितीने भेट दिली तेव्हा साठवण तलावाचे काम पूर्ण झाले नव्हते. त्यानंतर सन २०१८ मध्ये तलावाचे काम पूर्ण झाले. त्याकरिता ३ कोटी रुपयांचा खर्च झाला. मुळ प्रशासकीय मान्यतेमध्ये भूसंपादनाकरिता किती किंमत होती. तसेच १०० टक्के भूसंपादन न करता यंत्रणेने तलावाचे काम कसे सुरु केले, यावर सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी समितीस विदीत केले की, सदर तलावाची मुळ अंदाजपत्रक किंमत ९० लाख रुपये होती. तसेच ५४ लाख रुपये कामाची तांत्रिक मान्यता होती. ९० लाख रुपयांपैकी कामामधील घटकाकरिता ५७ लाख रुपयांची मान्यता होती. त्यानंतर सुधारित प्रशासकीय मान्यतेनंतर त्याची किंमत २.९९ कोटी रुपये इतकी झाली. त्यात जवळपास ३३ लाख रुपये जमिनीकरिता आहेत. या संदर्भात पार्श्वभूमी अशी आहे की, सन १९९६ मध्ये तलावाला प्रशासकीय मान्यता मिळाली होती. तेथून अति उच्च दाबाची विद्युत वाहिनी जात असल्यामुळे ती दुसरीकडे स्थलांतरीत करण्यासाठी १९९६ मध्ये पैसे भरण्यात आले होते. त्यानंतर सन २०१० मध्ये अति उच्च दाबाची विद्युत वाहिनी तेथून स्थलांतरीत करण्यात आली. त्यानंतर सन २०१० ते २०१५ या काळात तलावाचे ९० टक्के काम पूर्ण करण्यात आले. यावर समितीने पुढे विचारणा केली की, तलावाकरिता बोर्ड मान्यता दिनांक ३० नोव्हेंबर, १९९६ रोजी मिळाली होती. त्यामुळे १४ वर्षांचा कालावधी अगोदरच वाया गेला आहे. प्रशासकीय मान्यता देत असताना जमीन ताब्यात घेतल्याशिवाय निविदा काढू नये अशी अट टाकण्यात आली नव्हती का, यावर सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी समितीस विदित केले की, तशी अट टाकण्यात आली होती.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, असे असताना सक्षम अधिकाऱ्यांनी निविदा काढून कामाची सुरुवात कशी केली, यावर सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी समितीस विदित केले की, मी त्या भागामध्ये काम केलेले आहे. मला त्याबाबत माहिती आहे. तेथे आदिवासी व टंचाईचा भाग आहे. तसेच तेथे सन १९९६ मध्ये कशी परिस्थिती होती याबाबतची माहिती अभिलेख्यांवर नाही. सन २०१० मध्ये अति उच्च दाबाची विद्युत वाहिनी तेथून स्थलांतरीत केल्यानंतर सदर तलावाचे काम सुरु झाले. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, जमीन संपादित करण्यासाठी विलंब झाल्यामुळे कार्यारंभ आदेशामधील कालावधीमध्ये काम न झाल्यामुळे कामावरील खर्च वाढला. परंतु आता जमीन ताब्यात नसल्यामुळे वेळेवर काम पूर्ण न झाल्याचे कारण सांगण्यात आले आहे. यावर सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी समितीस विदीत केले की, १९ शेतकऱ्यांची २७ हेक्टर जमीन मिळाली होती. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, समितीने तेथे भेट दिल्यानंतर यावर्षी सदर तलावाचे काम पूर्ण झाले आहे का, यावर्षी भरपूर पाऊस पडल्यामुळे तलावामधील पाणी साठा वाढला आहे का, यावर सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी समितीस विदीत केले की, जलसंधारण विभागाची बैठक झाल्यानंतर स्थानिक लोकप्रतिनिधींनी सदर तलावाचे काम २२ वर्षांपासून अपूर्ण असल्यासंबंधी मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी विभागाने त्यासंबंधी आदेश दिले. तेव्हा तीन शेतकऱ्यांकडून जमीन संपादित करायची बाकी राहिली होती. त्यानंतर शासनाने ३ शेतकऱ्यांकडील जमिनींचा एकतर्फी ताबा घेतला. त्यानंतर जून महिन्यामध्ये तेथे पाणी अडवून आता त्या तलावामध्ये पाणीसाठा झाला आहे. त्यामुळे हा प्रश्न मार्गी लागला आहे.

## अभिप्राय व शिफारशी

वाशिम जिल्हा परिषद, सिंचन विभाग यांनी माळेगांव नजिक किन्ही येथील साठवण तलाव बांधकामावर रूपये १,२३,७६,०८१/- एवढा खर्च सन २०१२-१३ मध्ये केला आहे. याबाबत पुढीलप्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. सदर साठवण तलाव बांधकामाचा ठेका सन १९९६-९७ मध्ये एन.के.बिल्डर्स यांना दिला असून सदर कामाची मुदत दिनांक २६ डिसेंबर, १९९८ पर्यंत असताना विहित मुदतीत काम पूर्ण केले नाही. सदर कामास सन २००९-१० मध्ये सुधारित तांत्रिक मंजुरी घेतली असून कंत्राटदारास विनादंड मुदतवाढ मंजुर करून नियमबाहयरित्या कंत्राटदारास देयक प्रदान करण्यात आले आहे. आठवे देयक कंत्राटदारास प्राप्त होईपर्यंत रूपये १,१२,६४२/- एवढी रक्कम अतिप्रदान झाली असून सदर रक्कम वसूल होणे आवश्यक आहे. कामाची विनादंड मुदतवाढ मंजुरीबाबत आदेश क्रमांक व दिनांक नमूद केला नाही. बांधकाम विमा उपकराची रक्कम रुपये १,२५,०८०/- वसूल करून योग्य लेखाशिर्षात जमा करणे आवश्यक आहे. गौणखनिज कराची सुधारित दरानेव सुली होणे आवश्यक आहे. विहित टक्केवारीनुसार कार्यकारी अभियंता यांना कामाची तपासणी केल्याचे मापन पुस्तिकेत दिनांकात नोंद केली नाही.

उपरोक्त लेखा आक्षेपाबाबत जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, यांची साक्ष घेतली असता साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, किन्ही साठवण तलाव बांधकाम प्रकल्पाचे काम सन १९९६ मध्ये सुरू केले होते. त्यानंतर भूसंपादन व अति उच्चदाब विद्युत वाहिनीमुळे प्रकल्पामध्ये अडचणी आल्या भूसंपादन वेळेत न झाल्यामुळे जमिन ताब्यात मिळाली नाही, त्यामुळे प्रकल्पाचे काम पूर्ण करता आलेले नाही. सन १९९६-९७ मध्ये मूळ प्रस्तावाला मान्यता होती. दिनांक २७ डिसेंबर, १९९६ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला, एकूण जमिनीपैकी २७.५० हेक्टर जमिन ताब्यात होती. उर्वरित तीन शेतकऱ्यांची ८.२९ हेक्टर जमीन ताब्यात नव्हती शासन निर्णयानुसार एकूण जमिनीच्या ९० टक्के जमिन ताब्यात असेल तर निविदा काढता येते दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ रोजी उर्वरित जमिन ताब्यात मिळाली आहे. **तसेच जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखांनी साठवण तलावाचे काम पूर्ण झाले आहे असे समितीला विदीत केले तर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार साठवण तलावाचे काम अंतिम टप्प्यात आहे असे समितीला विदीत करण्यात आले. यावरून जिल्हा परिषदेमधील अधिकाऱ्यांमध्ये समन्वयाचा अभाव असल्याचे व याबाबत पुरेसे गांभीर्य नसल्याचे दिसून येते. त्यामुळे समिति तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.**

साठवण तलावाची मुळ अंदाजपत्रक किंमत ९० लाख ६० हजार रूपये होती तसेच ५४ लाख रूपये कामाची तांत्रिक मान्यता होती. वास्तविक पहाता जमिनीचा अंतिम मोबदला सन २००५ मध्ये देण्यात आला आहे. कार्यारंभ आदेश दिनांक २७ डिसेंबर, १९९६ रोजी दिला होता. २४ महिने काम करण्यास मुदत होती, विहीत मुदतीत काम पूर्ण न झाल्यामुळे सुधारित प्रशासकीय मान्यता रूपये २ कोटी ८ लाख ७० हजार रूपये आहे. मूळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा १ कोटी ८ लाख रूपयांनी कामाची किंमत वाढली आहे. सदर वाढीव निधीसाठी जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे साठवण तलावाचे बांधकाम विहित कालावधीमध्ये पूर्ण न झाल्यामुळे व सुमारे २२ वर्ष विलंब झाल्यामुळे तलावामध्ये पाणीसाठा होऊ शकला नाही, त्यामुळे तेथील शेतकऱ्यांचे अपरिमित नुकसान झाले आहे. सदर कामावर रूपये १ कोटी ८ लाख एवढा जादा खर्च झाला आहे. दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ रोजी तलावासाठी अधिग्रहीत केलेल्या काही जमिनीचा मोबदला प्रदान (अवॉर्ड) करण्यात आलेला आहे तसेच मे. एन.के.बिल्डर्स एकाच कंत्राटदाराकडे गत २२ वर्षापासून किन्ही साठवण तलाव प्रकल्पाचे काम देण्यात आलेले आहे. सन १९९८ पासून साठवण तलावाचे काम बंद असणे, प्रशासकीय मान्यता ९० लक्ष रूपयांची असणे, सुधारित मान्यता रूपये २०८ लक्ष एवढी असणे भूसंपादनाच्या संदर्भात फार मोठया प्रमाणात अनियमितता असणे, पूर्ण जमिन अधिग्रहित केलेली नसताना जमिन मोबदला प्रदान (अवॉर्ड) केला असणे, जमिन ताब्यात नसताना कार्यारंभ आदेश देण्यात येणे, जिल्हा परिषदेच्या जलव्यवस्थापन समितीचे सचिव मुख्य कार्यकारी अधिकारी असताना सदर समिती समोर सातत्याने साठवण तलाव प्रकल्प पूर्ण होणेबाबत पाठपुरावा केल्याचे दिसून न येणे, सदर प्रकल्प २२ वर्ष एवढया प्रदीर्घ विलंबाने पूर्ण झालेला असल्यामुळे तेथील शेतकऱ्यांना पाण्यापासून व सिंचनापासून वंचित राहावे लागणे, जमिन अधिग्रहणासाठी देण्यात येणारा मोबदला विलंबाने प्रदान करण्यात आल्याचे येणे, या **सर्व गंभीर स्वरूपाच्या अनियमितता आढळून आलेल्या आहेत त्यामुळे समिती याप्रकरणी तीव्र नापसंती व असमाधान व्यक्त करीत आहे. सदर साठवण तलाव प्रकल्पास झालेल्या विलंबाप्रकरणी निविदा, जमिन अधिग्रहण, जमिनीचा मोबदला देण्यास झालेल्या विलंब या तांत्रिक पूर्तता विहित कालावधीत पूर्ण न करण्याऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे व चौकशीनुसार केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

## प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, वाशिम

## पाझर तलाव दुधखेडा बांधकामातील अनियमिततेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.४५२/११ (सन २०१२-१३)**

**जिल्हा** परिषद सिंचन विभाग यांनी पाझर तलाव दुधखेडा या बांधकामावर रुपये ३९,४७,८२९/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) कामाची प्रशासकीय व तांत्रिक मान्यता सन २००८ ची असतांना कामाची निविदा विलंबाने प्रसिध्द केली. प्रशासकीय व तांत्रिक मान्यता रक्कम रुपये २९,१२,९००/- असतांना काम वेळीच पूर्ण करणे आवश्यक होते. विलंबाने दरसुची फरक तुलनात्मक विश्लेषण करुन दर फरक ४२.७४% असतांना कंत्राटदारास वाटाघाटीने ४५.११% जादाने काम देवून वित्तीय नियमाचा भंग केला आहे.

२) सदर निविदा मंजूरी तथा वाटाघाटीपूर्वी निविदेस स्थायी समितीची मंजूरी घेतली नाही.

३) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए २००८/प्र.क्र.४४६/वित्त-९ दि. २० जून, २००८ व सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक दि. १२ मार्च, २०१० अन्वये निविदेतील शर्ती व अटीनुसार बांधकाम विहीत मुदतीत पूर्ण करण्याचा कार्यक्रम देणे बंधनकारक असतांना त्यानुसार कार्यवाही झाली नाही.

४) प्रथम व दुसरे धावते देयकानुसार १२५ % चे अधिन राहून रुपये ३९,४७,८२९/- प्रदान केले त्यापुढील प्रदानास बी-१ करारनाम्यातील खंड ३८ (२) नुसार सक्षम मंजूरी प्राप्त केली नाही. शेडयूल बी चे किंमतीपेक्षा रुपये ३,०६,७३४/- जादा प्रदान केलेली रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

५) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग शासन, परिपत्रक संकिर्ण-२००९/(४६५/ २००९)औप्र-२ दिनांक १५ जानेवारी, २०१० मधील परिच्छेद क्र. २ अन्वये वाढीव बाबनिहाय परिमाणास महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखांसहिता, १९६८ चे नियम ११४ व १५३ नुसार कार्यवाही केली नाही.

६) काम पुर्ण करण्याची मुदत १५ डिसेंबर, २०१२ रोजी संपली असून काम पुर्ण झाले नाही. संबंधिताने मुदतवाढीचा अर्ज सादर केला नाही. करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार मुदतवाढीसाठी दंडनिय आकारणी होणे आवश्यक आहे.

७) महाराष्ट्र शासन, वनविभाग, अधिसूचना गौण खनिज १०/१००९/प्र.क्र.३०९/ख (१) दि. ११ फेब्रुवारी, २०१० नुसार प्रथम देयकातून गौण खनिज कराची कपात केली नाही.

८) कंत्राटदाराचे देयकातून १ % विमा रक्कम रुपये ३९,४७८/- कपात केली नाही. ती वसूल होणे आवश्यक आहे.

९) महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक संकिर्ण २०१०/(५७०/२०१०) मोप्र-२ दि. २० ऑक्टोबर, २०१० अन्वये विभागाने कार्यवाही केली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) पाझर तलाव दुधखेडा ता.जि. वाशिम चे कामास आवश्यक लघु पाटबंधारे योजना या लेखाशिर्षा अंतर्गत सन २००८-०९ ते २०१०-११ या आर्थिक वर्षामध्ये पुरेसा निधी उपलब्ध नव्हता. तथापि, मार्च, २०११ मध्ये योजने करीता पुरेसा निधी प्राप्त होताच कामाची निविदा माहे जून, २०११ मध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे.

| अ. क्र. | बाब | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १) | मुळ निविदा किंमत (सन २००७-०८ चे दरसुची नुसार) | रु. २९,१२,८७६ |
| २) | प्रचलित सन २००९-१० चे दरसुची नुसार निविदेची किंमत | रु. ४१,५८,०१७ |
| ३) | कंत्राटदारोचे ६१.००% ज्यादा दरानुदार येणारी निविदा किंमत | रु. ४६,८९,८३० |
| ४) | कंत्राटदाराची वाटाघाटी नुसारची स्विकृत निविदा दरानुसारची मुळ निविदा किंमत | रु.४२,२६,८७४ |
| ५) | प्रचलित दरसुची नुसार निविदा किंमत व स्विकृत निविदा किंमती मधील फरक | रु.६८,८५७ |

शासन निर्णय दि. २४ मे, १९८९ मधील आदेश १३९ (१) (३) नुसार सदर वाढीची किंमत ही मुळ निविदा किंमतीच्या २.०० % जास्त परंतु रु. १.०० लक्ष पेक्षा कमी असल्याने नियम १३९ (१) (३) चे अनुषंगाने कंत्राटदाराची प्रचलित दरसूची नुसारची १.६५% (ज्यादा) दराची निविदा स्वीकृत करण्यात आली असल्याने वित्तीय नियमाचा भंग झाला नाही.

२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे नियम ७९ (क)-२ नुसार व महाराष्ट्र शासन राजपत्र चे भाग चार नुसार, जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेस स्थायी समितीचे अधिकार देण्यात आले आहे.

शासन निर्णय दिनांक १५ जुलै, २००८ नुसार जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती रु. ५०.०० लक्ष पर्यंतच्या मर्यादीत रक्कमेच्या निविदा स्विकृतीस सक्षम असल्याने पाझर तलाव दुधखेडा ता.जि. वाशिम ची निविदा जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीने दि. २२ सप्टेंबर, २०११ च्या सभेमध्ये मंजुर केली आहे.

३) विभागाचे पत्र दि. २२ डिसेंबर, २०११ नुसार कंत्राटदाराकडून काम पुर्ण करण्याबाबतचे नियोजन व कालबध्द कार्यक्रम प्राप्त करुन घेवून विहीत मुदतीत दि. १२ डिसेंबर, २०१२ ला काम पूर्ण करुन घेण्यात आले आहे.

४) करारनाम्यातील कलम ३८ (२) नुसार १२५ % पेक्षा अधिक वाढीव बाबीस अधीक्षक अभियंता यांचे आदेश क्र. ३४३० दि. १२ ऑगस्ट, २०१४ नुसारचे मंजुरी नंतरच प्रमाणक क्र. ९०६ दिनांक ०८ जानेवारी, २०१५ नुसार रुपये ११,०३,५७०/- चे वाढीव बाबी अंतर्भुत असलेल्या देयकाची अदायगी करण्यात आली आहे. कलम ३८ (२) नुसार १२५ % पेक्षा अधिक वाढीव बाबीस सक्षम प्राधिका-यांनी मंजुरी दिली असल्याने रु. ३,०६,७३४/- ते ज्यादा प्रदान झालेले नाही.

५) पाझर तलाव दुधखेडा चे कामाचे सुधारित अंदाजपत्रक रु. ७३,८५,४००/- यांस जि.प. सर्वसाधारण सभा दि. २५ फेब्रुवारी, २०१४ ठराव क्रमांक ८ (१०) नुसार सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे व अधिक्षक अभियंता यांनी आदेश क्र. ३८७ दि. १२ सप्टेंबर, २०१४ नुसार सुधारित तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे.

उपरोक्त नुसार शासन परिपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग दि.१५ जानेवारी, २०१० तसेच लेखा संहिता, १९६८ चे नियम ११४ व १५३ नुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

६) कंत्राटदारास निर्गमित केलेल्या कामाचे आदेशानुसार कंत्राटदाराने १२ महिन्यांचे मुळ मुदतीत म्हणजेच दिनांक १५ डिसेंबर, २०१२ पर्यंत काम पुर्ण करणे आवश्यक होते. त्यानुसार कंत्राटदाराने दि. १२ डिसेंबर, २०१२ ला म्हणजेच मूळ मुदत संपण्यापुर्वीच काम पुर्ण केलेले असल्याने कंत्राटदाराने अर्जाव्दारे मुदतवाढ मागणी करण्याचा व पर्यायाने दंडनिय मुदतवाढ मंजुरीची आवश्यकता निर्माण झाली नाही.

७)

| अ. क्र. | बाब | गौण खनिजाची कपात केलेली रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रथम धावते देयकातुन | रु.४,२३,९४५/- |
| २ | व्दितीय धावते देयकातून | रु. १२,४४,८१८/- |
| ३ | तृतीय व अंतीम देयकातून | रु. २,४१,२५६/- |
| | **एकुण ...** | **१९,१०,०१९/-** |

वरीलप्रमाणे एकुण २७०४३.४७ घ.मी.गौण खनिजाची रु. २००/- प्रति ब्रासनुसार एकूण रु. १९,१०,०१९/- एवढया पुर्ण रक्कमेची कपात केली आहे.

८) कंत्राटदाराने कामाचा विमा भरुन विभागास सादर केल्यामुळे कंत्राटदाराचे देयकातून १% विमा रक्कम रुपये ३९४७८/- ची कपात करण्यात आली नाही. कंत्राटदाराने सादर केलेल्या विम्याची प्रत दप्तरी उपलब्ध आहे.

९) अंदाजपत्रकास सुधारित तांत्रिक मान्यता देतांना वहन अंतराबाबत खात्री करुन प्रमाणित केल्यानुसार सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे शासन परिपत्रक संकिर्ण २०१०/(५७०/२०१०) मोप्र-२ दिनांक २० ऑक्टोबर, २०१० अन्वये विभागाने कार्यवाही केलेली आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

वाशिम जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सन २००८-०९ ते सन २०१०-११ या वित्तीय वर्षामध्ये किती अनुदान प्राप्त झाले होते, पुरेसे अनुदान उपलब्ध नसताना प्रशासकीय मान्यता कशी घेण्यात आली, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय दिनांक २४ मे, १९८९ नुसार सुधारीत प्रशासकीय मान्यता ३ महिन्याच्या आत घेणे बंधनकारक आहे, ती घेण्यात आली आहे काय, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत, सन २००८-०९ मध्ये उपलब्ध अनुदानाचे नियोजन कसे केले होते, अंदाजपत्रक सन २००८-०९ चे असताना सन २०११-१२ मध्ये निविदा कार्यवाही करण्यापूर्वी सदर अंदाजपत्रक सुधारीत करुन सक्षम प्राधिकारी यांची मान्यता घेऊन निविदा प्रसिध्द का करण्यात आली नाही, कामाला सुधारित मान्यता आहे का, यावर कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग यांनी समितीस विदित केले की, कामाला सुधारित

मान्यता दिनांक १४ ऑगस्ट, २००९ रोजी दिली आहे. मुळ तांत्रिक मान्यता दिनांक ८ ऑगस्ट, २००८ मध्ये २९ लाख रुपयांची दिली आहे. सुधारित तांत्रिक मान्यता दिनांक १२ सप्टेंबर, २०१४ रोजी दिली आहे.

यावर समितीने पुढे विचारणा केली की, जिल्हा परिषदेने दिलेल्या टेबलमध्ये ६१ टक्के जादा दरानुसार येणारी निविदा असे काय लिहिले आहे, यावर कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग यांनी समितीस विदित केले की, ठेकेदाराने निविदा ६१ टक्के दराने भरली होती, वाटाघाटीनंतर ४२ टक्क्यांनी काम दिले आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, निधी कोणत्या लेखाशीर्षांतर्गत येतो. लेखाशीर्षाचे नाव नमूद करावे. यावर कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग यांनी समितीस विदित केले की, २७०२ ७२४६ - लघु तलाव - पाझर तलाव, ० ते १०० असे लेखाशीर्ष आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, शासनाकडून आलेला डीपीडीसीचा निधी आहे. हा निधी लगतच्या २ वर्षांमध्ये खर्च झाला पाहिजे. तुम्ही प्रशासकीय मान्यता केव्हा दिली आहे, यावर कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग यांनी समितीस विदित केले की मूळ प्रशासकीय मान्यता दिनांक ३० जून, २००८ रोजी दिली आहे तर कार्यारंभ आदेश दिनांक १६ डिसेंबर, २०११ रोजी दिला आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २००८ ची प्रशासकीय मान्यता असताना सन २०११ ला कार्यारंभ आदेश देता येतो का, ४ वर्षे विलंब झाला आहे. दिनांक ३० जून, २००८ ला मुळ प्रशासकीय मान्यता दिली आहे आणि कार्यारंभ आदेश दिनांक १६ डिसेंबर, २०११ रोजी दिला आहे. आपण ते काम २ वर्षांत पूर्ण केले पाहिजे होते.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीस विदित केले की, प्रशासकीय मान्यता दिनांक ३० जून, २००८ रोजी दिली असली तरी सन २००८-०९ सन २००९-१० मध्ये निधी उपलब्ध झाला नाही. सन २०१०-११ मध्ये निधी उपलब्ध झाला आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, आपण निधी उपलब्ध झाला नाही तर थांबायचे होते. आपण दायित्व का निर्माण केले, निधी उपलब्ध झाला नसेल तर प्रशासकीय मान्यता देऊन असे दायित्व निर्माण करता येते का, उपलब्ध निधीच्या दीडपट दायित्व होईल. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, उपलब्ध तरतुदीच्या दीड पट दायित्व देतो. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, निधी नसताना प्रशासकीय मान्यता का दिली, मंजूर नियतव्यय होता का, शासनाच्या नियतव्ययाच्या अधीन राहून दायित्व वजा केले का, दायित्व वजा केल्यामुळे जिल्हा परिषदेकडे किती पैसे होते, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीस विदित केले की, शासकीय मान्यता सन २००८ ला दिली होती, मात्र त्याचा निधी उपलब्ध झालेला नव्हता. सन २०१०-११ ला ३.१५ कोटी रुपये निधी उपलब्ध झाला, मात्र तोही दिनांक ३१ तारखेला उपलब्ध झाला. त्यातील रुपये २.२१ लाख निधी खर्च झाला, ९२ हजार रुपये शिल्लक होते, त्यानुसार माहे जून, २०११ मध्ये या प्रकल्पाला मंजुरी दिली. यावर समितीने पुढे विचारणा केली की, आपण ज्यावेळी प्रशासकीय मान्यता दिली, त्यावेळी हे काम नियोजनामध्ये दीड पटीच्या अधीन राहून मंजूर होते का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीस विदित केले की, त्यावेळी निधीप्रमाणे दिले की नाही, हे तपासावे लागेल. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, दिनांक १ मार्च, २०११ ला मान्यता दिली असेल. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीस विदित केले की, प्रशासकीय मान्यतेला ५ वर्षांची वैधता आहे. त्यामुळे सन २०१३ पर्यंत प्रशासकीय मान्यता वैध आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, जिल्हा परिषदेने हे अभिलेख्यांवर दाखवावे. आपल्याला जिल्हा परिषदेचा पैसा २ वर्षांत खर्च करायचा आहे. मग ५ वर्षापर्यंत वैधता कशी राहील, सदर बाबतीत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सांगण्याची गरज आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले आहे, त्याप्रमाणे प्रशासकीय मान्यता ५ वर्षे वैध आहे का, काम निकृष्ठ झाले तर त्या संदर्भात कारवाई होईलच. २ वर्षांची मुदत असते. सन २०११ ला निधी दिला. सुधारित अंदाजपत्रक करुन प्रशासकीय मान्यता देऊन काम केले पाहिजे होते. तुम्ही जुन्याच प्रशासकीय मान्यतेच्या आदेशानुसार काम केले आहे. कामासाठी २४ महिन्यांचा काळ असेल आणि २ महिने शिल्लक असतील तर २ महिन्यांत किती पैसे खर्च करु शकता, हे आणि उर्वरित निधी कोणत्या वर्षांत द्यायचा आहे हेही, तुमच्या खाते प्रमुखांनी प्रशासकीय मान्यतेच्या आदेशात नमूद केले असेल.

यावर कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग यांनी समितीस विदित केले की, प्रशासकीय मान्यता ५ वर्षांसाठी असते, या संदर्भातील नियम १०३ असा आहे की, एखाद्या सार्वजनिक कामास दिलेली प्रशासनिक मान्यता किंवा अशा बांधकामाच्या अंदाजाला दिलेली तांत्रिक मंजुरी, ही सामान्यतः ती दिल्याच्या तारखेनंतर पाच वर्षांच्या कालावधीनंतर प्रवर्तनास असणार नाही. परंतु चालू कामावरील खर्चाकरिता ज्यात विशिष्ट तरतूद केलेली असेल असे अर्थसंकल्पीय अंदाज सक्षम प्राधिकाऱ्याने मान्य केल्यास, अशी मान्यता किंवा मंजुरी ज्या वर्षाकरिता अशी तरतूद केली असेल त्या वर्षाकरिता, पुनरुजिवित झाली आहे, असे समजण्यात येईल. यावर समितीने अशी विचारणा केली की, ते कामाच्या कालावधीसाठी असेल आणि ते कंटिन्युअन्स असेल तर ते आहे. कामाची किंमत किती आहे, यावर कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, कामाची किंमत रु.३९,४७,८२९/- आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ती दिल्याच्या तारखेनंतर पाच वर्षांच्या कालावधीनंतर प्रवर्तनास असणार नाही. परंतु चालू कामावरील खर्चाकरिता ज्यात विशिष्ट तरतूद केलेली असेल, असे म्हटले आहे. समितीने विचारणा केली की, सन २००८ मध्ये काय तरतूद केली होती, जेणेकरुन ५ वर्षांपर्यंत प्रशासकीय मान्यता ठेवली. त्याला सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता देखील असली पाहिजे. ती घेतली होती का, तुम्ही ५ वर्षांचे शोधून काढले आहे. ते मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी शोधून काढले पाहिजे होते. त्यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी सक्षम होते. त्यावेळी अर्थसंकल्पीत तरतूद किती होती आणि त्या अर्थसंकल्पिय अंदाजाला सक्षम प्राधिकाऱ्यांनी मान्यता दिली होती का, निधी नसेल तर २ वर्षांनंतर प्रशासकीय मान्यता आपोआप रद्द झाली आहे. मागच्या प्रशासकीय मान्यता ४-४ वर्षे पुढे सुरु ठेवत आहात. प्रशासकीय मान्यता दिली, त्यावेळी निधी दिलाच पाहिजे. एखाद्या सार्वजनिक कामास दिलेली प्रशासनिक मान्यता किंवा अशा बांधकामाच्या अंदाजाला दिलेली तांत्रिक मंजुरी, ही सामान्यतः ती दिल्याच्या तारखेनंतर पाच वर्षांच्या कालावधीनंतर प्रवर्तनास असणार नाही. परंतु चालू कामावरील खर्चाकरिता ज्यात विशिष्ट तरतूद केलेली असेल असे

अर्थसंकल्पीय अंदाज सक्षम प्राधिकाऱ्याने मान्य केल्यास, अशी मान्यता किंवा मंजुरी ज्या वर्षाकरिता अशी तरतूद केली असेल त्या वर्षाकरिता, पुनरुज्जीवित झाली आहे, असे समजण्यात येईल असा नियम आहे. प्रशासकीय मान्यतेचे आदेश दाखवावेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीस विदित केले की, सन २००८-०९ मध्ये १.७५ कोटी रुपये निधी लेखाशीर्ष २७६२ ला होता. तो खर्च झालेला आहे. इतरही कामे सुरु होती.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, अगोदरचे दायित्व होते. दायित्व असल्यानंतर त्या कामाला प्रशासकीय मान्यता कशी दिली, जिल्हा परिषदेने दायित्व वजा करुन प्रशासकीय मान्यता दिली पाहिजे होती. जिल्हा परिषदेने अभिलेखे दाखवावे. दायित्व वजा करुन शिल्लक राहिलेल्या रकमेच्या दीड पट पुनर्नियोजन करायचे असते. प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर सन २००९-१० च्या दरसूचीनुसार सन २०११ ला निविदा दिली. त्याला सन २००९-१० ची दरसूची वापरली. त्यामुळे १३ लाख रुपयांचे दायित्व वाढले, सीएसआर बदलला नाही. जिल्हा परिषदेचे १३ लाख रुपयांचे नुकसान केले आहे. हे सर्व ठेकेदाराबरोबर हातमिळवणी करुन केले आहे. निधी उपलब्ध नसताना प्रशासकीय मान्यता का दिली, प्रशासकीय मान्यता दिली, मात्र निधी उपलब्ध नाही. ३-४ वर्षे थांबून तीच सुधारित प्रशासकीय मान्यता ठेवली, तीच प्रशासकीय मान्यता देऊन सन २०११ मध्ये कार्यारंभ आदेश दिला. त्यामुळे ४ वर्षांत १३ लाख रुपयांचे दायित्व वाढले. तेव्हा सुध्दा दरसूची सन २००९-१० ची ठेवली आणि सन २०११ ला कार्यारंभ आदेश दिला. सन २०१२-१३ च्या लेखापरिक्षणात हा आक्षेप आला नसता तर आपण तसेच ठेवले असते. आपले या संदर्भात काय म्हणणे आहे, निधी उपलब्ध नसताना प्रशासकीय मान्यता दिली आहे. चार वर्षे उशिराने कार्यारंभ आदेश का दिला आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीस विदित केले की, याबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे, सन २००९-२०१० च्या दरसूचीप्रमाणे न करता सुधारित दरसूचीप्रमाणे करावयास पाहिजे होते, तसे केलेले दिसत नाही.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, संबंधित अधिकाऱ्याची चूक झालेली आहे, आपण त्यांच्यावर कोणती कारवाई केली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून आपण या बाबी कडे लक्ष देणे गरजेचे होते. सन २००८ ची प्रशासकीय मान्यता होती, २०११ मध्ये वर्क ऑर्डर दिली आहे, पहिल्या दरसूची प्रमाणे काम केले पाहिजे. त्याच कालावधीत त्यांनी काम केले असतानाही ३ वर्षाचा फरक का दिला आहे. सन २०११ मध्ये त्यांनी काम घेतले आहे. त्यांना वाढीव दर कसे दिले गेले. ज्या दराने काम घेतले त्या दराचे देयक काढले पाहिजे होते. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीस विदित केले की, मुळ निविदेची रक्कम रुपये २९ लाख १२ हजार ८६६ होती. या मुळ रकमेचे टेंडर काढले होते. ६१ टक्के टेंडर जादा भरले होते. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, समितीला ५० लाख रुपयांपर्यंत मर्यादा असतात. दिनांक २२ सप्टेंबर, २०११ रोजी समितीने मंजूरी दिली हे बरोबर आहे का, समितीला ३० लाख ते ५० लाख रुपये पर्यंतचे अधिकार आहेत. याबाबत दिनांक १५ जुलै, २००८ रोजीचा शासन निर्णय आहे. जिल्हा परिषदेने जल व्यवस्थापन समितीची बैठक घेतली आहे, असे उत्तर दिले आहे, या समितीला ५० लाखापर्यतचे अधिकार आहेत का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीस विदित केले की, दिनांक १९ मार्च, २००४ रोजीचे राजपत्र आहे. यामध्ये चार टीप दिलेल्या आहेत. महाराष्ट्र जिल्हा परिषद, पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम ९१ च्या तरतुदीच्या अधिन राहून जलसंधारण, पिण्याचे पाणी पुरवठा, समितीची प्रशासकीय मान्यता देण्यास व निविदा काढण्यासंदर्भात समितीच्या विषयासंदर्भात स्थायी समितीला देण्यात आलेल्या अधिकारांचा ती वापर करील.

यावर समितीने असे निदेश दिले की, पाझर तलाव, दुधखेडा येथील बांधकामाच्या अनियमितेबाबतचा विषय आहे. सन्माननीय सदस्यांनी बरेच प्रश्न उपस्थित केलेले आहेत. निधीच्या लेखाशिर्षाबाबत व पाझर तलावाचा हा विषय आहे. यासंबंधी कार्यारंभ आदेश सन २०१७ मध्ये देण्यात आलेला आहे. प्रशासकीय मान्यता सन २००८ मधील आहे. दोन वर्षात निधी वापरला पाहिजे, असे असताना चार वर्षे विलंब या प्रकरणी झाला आहे. विलंबाची कारणे सांगितलेली नाहीत. २९ लाखांची प्रशासकीय व तांत्रिक मान्यता असताना ६१ टक्के जादा दर निविदेमध्ये देण्यात आलेले आहेत. यामध्ये मोठया प्रमाणावर रक्कमेची अफरातफर व रकमेची वाढ तसेच आर्थिक अनियमितता झालेली आहे. याबाबत तात्काळ सखोल चौकशी करण्यात यावी. दोषींवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी, कार्यवाही करुन तसा अहवाल समितीला सादर करण्यात यावा. तसेच या संदर्भात जलसंधारण विभागाच्या विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली:-**

१) पाझर तलाव, दुधखेडा यांना दिनांक १६ डिसेंबर, २०११ रोजी कार्यारंभ आदेश प्राप्त झालेला असताना ४ वर्षात १३ लाख रुपयांचे दायित्व वाढण्याची कारणे काय आहेत, याप्रकरणी चौकशी करुन संबधितांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय, असल्यास त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

२) प्रशासकिय मान्यता सन २००८ ची असताना चार वर्ष विलंब झालेला असून २९ लाखांची प्रशासकिय व तांत्रिक मान्यता असतांना ६१ % जादा दर निविदेमध्ये देण्यात आल्याने व आर्थिक अनियमितता झाल्याने याबाबत समितीने दिलेल्या निदेशानुसार सखोल चौकशी करुन संबंधीत दोषी व्यक्तीविरुध्द जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय, असल्यास त्यानुसार केलेल्या कारवाईचा अहवाल समीतीस सादर करण्यात यावा ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पाझर तलाव दुधखेडा ता.जि.वाशिम कामाचे दायित्व खालील प्रमाणे वाढलेले आहे.

१) सदर कामाचे मंजूर अंदाजपत्रक सन २००७-०८ चे दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले असून यानुसार निव्वळ कामाची निविदा किंमत रु.२९,१२,८७६/- एवढी आहे.

२) निधी अभावी सदर कामाची निविदा व त्यानुसारचे काम हाती घेणे शक्य नसल्याने निधी उपलब्धतेनुसार सदर कामाची निविदा प्रत्यक्षात सन २०११-१२ मध्ये प्रसिध्दीस देवून निविदा मागविण्यात आल्या.

३) प्राप्त निविदापैकी मात्र सर्वात कमी दराची निविदा श्री. आत्माराम चव्हाण यांची ६१% जादा दराची होती.

४) ग्रामविकास विभागाचे शासन निर्णय दिनांक २४ मे, १९८९ नुसार निविदेत नमुद दर व प्रत्यक्षात निविदा मागवून मंजूर करावयाच्या कालावधीपर्यंत दरसुचीत बदल होऊन दरात बदल झाल्यास निविदा मंजूर करताना ठेकेदाराने निविदेत नमुद केलेल्या अधिकच्या दराची तुलना ती निविदा ज्यावर्षी मागविल्या त्या वर्षीच्या प्रचलित दरसुचीशी करावी व त्या नुसार महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखासंहिता व १९६४ चे नियम १३९ अंतर्गतच्या तरतुदीत देण्यात आलेल्या वित्तीय मर्यादा विचारात घेवून त्या निविदा मंजूर करण्यात याव्या असे नमुद आहे.

प्रस्तुत प्रकरणी वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली असून त्यानुसार सदर कामाची प्रचलीत सन २००९-१० ची दरसुची विचारात घेण्यात आली आहे. त्यानुसार सदर कामाची प्रचलीत दरानुसारची निविदा किंमत रु.४१,५८,०१७/- एवढी येते.

लेखा संहितेचे नियम १३९ (१) (३) नुसार २.००% वा रु.१.०० लक्ष यापैकी जी जास्त असेल ती या मर्यादेपर्यंत निविदा स्विकृत करता येते म्हणजेच (४१,५८,०१७+१,००,०००) = ४२५८०१७ (म्हणजेच प्रचलित दर सुचिच्या २.०६% जादा मर्यादेपर्यंत म्हणजेच रु.१.०० लक्ष चे मर्यादेत)

५) सदर प्रकरणी मुळ निविदा किंमतीच्या वाटाघाटी नुसार स्वीकृत निविदेची किंमत रु.४२,२६,८७४/- एवढी आहे व ती स्वीकृत देय मर्यादेपेक्षा रु. ३१,१४३/- ने कमी आहे. यामुळे मुळ निविदा किंमतीपेक्षा प्रत्यक्ष स्वीकृत करण्यात आलेल्या निविदा किंमतीत (४२,२६,८७४-२९,१२,८७६) उ १३,१३,९५८/- एवढी वाढ झाली असुन ती शासन निर्णय दि.२४ मे, १९८९ व लेखासंहिता नियम १३९ (१) (३) नुसार नियमानुकुल आहे. त्यामुळे कारवाई करण्यात आलेली नाही.

सदर कामाच्या चौकशीसाठी उप मुख्य वित्त व लेखा अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली उपजिल्हा जलसंधारण अधिकारी व सहाय्यक लेखा अधिकारी यांची चौकशी समिती स्थापन करण्यात आली होती. समितीने निविदेसंबंधित सर्व कागदपत्रांची पडताळणी करुन निविदा कार्यवाही नियमानुसार असल्याचा अहवाल दिला आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**मृद व जलसंधारण विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, वाशिम यांनी दिलेल्या माहितीशी सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने वाशिम जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीला सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी अशी माहिती दिली की, प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेपेक्षा जास्त दर निविदेमध्ये देऊन काम दिल्यासंबंधी मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. या संदर्भात जून २००७-०८ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. परंतु सन २००९-१० मध्ये निविदा काढल्यानंतर त्याच वर्षाची दरसूची वापरण्यात आली. त्यामुळे दोन्ही दरसूचीमधील फरक देत असताना लेखी स्पष्टीकरणात नमूद केले आहे की, लेखा संहितेचे नियम १३९ (१) (३) नुसार २ टक्के किंवा एक लाख रुपये यापैकी जी रक्कम जास्त असेल या मर्यादेत आपल्याला निविदा स्वीकृत करता येते. सदर काम ३१ हजार रुपयांच्या मर्यादेमध्ये झालेले आहे. ती रक्कम मर्यादेमध्ये आहे. तसेच समितीने त्यावेळी या संदर्भात चौकशी करण्याचे निदेश दिले होते. त्यानुसार सदर प्रकरणी उपमुख्य वित्त व लेखा अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन चौकशी करण्यात आली होती. समितीने सर्व कागदपत्रांची पडताळणी करुन निविदा कार्यवाही नियमानुसार असल्याचा अहवाल दिला आहे. यावर समितीने विभागीय सचिवांना अशी विचारणा केली की या संदर्भात त्यांचे समाधान झाले आहे काय, यावर सचिव, मृद व जलसंधारण विभाग यानी समितीला होकारार्थी आश्वासित केले.

**अभिप्राय व शिफारशी**

वाशिम जिल्हा परिषद सिंचन विभागाने पाझर तलाव दुधखेडा येथील बांधकामावर रुपये ३९,४७,८२९/- एवढा खर्च केला आहे. याबाबत पुढील प्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. सन २००८ मध्ये प्रशासकीय व तांत्रिक मान्यता असताना कामाची निविदा विलंबाने प्रसिध्द केली. कंत्राटदारास वाटाघाटीने ४५.११% जादाने काम देऊन वित्तिय नियमाचा भंग केला आहे. सदर निविदा मंजुरी तथा वाटाघाटीपूर्वी निविदेस स्थायी समितीची मंजूरी घेतली नाही. निविदेतील अटी व शर्तीनुसार बांधकाम विहित मुदतीत पूर्ण केले नाही. शेड्युल बीचे किंमतीपेक्षा रुपये ३,०६,७३४/- जादा प्रदान केलेली रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. काम पूर्ण करण्याची मुदत दिनांक १५ डिसेंबर, २०१२ रोजी संपली असून काम पूर्ण झाले नाही. संबंधिताने मुदतवाढीचा अर्ज सादर केला नाही. मुदत वाढीसाठी दंडनीय आकारणी होणे

आवश्यक आहे, उपरोक्त लेखा आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने घेतलेल्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, पाझर तलाव दुधखेडा येथील बांधकामाला मूळ प्रशासकीय मान्यता दिनांक ३० जून, २००८ रोजी दिली आहे. तर कार्यारंभ आदेश दिनांक १६ डिसेंबर, २०११ रोजी दिला आहे. सुधारित तांत्रिक मान्यता दिनांक १२ सप्टेंबर, २०१४ रोजी दिली आहे. ठेकेदाराने निविदा ६१ टक्के दराने भरली होती. वाटाघाटीनंतर ४२ टक्क्यांनी काम दिले आहे. २७०२ ७२४६-लघुतलाव-पाझर तलाव, ० ते १०० असे लेखाशीर्ष आहे. सदर कामास प्रशासकीय मान्यता दिनांक ३० जून, २००८ रोजी दिली असली तरी सन २००८-०९, सन २००९-१० मध्ये निधी उपलब्ध झाला नाही. सन २०१०-११ मध्ये निधी उपलब्ध झाला आहे. पुरेसे अनुदान उपलब्ध नसताना प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे ही बाब अनाकलनीय आहे. सन २०११-१२ मध्ये निविदा कार्यवाही करण्यापूर्वी सदर अंदाजपत्रक सुधारीत करुन सक्षम प्राधिकारी यांची मान्यता घेऊन निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच सन २००८ ची प्रशासकीय मान्यता असताना सन २०११ मध्ये जवळपास ४ वर्षे विलंबाने सन २०१०-११ मध्ये निधी उपलब्ध झाल्यावर कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे, याबाबत समिती आश्चर्य व्यक्त करीत आहे.

प्रशासकीय मान्यता ५ वर्षापर्यंत पुढे सुरु ठेवण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता असली पाहिजे. मुख्य कार्यकारी अधिकारी सक्षम प्राधिकारी आहेत. निधी नसेल तर २ वर्षानंतर प्रशासकीय मान्यता आपोआप रद्द होते. प्रशासकीय मान्यता दिली त्याचवेळी निधी दिलाच पाहिजे. एखाद्या सार्वजनिक कामास दिलेली प्रशासनिक मान्यता किंवा अशा बांधकामाच्या अंदाजाला दिलेली तांत्रिक मंजुरी ही सामान्यतः ती दिल्याच्या तारखेनंतर पाच वर्षाच्या कालावधीनंतर प्रवर्तनास असणार नाही. परंतु चालू कामावरील खर्चाकरीता ज्यात विशिष्ट तरतुद केलेली असेल असे अर्थसंकल्पीय अंदाज सक्षम प्राधिकाऱ्याने मान्य केल्यास अशी मान्यता किंवा मंजुरी ज्या वर्षाकरीता अशी तरतुद केली असेल त्या वर्षाकरीता पुनरुज्जिवित झाली आहे असे समजण्यात येईल असा नियम आहे. जिल्हा परिषदेने दायित्व वजा करुन प्रशासकीय मान्यता दिली पाहिजे होती. दायित्व वजा करुन शिल्लक राहिलेल्या रकमेच्या दीडपट पुनर्नियोजन करणे आवश्यक असते. प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर सन २००९-१० च्या दरसूची नुसार सन २०११ मध्ये निविदा प्रसिध्द केली त्यामुळे रुपये १३ लाख दायित्व वाढले त्यामुळे जिल्हा परिषदेचे १३ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे हे सर्व ठेकेदाराबरोबर हातमिळवणी करुन केले आहे अशी शंका उपस्थित होते. याप्रकरणी संबंधित अधिऱ्यांकडून अक्षम्य चूक झाल्याचे दिसून येत आहे. **सदर प्रकरणी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन चौकशी करण्यात आली होती. या समितीने सर्व कागदपत्रांची पडताळणी करुन निविदा कार्यवाही नियमानुसार असल्याचा अहवाल दिला असला तरी पाझर तलाव दुधखेडा येथील बांधकामामध्ये अनियमितता झालेली आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. सबब, याबाबत तात्काळ सखोल चौकशी करण्यात यावी व सर्व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण चार

## जिल्हा परिषद, वाशिम

## अनुसूचित जाती/नवबौध्द लाभार्थ्यांना विशेष घटक योजनेंतर्गत ७५ टक्के अनुदानावर दुधाळ जनावरे गट पुरविणेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.७४९ (सन २०१२-१३)**

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी ७५% अनुदान रुपये ३१,८९८/- प्रमाणे विमासह एकूण ५० जनावरे रक्कम रुपये १५,९४,९००/- खर्च केला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) महाराष्ट्र शासन, कृषी पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो २०११/प्र.क्र./पदुम-४ दिनांक २२ नोव्हेंबर, २०११/विघयो/ओटीएसपी ०२ दुधाळ जनावर गट वाटप संदर्भात मार्गदर्शक तत्व क्रमांक ३३ नुसार जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी हे याजनेसंदर्भात आहरण व संवितरण अधिकारी नसतांना लाभार्थी हिस्साच्या रक्कमा शासकीय लेख्यामध्ये जमा करण्यात आले. तेव्हा शासन निर्णयाचे उल्लंघन करुन शासन अनुदानाच्या रक्कमा मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याद्वारे आहरीत करुन लेख्याबाहेर रक्कमा ठेवून नियमबाहय व्यवहार केले.

२) शासन निर्णय दिनांक १७ जानेवारी, २००१ अन्वये विहित केलेल्या वेळापत्रकामध्ये तसेच शासन निर्णय दिनांक ९ फेब्रुवारी, २००१ नुसार लाभार्थी निवडीची कार्यवाही होणे आवश्यक आहे. तसेच शासन निर्णय दिनांक २२ नोव्हेंबर, २०११ मधील मार्गदर्शक सूचना मुद्दा क्रमांक ६ नुसार माहे जून, जुलै, २०१२ पूर्वी लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त करुन लाभार्थी निवड करणे आवश्यक होते. परंतु लाभार्थी निवड समितीने दिनांक २८ डिसेंबर, २०१२ रोजी प्राप्त ३८७ पैकी १७९ लाभार्थी पात्र ठरवून पंचायत समिती निहाय मार्गदर्शक सूचनातील निकषानुसार ५० लाभार्थ्यांस लाभ देण्यास मंजुरी प्राप्त केली. सदर प्रक्रिया उशिराने केली असून लाभार्थीकडून हिश्याची रक्कम दिनांक ३१ डिसेंबर, २०१२ अन्वये निवडीचे पत्र देवून दिनांक १९ मार्च, २०१३ रोजी बँकेत जमा केली. लाभार्थी हिस्सा रक्कमेचे धनाकर्षजवळ पास दोन महिने विभागाकडे पडून असल्याचे दिसुन येते.

३) दुधाळ जनावर खरेदी शासन निर्णय दिनांक २२ नोव्हेंबर, २०११ मधील मुद्दा क्रमांक १२ व १३ नुसार केल्याचे सकृतदर्शनी अंमलबजावणी केल्याचे ऐवज दर्शविले. परंतु खरेदी समिती, लाभार्थी व विक्रेता हा प्रत्यक्ष नसुन (दलाल) एजन्सी मार्फत ठोक रकमी प्रदान जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी जिल्हयाबाहेरील दलालास केल्याने मार्गदर्शक तत्वाचे पालन केलेले नाही. सदर विक्रेत्याचे निविदा प्रक्रिया किंवा अधिकृत जनावर खरेदी एजंट असल्याचे नस्तीस कुठेही नोंदणीकृत असल्याचा पुरावा, कागदपत्रे नाहीत. अदा केलेल्या प्रदानावर नियमानुसार आयकर मुल्यवर्धीत कर व उपकर यांची कपात केलेली नाही.

४) संबंधीत जनावर एजंटला रक्कमा विभागाने धनादेशाद्वारे केवळ विना नोंदणीकृत रसीदवर प्रदान केले आहेत. शासन नियमानुसार कपात न केलेल्या रुपये १,६८,१७८/- रक्कमेची वसुली होणे आवश्यक आहे.

५) विभागाने प्रथम लाभार्थी रक्कम विमा कंपनीला पॉलीसी रक्कमेपेक्षा रुपये ४,८८८/- जादा प्रदान केल्याने वसुल होणे आवश्यक आहे.

६) अर्जाची पडताळणी केली असता सन २०१०-२०११ चा ७/१२, ८ अ व कांरजा येथील लाभार्थी अर्जास स्टॅम्प पेपरवर करारनामा केलेला नाही, तथा पावतीवर लाभार्थीचे सही अंगठा घेतला नाही (लाभार्थी ८) ७/१२ नसतांना दिलेला लाभ शासन निर्णय दिनांक २२ नोव्हेंबर, २०११ चे लाभार्थी निवड निकष अनु क्र. २ व ३ चा भंग केलेला आहे.

७) पशुधन विकास अधिकाऱ्याचे मुद्दा क्रमांक ११ नुसार MILK SOUNDNESS दुधाळ असल्याचे प्रमाणपत्र नमुद नाही. केवळ स्वास्थ्याबाबत दर्शविले आहे. त्यामुळे योजनेचा मुळ उद्देश सफल झाला नाही.

८) अर्जाची तारीख निहाय दिलेले लाभ व गावनिहाय, तालुकानिहाय स्वतंत्र नोंदवही ठेवल्याचे दर्शविले नाही.

९) मार्गदर्शक सूचनांचे मुद्दा क्रमांक २० नुसार लाभार्थीकडे वाटप केलेले दुधाळ जनावरांचे विहित टक्केवारीतील प्रत्यक्ष पडताळणी संबंधी अहवाल सादर केले नाही. त्यामुळे मुद्दा क्रमांक २१ नुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे.

१०) खरेदी करुन वाटप केलेल्या दुधाळ जनावरांची मुद्दा क्रमांक १५ अन्वये कार्यवाही करणे बंधनकारक ठरते परंतु ऐवज तपासणीत उपलब्ध झाले नाही.

११) शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक २० नुसार लाभार्थ्यांने अनुदानाचा गैरवापर केल्यास शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक २४ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

१२) शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक २७, २८ व ३० नुसार कार्यवाही होणे बंधनकारक ठरते.

१३) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचे नावे अनुदानाचे रक्कमा खर्ची टाकण्यात आल्या. परंतु लाभार्थी हिस्स्याचे प्रमाणक तसेच विम्याचे प्रमाणक खर्ची पडल्याचे नमुना ७ रोकडवहीमध्ये कुठेही उल्लेख नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, पुणे-७ यांचे पत्र जावक क्रमांक पशुधन-१/जि.०२ दु.ज.ग.वा.यो./मा.सु/८३७०-८४४५/२०११, पंस-१३, पुणे-०१, दिनांक १२ डिसेंबर, २०११ नुसार कार्यवाही करण्यात आली आहे

२) शासन निर्णय दिनांक २२ नोव्हेंबर, २०११ मधील मार्गदर्शक सुचना मुद्दा क्रमांक ६ नुसार, सदर योजनेचे लाभार्थी अर्ज, दिनांक १ जुलै, २०१२ ते ३१ जुलै, २०१२ पर्यंत करण्यासाठी वर्तमान पत्रात प्रेस नोट दिली व अर्ज पंचायत समिती स्तरावरुन माहे नोव्हेंबर,२०१२ अखेरपर्यंत या कार्यालयास प्राप्त झाले.

त्यानंतर सदर अर्जाची छाननी करुन दिनांक २८ डिसेंबर, २०१२ रोजी निवड समितीची सभा आयोजित करुन मंजूर निधीच्या अधिन राहून ५० लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यानंतर दिनांक ३१ डिसेंबर, २०१२ रोजी पंचायत समितीला मंजूर लाभार्थीकडून लाभार्थी हिस्सा भरुन घेण्याविषयी पत्र देण्यात आले. शासन निर्णय क्रमांक जिवायो-२०११/प्र.क्र.-३०५/पदुम-४ मुंबई-३२ दिनांक २२ नोव्हेंबर, २०११ मधील अट क्रमांक ८ नुसार लाभार्थीस लाभार्थी हिस्सा जमा करण्यास १ महिन्याची मुदत देण्यात आली. तसेच प्रतिक्षा यादीमधील लाभार्थींना लाभार्थी हिस्सा जमा करणेसाठी वेळ देण्यात येऊन दिनांक २७ फेब्रुवारी, २०१३ पर्यंत जमा झालेल्या धनाकर्षांची रोकडवहीवर नोंद घेवून दि. १९ मार्च, २०१३ ला रक्कम बँकेत भरण्यात आली.

३) शासन निर्णय दिनांक २२ नोव्हेंबर, २०११ अन्वये सदर योजनेअंतर्गत अट क्र.१२ नुसार दुधाळ जनावरांची खरेदी लाभार्थीचे पसंतीने विहीत खरेदी समितीमार्फत, जिल्हयाबाहेरील नामांकित पशुंच्या बाजारातुन खरेदी करण्यात आलेली आहे. ज्यांचेकडून खरेदी करण्यात आली त्यांना जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी जनावरांचे खरेदीची रक्कम शासकीय अनुदान व लाभार्थी हिस्सा एकत्रित करुन धनादेशाद्वारे अदा करण्यात आली.

योजनेच्या शासन निर्णयान्वये खरेदी करण्यात आलेल्या दुधाळ जनावरांचे विक्रेत्याकडून आयकर अथवा मुल्यवर्धीत कर कपात करण्याविषयी नमुद करण्यात आले नाही. तसेच दुधाळ जनावरांची खरेदी निविदा प्रक्रिया केलेल्या किंवा नोंदणीकृत विक्रेत्याकडून करावी असे सुचीत केलेले नाही. त्यामुळे कपात करण्यात आली नाही तसेच सदर विक्रेत्यासोबत दुधाळ जनावरे पुरविण्यासाठी कोणताही करार झालेला नसल्यामुळे टॅक्स कापण्यात आलेला नाही.

४) दुधाळ जनावरांची खरेदी ज्या विक्रेत्याकडून लाभार्थीचे पसंतीने खरेदी समितीने केली आहे. त्या विक्रेत्यांना विकलेल्या दुधाळ जनावरांचा मोबदला धनादेशाद्वारे केल्यानंतर त्याची पोहोचपावती विभागाने घेतली आहे. योजनेच्या शासन निर्णयामध्ये खरेदी करण्यात आलेल्या दुधाळ जनावरांचे विक्रेत्याकडून आयकर अथवा मुल्यवर्धीत कर कपात करण्याविषयी सुचित करण्यात आले नसल्यामुळे कपात केली नाही.

५) विभागाने विमा कंपनीला पॉलीसी रक्कमेपेक्षा केलेले जादा प्रदान रुपये ४,८८८/- वसुल करुन दिनांक १५ नोव्हेंबर, २०१४ रोजी चालनाद्वारे शासन खाती जमा करण्यात आले आहे. चालानप्रत दप्तरी उपलब्ध आहे.

६) कारंजा येथील ८ लाभार्थ्यांचा स्टॅम्प पेपरवर करारनामा दप्तरी उपलब्ध आहे. तसेच श्रीमती वनिता भारत इंगळे यांचा ७/१२ दप्तरी उपलब्ध आहे.अट क्रमांक ३ नुसार लाभ दिलेल्या ५० लाभार्थ्यांपैकी १८ महिला लाभार्थींना लाभ देण्यात आला आहे.

७) सदर योजनेमध्ये शेतकरी गाभण जनावरे खरेदी करणे पसंत करतात की जेणेकरुन जनावरे घरी आणल्यानंतर साधारणतः एक ते दोन आठवडयात वेतील, त्यामुळे खरेदी करतांना पशुधन विकास अधिकारी यांच्याद्वारे दिलेल्या च्छ्ग़्क़्क्च्च वर जनावर दुधाळ असल्याचे प्रमाणपत्रात नमूद होत नाही.

८) विभागाकडे गावनिहाय, तालुकानिहाय व वर्षनिहाय स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आली आहे.

९) मार्गदर्शक सुचनाप्रमाणे पशुधन विकास अधिकारी यांनी खरेदी केलेल्या दुधाळ जनावरांची २५ % पडताळणी केली आहे. तसेच जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी वाटप केलेल्या दुधाळ जनावरांची १० टक्के पडताळणी केल्याचे प्रमाणपत्र दप्तरी उपलब्ध आहे.

१०) खरेदी करुन वाटप केलेल्या दुधाळ जनावरांची मुद्दा क्रमांक १५ अन्वये महाराष्ट्र ॲनिमल आयडेंटीफिकेशन ॲड रेकॉडिंग ॲथॉरिटी यांचेकडे नोंदणी करण्यासाठी या कार्यालयाने जा.क्र.७०५/२०१३ दिनांक १५ मे, २०१३ अन्वये लाभार्थ्यांची यादी पाठविलेली आहे.

११) शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक २० नुसार पशुधन विकास अधिकारी (वि) यांनी केलेल्या पडताळणी दरम्यान सर्व जनावरे आढळून आली आहे. अनुदानाचा गैरवापर झाला नसल्यामुळे अट क्रं. २४ नुसार कार्यवाही करण्याची आवश्यकता भासली नाही.

१२) शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक २७, नुसार लाभार्थ्यांकडे पुरेशी जागा उपलब्ध असल्याबाबत ग्रामपंचायतचा नमुना ८ जोडलेला आहे. मुद्दा २८ नुसार स्थानिक पशुवैद्यकीय दवाखान्यामार्फत लाभार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात येते. मुद्दा क्र. ३० नुसार लाभार्थ्यांकडून विहित नमुन्यातील बंधपत्र घेण्यात आले आहे.

१३) शासन अनुदानाची रक्कम मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेकडे देयक सादर करुन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचे खात्यामध्ये जमा करण्यात आले. परंतु लाभार्थी हिस्सा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचे खात्यामध्येच जमा असल्यामुळे त्यांचेमार्फत संबंधीतांस अदा करुन नमुना ७ रोकडवहीमध्ये नोंद घेण्यात आलेली आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

वाशिम जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ च्या नियम ३ परिच्छेद १ व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनि,यम १९६१ च्या कलम १३० नुसार रक्कमा जिल्हा निधीमध्ये जमा करणे आवश्यक होते, सदर अनियमिततेबाबत काय कार्यवाही केली, कोणत्या वर्तमानपत्रामध्ये योजनेची माहिती प्रसिध्दी करण्यात आली, सदर योजनेंतर्गत किती प्रस्ताव प्राप्त झाले, करारनामा विहित मुदतीत का करुन घेण्यात आला नाही, लेखा परिक्षणाच्या वेळी करारनामा सादर न करण्याचे प्रयोजन काय होते, यावर प्रभारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस विदित केले की, वृत्तपत्रात जाहिरात दिली होती. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, आपण जाहिरात दिली नव्हती, प्रेस नोट दिली होती, असे म्हटले आहे. जाहिरात देणे आणि प्रेस नोट देणे वेगळे आहे, हे एकच कसे होऊ शकते, यावर प्रभारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस अशी माहिती दिली की, प्रेस नोट दिली होती. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, प्रेस नोट म्हणजे जाहिरात होऊच शकत नाही. प्रेस नोट लहान आकारात असते. उत्तरात लिहिले आहे की, सदर अर्जांची छाननी करुन दिनांक २८ डिसेंबर, २०१२ रोजी निवड समितीची सभा आयोजित करुन निधीच्या अधिन राहून ५० लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. निवड समिती कोणती होती, यावर प्रभारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस विदित केले की, शासन निर्णय दिनांक २२ नोव्हेंबर, २०११ नुसार निवड समितीचे अध्यक्ष जिल्हा परिषद उपायुक्त, सदस्य, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार अधिकारी असतात व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, सदस्य सचिव असतात, अशी समिती असते.

यावर संचालक, स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी समितीस माहिती दिली की, तांत्रिक अडचण आहे. लाभार्थी निवड करण्याकरिता वेगळी समिती आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ५० लाभार्थ्यांची निवड केली आहे. जिल्हा नियोजन समितीचा निधी आहे. जिल्हा नियोजन समितीच्या निधीला मंजुरी देण्याची, खर्च करण्याची पध्दत नियम ३.२ मध्ये दिली आहे, ती सर्व खात्यांसाठी व सर्व योजनांसाठी सारखी आहे. तरीही निवड समिती लावत आहात. लोकशाही सर्वात मोठी आहे, तरी परिपत्रक काढण्यात आले आहे, तांत्रिक मंजुरी देण्याचे अधिकार जिल्हा परिषदेचे आहेत. लाभार्थी पात्र आहे का, कागदपत्रे बरोबर आहेत का, हे तपासण्याचा अधिकार निकषांप्रमाणे आहे. पण लाभार्थ्याच्या निवडीला मंजुरी देण्याचे अधिकार हे त्या समितीला आहेत का, निवड समिती ठेवत आहात, निवड करणारे, निवड समितीला मान्यता देणारे कोण आहेत, लाभार्थी निवडीचे अधिकार निवड समितीला आहेत असे संचालक स्वतः सांगत आहेत. संचालक, लेखा व कोषागारे जे जिल्हा परिषदेच्या लेखापरीक्षणाचे सर्वात मोठे अधिकारी आहेत, ते सांगतात की, निवड करण्याचे अधिकार समितीचे आहेत. हे परिपत्रक कसे मान्य केले, प्रभारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस विदित केले की, शासन निर्णय होता. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, शासन म्हणजे निवडून दिलेले लोक असतात, जिल्हा परिषदेचे सदस्य असतात, त्यासाठी विषय समित्या आहेत. त्या त्या जिल्हा परिषद सदस्यांना त्या त्या मतदारसंघात हा अधिकार द्यायला पाहिजे होता. सदस्यांच्या सांविधानिक अधिकारांचा अधिक्षेप आहे. त्यामुळे समिती या विषयाच्या संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सन २०१२-१३ मध्ये अनुसूचित जाती / नवबौध्द लाभार्थ्यांना विशेष घटक योजने अंतर्गत ७५% अनुदानावर दुधाळ जनावर गट पुरविणे या योजनेंतर्गत कलम १३० नुसार रक्कमा जिल्हा निधीमध्ये जमा न करणे, सदर योजनेंतर्गत किती प्रस्ताव प्राप्त झाले आहेत, करारनामा विहित मुदतीत का करुन घेण्यात आला नाही याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन पुढे कोणती कारवाई करण्यात आली, याबाबतची माहिती समितीस देण्यात यावी ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

शासन निर्णय दिनांक २२ नोव्हेंबर, २०११ (परिशिष्ट क्र. ४.१) मधील अट क्रमांक ३३ नुसार व आयुक्त पशुसंवर्धन यांचे पत्र जा.क्र.पशुधन-१ /जि ०२ दु.ज.ग.वा.यो. /मा.सु. /८३७०-८४४५/ २०११ पसं १३, पुणे-१, दि.१२.१२.२०११ रोजीचे पत्रानुसार लाभार्थी हिश्याची रक्कम जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचे खात्यात जमा करण्यात आली होती. लेखापरिक्षकांनी आक्षेप नमुद केल्यानंतर वित्त विभागाशी ताळमेळ घेवून सन २०१३-१४ पासुन लाभार्थी हिस्स्याच्या रकमाचे धनाकर्ष जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचे नावे घेणे बंद करुन जिल्हा निधीमध्ये जमा करण्यात येत आहेत.

सन २०१२-१३ सदर योजनेसाठी एकूण ३८७ शेतकऱ्यांचे अर्ज प्राप्त झाले होते. त्यातून निवड झालेल्या ५० लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला होता. त्यापैकी ४२ करारनामे लेखा परिक्षण पथकास उपलब्ध वेळीच करुन देण्यात आलेली होती. केवळ कारंजा तालुक्यातील ८ लाभार्थीचे करारनामे लेखापरिक्षणास संबधितांनी सोबत आणलेली नसल्याने तपासणीस उपलब्ध झाले नाही.

करारनामे सादर न करणेबाबत महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार संबंधितास रुपये २५०००/- दंड व एक वार्षिक वेतन वाढ रोखणे बाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे.

प्रत्यक्ष अभिलेखे तपासणी करुन चौकशी केली असता सदर करारनामे विहित मुदतीतच घेण्यात आलेले असल्याचे करारनाम्याचे १०० रुपयाचे बॉण्ड पेपर, बाजार पावती व ताबा पावतीवरील तारखेनुसार खालीलप्रमाणे विहित मुदतीत केले असल्याचे आढळून आले आहे.परंतु अनावधानाने बाँड पेपरवर तारखेचा उल्लेख झालेला नाही. बॉण्ड पेपर, बाजार पावती व ताबा पावतीच्या छायांकित प्रति सोबत जोडण्यात आल्या आहेत.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**कृषी व पदुम (पशुसंवर्धन) विभागाचे अभिप्राय** :- सन २०१२-१३ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत अनुसूचित जाती जमातीच्या लाभार्थ्यांना ७५ टक्के अनुदानावर ०२ दुधाळ जनावरांचे गट वाटप करणे या योजनेअंतर्गत निवड झालेल्या लाभार्थ्यांकडील २५ टक्के हिश्याची रक्कम जिल्हा निधीमध्ये जमा करण्यात आलेली नव्हती ही बाब सत्य असून तद्नंतर सन २०१३-१४ पासून नियमितपणे लाभार्थी हिश्याची रक्कम जिल्हा निधीमध्येच जमा करण्यात येत आहे.

उपरोक्त योजनेअंतर्गत सन २०१२-१३ मध्ये एकूण ३८७ लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी या योजनेअंतर्गत उपलब्ध तरतूदीच्या अधिन राहून ५० लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली असून या ५० लाभार्थ्यांपैकी ४२ लाभार्थ्यांचे करारनामे लेखापरिक्षण पथकास उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. तथापि, कारंजा तालुक्यातील ८ लाभार्थ्यांचे करारनामे लेखापरिक्षण पथकास उपलब्ध करून न दिल्यामुळे पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती, कारंजा यांना महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम, १९३० मधील कलम ७ नुसार रू.२५,०००/- दंड भरणेबाबत दि.१८ डिसेंबर २०१८ रोजी नोटीस बजावण्यात आलेली आहे. तसेच, पशुधन पर्यवेक्षक यांची एक वेतनवाढ थांबविण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे.

या योजनेअंतर्गत लाभ दिलेल्या सर्व लाभार्थ्यांकडून विहीत मुदतीतच करारनामे करून घेण्यात आलेले असून अनावधानाने बंधपत्रावर करारनामा केल्याचा दिनांक नमूद करण्याचे राहून गेलेले आहे. भविष्यात करारनाम्याच्या मसूद्यात करारनामा केल्याचा दिनांक नमूद करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने वाशिम जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीला प्रधान सचिव, कृषी व पदुम (पशुसंवर्धन) विभाग यांनी अशी माहिती दिली की, सदर योजनेअंतर्गत ३८७ लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी योजनेअंतर्गत उपलब्ध तरतुदीच्या अधीन राहून ५० लाभार्थ्यांची निवड करण्यात आली होती. त्यापैकी ४२ लाभार्थ्यांचे करारनामे लेखा परीक्षण पथकास उपलब्ध करुन देण्यात आले होते. उर्वरित ८ लाथार्थ्यांचे करारनामे लेखा परीक्षण पथकास उपलब्ध करुन न दिल्यामुळे पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम, १९३० मधील कलम ७ नुसार २५ हजार रुपयांचा दंड भरण्याबाबत दिनांक १८ डिसेंबर, २०१८ रोजी नोटीस बजावण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी दिनांक २६ डिसेंबर, २०१८ रोजी २५ हजार रुपयांची दंडाची रक्कम भरली आहे. तसेच पशुधन पर्यवेक्षक यांची एक वेतनवाढ थांबविण्याची कारवाई करण्यात आली आहे. तसेच सदर योजनेअंतर्गत लाभ दिलेल्या सर्व लाभार्थ्यांकडून विहित मुदतीत करारनामे करुन घेण्यात आले असून अनावधनाने बंधपत्रावर करारनामा केल्याचा दिनांक नमूद करण्याचे राहून गेले होते. त्याबाबत संबंधितांना सूचना दिलेल्या आहेत. त्यानंतर सर्व कार्यवाही करण्यात आली आहे.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ८ लाथार्थ्यांचे करारनामे लेखा परीक्षण पथकास उपलब्ध करुन देण्यात आले नाही त्यावर कोणाचे नियंत्रण होते, सदर अभिलेखे जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाकडे उपलब्ध असणे अत्यावश्यक आहे. लेखा परीक्षणासंबंधी संबंधित खाते प्रमुखांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सूचना दिल्या असतील. लेखा परीक्षणाच्या वेळी संबंधित खाते प्रमुख व ज्यांच्या ताब्यात सर्व अभिलेखे असते ते लिपिक सुध्दा हजर असतील. परंतु लेखा परीक्षणाच्या वेळी संबंधितांनी ८ लाभार्थ्यांचे करारनामे उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्या खाते प्रमुखांनी संबंधितांवर कारवाई करावयास पाहिजे होती.

यावर जिल्हा आरोग्य अधिकारी (वाशिम) यांनी समितीस अशी माहिती दिली की, पंचायत समिती स्तरावर निधी दिला जात असतो. तसेच जिल्हा परिषदेमध्ये लेखा परीक्षण होण्यापूर्वी ८ दिवस अगोदर त्यांना सूचना देऊन सर्व कागदपत्रे व अभिलेखे घेऊन जिल्हा परिषदेमध्ये बोलाविले जाते. ५ पंचायत समित्यांनी सर्व अभिलेखे आणले होते, त्याप्रमाणे कारंजा तालुक्यातील पंचायत समितीने सुध्दा बंधपत्र वगळता सर्व अभिलेखे आणले होते. तसेच लेखा परीक्षण झाल्यानंतर त्यांनी बंधपत्र आणून दिले होते. परंतु त्यांनी लेखा परीक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात आली.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, लेखा परीक्षण झाल्यानंतर संबंधित पंचायत समितीने सदर अभिलेखे लेखा परीक्षणाच्या वेळी सादर न केल्याचे आपल्या निदर्शनास आले असेल. त्या दिवशी आपण यासंबंधी कारवाई केली होती काय, यावर जिल्हा आरोग्य अधिकारी (वाशिम) यांनी समितीस विदित केले की, लेखा परीक्षण झाल्यानंतर ३ महिन्यानंतर लेखापरिक्षणामधील मुद्यांमध्ये ही बाब निदर्शनास आली. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, आपल्याला आक्षेपाची पूर्तता करण्यासाठी ३ वेळा संधी दिल्यानंतर सुध्दा तुम्ही सदर आक्षेपाची पूर्तता केली नाही. मात्र त्यानंतर पंचायती राज समितीसमोर हा विषय आल्यानंतर आक्षेपाची पूर्तता करण्याची कार्यवाही करण्यात आली. अशा परिस्थितीत संबंधितांनी कर्तव्यात कसूर केल्यानंतर सुध्दा त्यांचे वेतन काढण्यात आले आहे. यावर जिल्हा आरोग्य अधिकारी (वाशिम) यांनी समितीस विदित केले की, लेखा परीक्षणाच्या वेळी त्यांनी बंधपत्र दाखविले नव्हते. इतर सर्व कागदपत्रे दाखविली होती.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सदर कागदपत्रे दाखविण्याची जबाबदारी कोणाची होती, यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस माहिती दिली की, लेखा परीक्षणाच्या वेळी ५० पैकी ४२ लाभार्थ्यांचे बंधपत्र दाखविण्यात आले होते. फक्त ८ लाभार्थ्यांचे बंधपत्र दाखविले नव्हते. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, मूळ मुद्दा असा आहे की, लेखा परीक्षण झाल्यानंतर आक्षेपांची पूर्तता करण्यासाठी ३ वेळा संधी मिळते. त्यावेळी यासंबंधी कोणतीही कार्यवाही केली जात नाही. तसेच पंचायती राज समितीसमोर सदर मुद्दा आल्यानंतर संबंधितांवर कारवाई केली जाते. त्यामुळे समितीसमोर सदर मुद्दा आल्यानंतर खाते प्रमुख जबाबदार आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी खाते प्रमुखांच्या कामांचे मूल्यमापन करीत असतात. परंतु अशाप्रकारे आक्षेप आल्यानंतर जिल्हा परिषदेकडून खालच्या स्तरावर काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केली जाते. अशाप्रकारे करण्यात आलेली कारवाई ही योग्य नाही. प्रत्येक प्रकरणाचा विचार केल्यास खालच्या स्तरावरील कर्मचाऱ्यावर कारवाई केल्याचे दिसून येत आहे. यावर प्रधान सचिव, कृषी व पदुम (पशुसंवर्धन) विभाग यांनी समितीस विदित केले की, एलडीओ हा वर्ग-१ दर्जाचा अधिकारी आहे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकारी हे खाते प्रमुखांच्या कामांचे मूल्यमापन करीत असताना खाते प्रमुखांच्या अधिनस्त असलेल्या कर्मचाऱ्यांकडून चूक झाल्यास त्यावेळी त्या कर्मचाऱ्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कारवाई करता येऊ शकते. परंतु पंचायती राज समितीसमोर साक्षीकरिता आल्यानंतर आपण यासंबंधी कारवाई करीत असल्यास त्यावेळी आपले खाते प्रमुख जबाबदार राहतील. ८ लाभार्थ्यांचे करारनामे नंतर दाखविले असल्यास त्या संदर्भात खालच्या स्तरावरील अधिकाऱ्यांवर कारवाई केली असल्यामुळे ती आपण मागे घ्यावी.

यावर प्रधान सचिव, कृषी व पदुम (पशुसंवर्धन) विभाग यांनी समितीस विदित केले की, लेखा परीक्षणाच्या वेळी कागदपत्रे दाखविले नसल्यास संबंधितांवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० मधील कलम ७ नुसार २५ हजार रुपयांच्या दंडांची कारवाई होऊ शकते. यावर समितीने अशी विचारणा केली की, सक्षम अधिकारी लेखापरिक्षण करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्र देत असतो. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर सदर कारवाई व्हावयास पाहिजे का, यावर संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय यांनी समितीस अशी माहिती दिली की, आम्ही लेखापरीक्षण मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे करीता असतो. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना मेमो देतो. आमच्या दृष्टीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दंड झाला पाहिजे.

यावर समितीने निदेश दिले की, मुख्य कार्यकारी अधिकारी कारवाई करतात. परंतु जे विभाग प्रमुख आहेत त्यांच्यामार्फत बैठका घेतल्या जातात. त्यांनी वेळेवर आक्षेपांची पूर्तता झाली की नाही हे पाहिले पाहिजे. कालमर्यादेत पूर्तता केली पाहिजे. जेणेकरुन अनियमितता होणार नाही व समितीसमोर लेखा आक्षेप येणार नाहीत. पूर्तता करण्यास विलंब झाल्यामुळे कारवाई करावी लागते. कारवाई करावयाची असेल तर तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर करण्यात यावी. कनिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई करु नये. विभागाच्या सचिवांनी विभागाच्या माध्यमातून सर्व जिल्हा परिषदांना परिपत्रक/पत्र पाठवून कळवावे की, लेखापरिक्षणाच्या संदर्भातील जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची असते. त्यांच्याकडून कालमर्यादेत आक्षेपांची पूर्तता झाली पाहिजे, जेणेकरुन लेखाआक्षेप येता कामा नयेत. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची जबाबदारी असल्यामुळे कनिष्ठ अधिकाऱ्यांना दोषी ठरविले जाते आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना मोकळे सोडले जाते, असे होता कामा नये. जे जे जबाबदार अधिकारी आहेत त्यांच्यावर जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. यादृष्टीने विभागाने सर्व जिल्हा परिषदांना परिपत्रक वितरीत करावे. यावर प्रधान सचिव, कृषी व पदुम (पशुसंवर्धन) विभाग यांनी समितीला होकारार्थी आश्वासित केले.

## अभिप्राय व शिफारशी

**अनुसूचित** जाती/नवबौध्द लाभार्थ्यांना विशेष घटक योजनेंतर्गत ७५ टक्के अनुदानावर दुधाळ जनावरे गट वाटप करण्यासाठी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी ७५ टक्के अनुदान रुपये ३१,८९८/- प्रमाणे (विम्यासह) एकूण ५० जनावरांकरिता रुपये १५,९४,९००/- एवढी रक्कम खर्च केली आहे. याबाबत पुढील प्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

कृषी व पदुम विभागाच्या दिनांक २२ नोव्हेंबर, २०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार २ दुधाळ जनावरे गट वाटपासंदर्भात पशुसंवर्धन अधिकारी हे सदर योजनेचे आहरण व संवितरण अधिकारी नसताना लाभार्थी हिश्श्याची रक्कम शासकीय लेख्यांमध्ये जमा करण्यात आली

तेव्हा शासन निर्णयाचे उल्लंघन करुन शासन अनुदानाच्या रकमा मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याद्वारे आहरीत करुन लेख्यांबाहेर रकमा ठेवून नियमबाह्य व्यवहार केले. माहे जून-जुलै, २०१२ पूर्वी लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त करुन लाभार्थी निवड करणे आवश्यक होते. परंतु लाभार्थी निवड समितीने दिनांक २८ डिसेंबर, २०१२ रोजी ३८७ पैकी १७९ लाभार्थी पात्र ठरवून मार्गदर्शक सूचनातील निकषानुसार ५० लाभार्थ्यांस लाभ देण्यास मंजुरी प्राप्त केली. सदर प्रक्रिया विलंबाने केली. दुधाळ जनावरे खरेदी सकृत दर्शनी दिनांक २२ नोव्हेंबर, २०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार केल्याचे ऐवज दर्शविले असले तरी खरेदी समिती लाभार्थी व विक्रेता हा प्रत्यक्ष नसून एजंटमार्फत केली आहे. जनावरे खरेदी एजंट नोंदणीकृत असल्याचा पुरावा कागदपत्रे नाहीत. एजंटला अदा केलेल्या प्रदानावर नियमानुसार आयकर मुल्यवर्धित कर व उपकर यांची कपात केलेली नाही, एजंटला धनादेशाद्वारे विना नोंदणीकृत पावतीवर प्रदान करण्यात आले आहे. त्यामुळे शासन निर्णयानुसार कपात नसल्याने रुपये १,६८,१७८/- रकमेची वसुली करणे आवश्यक आहे. कारंजा येथील लाभार्थी अर्जास स्टॅम्प पेपरवर करारनामा केलेला नाही, पशुधन अधिकाऱ्याचे जनावरे दुधाळ असल्याचे प्रमाणपत्र नाही, लाभार्थ्यांची गावनिहाय, तालुकानिहाय स्वतंत्र नोंदवही ठेवल्याचे दर्शविण्यात आले नाही, दुधाळ जनावरांचे विहित टक्केवारीतील प्रत्यक्ष पडताळणी संबंधी अहवाल सादर केले नाहीत.

उपरोक्त लेखा आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेने पाठविलेल्या लेखी खुलाशाच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, दुधाळ जनावरे गट वाटप योजनेसंदर्भात वर्तमानपत्रामध्ये जाहीरात न देता प्रसिध्दीपत्रक (प्रेस नोट) जाहीर करण्यात आले होते. प्रसिध्दी पत्रक जाहीरात होऊ शकत नाही. सदर दुधाळ जनावरे गट वाटपासाठी प्राप्त अर्जांची छाननी करुन दिनांक २८ डिसेंबर, २०१२ रोजी निवड समितीने निधीच्या अधिन राहून ५० लाभार्थ्यांची निवड करण्यात आली या निवड समितीमध्ये अध्यक्ष जिल्हा परिषद, उपायुक्त, सदस्य, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार अधिकारी व पशुसंवर्धन अधिकारी, सदस्य सचिव यांचा समावेश होता. सदर योजनेंतर्गत निवड केलेल्या ५० लाभार्थ्यांपैकी ४२ लाभार्थ्यांचे करारनामे लेखापरिक्षण पथकास उपलब्ध करुन देण्यात आले. उर्वरित लाभार्थ्यांचे करारनामे लेखापरिक्षण पथकास उपलब्ध करुन न दिल्याप्रकरणी पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० मधील कलम ७ नुसार रुपये २५०००/- दंड भरण्याबाबत दिनांक १८ डिसेंबर, २०१८ रोजी नोटीस बजावण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी दिनांक २६ डिसेंबर, २०१८ रोजी २५०००/- रुपये दंडाची रक्कम भरली आहे व पशुधन पर्यवेक्षक यांची एक वेतनवाढ थांबविण्याची कारवाई करण्यात आली आहे. सर्व लाभार्थ्यांकडून मुदतीत करारनामे करुन घेण्यात आले असून अनावधानाने बंधपत्रावर करारनामा केल्याचा दिनांक नमूद केल्याचे राहून गेले होते. त्यानंतर सर्व कार्यवाही करण्यात आली आहे. तथापि, ८ लाभार्थ्यांचे करारनामे उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्यावर खाते प्रमुखांनी कारवाई करणे अभिप्रेत होते. कारण लेखापरिक्षण झाल्यानंतर आक्षेपांची पूर्तता करण्यासाठी तीन वेळा संधी मिळते त्यावेळी यासंबंधी कोणतीही कार्यवाही केली जात नाही तसेच पंचायती राज समितीसमोर सदर मुद्दा आल्यानंतर संबंधितांवर कारवाई केली जाते. त्यामुळे समितीसमोर सदर मुद्दा आल्यानंतर खाते प्रमुख जबाबदार आहेत. **मुख्य कार्यकारी अधिकारी खाते प्रमुखांच्या कामांचे मुल्यमापन करीत असतात. परंतु अशाप्रकारे आक्षेप आल्यानंतर जिल्हा परिषदेकडून खालच्या स्तरावर काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केली जाते. प्रत्येक प्रकरणाच्या बाबतीत खालच्या स्तरावरील कर्मचाऱ्यावर कारवाई केल्याचे दिसून येते, त्यामुळे समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.**

प्रस्तुत **प्रकरणी ८ लाभार्थ्यांचे करारनामे नंतर दाखविले असल्यास त्यासंदर्भात खालच्या स्तरावरील अधिकाऱ्यांवर कारवाई केली असल्यामुळे ती मागे घ्यावी. कनिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई करु नये. विभागाच्या सचिवांनी विभागाच्या माध्यमातून सर्व जिल्हा परिषदांना परिपत्रक / पत्र पाठवून कळविण्यात यावे की, लेखापरिक्षणाच्या संदर्भातील जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची असते त्यांच्याकडून कालमर्यादेत आक्षेपांची पूर्तता झाली पाहिजे. जेणेकरुन लेखा आक्षेप येता कामा नयेत. जे जबाबदार अधिकारी आहेत त्यांच्यावर जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. त्यादृष्टीने ग्रामविकास, कृषी व पशुसंवर्धन विभागाने सर्व जिल्हा परिषदांना परिपत्रक/पत्र वितरीत करण्यात यावे, अशी समिती शिफारस करीत आहे व त्यानुसार यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दोन महिन्याच्या आत समितीस सादर करण्यात यावा.**

## प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, वाशिम

## २०% जिल्हा/वन महसूल निधी अंतर्गत मागासवर्गीयांना पेट्रोकेरोसिन इंजिन पुरविणेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.८९०/२ (सन २०१२-१३)**

जिल्हा परिषद उपकर निधीमधून पेट्रोकेरोसिन इंजिन वाटप योजनेसाठी १६८ नग १७,८००/- प्रमाणे एकुण २९,९०,४००/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) २०% जिल्हा परिषद उपकर अंतर्गत मागासवर्गीयांना पेट्रोकेरोसिन इंजिनासाठी सन २०१२-१३ मध्ये रुपये २९,९०,४००/- खर्च करण्यात आला. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.झेडपीए-२००८/प्र.क्र.४४६ दिनांक २० जून, २००८ मधील परिशिष्ट इ मधील दिलेल्या वेळापत्रकानुसार योजना राबविण्यात आली नाही.

२) मुळ नस्ती सोबत लाभार्थ्यांची यादी नाही. तसेच शेतक-यांना पेट्रोकेरोसिन इंजिन मिळाल्याची पोहोच प्राप्त झाल्या नाही.

३) पेट्रोकेरोसिन इंजिन १६८ नग खरेदी केलेले आहेत. परंतु प्रत्यक्ष टिपणी व वाटप केवळ १६७ नग करण्यात आले. १ पेट्रोकेरोसिन इंजिन कमी वाटप करण्यात आले. त्यामुळे रक्कम रुपये १७,८००/- वसुल करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) या विभागाचे पत्र क्र. २१७७ दि. २९ ऑगस्ट, २०१२ नुसार योजनेची प्रसिध्दी करणेकरीता व ग्रामीण भागातील अर्जदारांकडून अर्ज विहीत मुदतीत मागविणेकरीता वर्तमानपत्रात प्रसिध्दी देण्यात आली. प्राप्त अर्जदारांमधून समाज कल्याण समिती सभा दि. १६ मार्च, २०१३ ला व जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दि. १९ मार्च, २०१३ ला लाभार्थी निवड यादीला मंजुरी प्राप्त झाल्यामुळे वेळापत्रकाचे पालन करता आले नाही.

२) सद्य:स्थितीत लाभार्थी मंजूर यादी कार्यालयाचे दप्तरी उपलब्ध आहे. पंचायत समिती स्तरावर शेतकऱ्यांना साहित्य वाटप करतेवेळी साठा पंजीमध्ये साहित्य मिळाल्याबाबत लाभार्थ्यांची स्वाक्षरी घेवून साहित्याचे वितरण करण्यात आले आहे. साठा पंजी रजिस्टर दप्तरी उपलब्ध आहे.

३) पेट्रोकेरोसिन इंजिन करीता समाज कल्याण समिती सभा दि. १६/०३/२०१३ ठराव क्र. ३ अन्वये पंचायत समितीनिहाय एकुण १६८ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली होती. त्यानुसार लेखापरिक्षण दिनांकापूर्वी एकूण १६७ इंजिनचे वितरण झाले होते. उर्वरीत १ पेट्रोकेरोसिन इंजिन लेखापरिक्षणानंतर पंचायत समिती रिसोड ने वितरीत केले. करीता वसुलीची कार्यवाही करण्यात आली नाही.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

वाशिम जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, २० टक्के जिल्हा निधींतर्गत मागासवर्गीयांना पेट्रोकेरोसिन इंजिन पुरविणे बाबतीत माहिती देण्यात यावी. यावर प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, या योजनेंतर्गत १६८ लाभार्थ्यांची निवड झाली होती, सर्वांना वाटप झाले आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, वृत्तपत्रात जाहिरात दिली होती का, यावर प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस होकारार्थी उत्तर देत सोबत प्रत जोडली आहे असे सांगितले.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, तुम्ही तांत्रिक मंजुरी कशी दिली, पेट्रोकेरोसिन इंजिन खरेदीकरिता तुम्हाला केरोसिनची हमी कोणी दिली, आपल्याला केरोसिन काळ्या बाजारात देण्याची हमी दिली होती का, शेतकऱ्यांना केरोसिन कोण उपलब्ध करुन देणार होते, केरोसिन कोणत्या मार्केटमध्ये मिळते, यावर प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सदर योजना १५ लाख रुपयांची होती. त्यावेळी तत्कालिन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार होते. जिल्हा परिषदेकडून त्याची नस्ती सादर केली होती. तत्कालिन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक २६ मार्च, २०१३ रोजी तांत्रिक मान्यता दिली होती. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, खाते प्रमुखांव्यतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार नाहीत. यावर प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, तसा शासन निर्णय आहे.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत का, यावर प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, तसा शासन निर्णय आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, तांत्रिक मान्यता खातेप्रमुखांनी दिली पाहिजे. यावर प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस आश्वासित केले की, समितीस शासन निर्णय उपलब्ध करुन देण्यात येईल. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, तांत्रिक मंजुरी कधीही मुख्य कार्यकारी अधिकारी देऊ शकत नाहीत. खातेप्रमुखांनी दिली पाहिजे. यावर प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, त्यावेळी वित्तीय मर्यादेचे अधिकार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना होते. यावर समितीने अशी विचारणा केली की, ते अधिकार प्रशासकीय मान्यतेचे होते,

तांत्रिक मान्यतेचे नव्हते. यावर प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेचे अधिकार देखील अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, अधिकाऱ्यांनी योग्य खुलासा करावा. यावर प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सदरहू शासन निर्णय दिनांक ३१ जानेवारी, २०१३ रोजीचा आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम यांनी समितीस विदित केले की, शासन निर्णय दिनांक ३१ जानेवारी, २०१३ मधील भाग ४ मध्ये विकास योजनांच्या संदर्भातील तांत्रिक मान्यता देण्याचा अधिकार गट विकास अधिकारी ५ लाख रुपयांपर्यंत, जिल्हा परिषदेचे खातेप्रमुख ५ लाख रुपये ते १० लाख रुपयांपर्यंत, मुख्य कार्यकारी अधिकारी व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी १० लाख रुपये ते ५० लाख रुपयांपर्यंत आहेत. विकास योजनांच्या संदर्भात तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार आहेत. शक्यतो विभाग प्रमुखच प्रशासकीय मान्यता देतात, काही प्रकरणांत तांत्रिक मान्यता सुध्दा देतात. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यास मान्यता दिली. सदर प्रकरणी प्रारंभिक टिप्पणी सादर झाली असेल. यावर प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस होकारार्थी उत्तर देत सांगितले की, योजनेची अंमलबजावणी करण्याचा अधिकार जिल्हा समाजकल्याण समितीला आहे.

तद्नंतर समितीने अशी विचारणा केली की, इंजिन कोणत्या कंपनीचे आहे. यावर प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, होंडा कंपनीचे इंजिन आहे. यावर समितीने आक्षेप घेत विचारणा केली की, दिनांक ३१ जानेवारी, २०१३ रोजीच्या शासन निर्णयामध्ये गट विकास अधिकारी यांना ५ लाख रुपयांपर्यंत तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार दिले आहेत, विकास योजनेच्या संदर्भात ते तांत्रिक अधिकारी आहेत काय, मुख्य कार्यकारी अधिकारी व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना ५० लाख रुपयांपर्यंतचे तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार आहेत. सदरहू शासन निर्णय चुकीचा आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम यांनी समितीस विदित केले की, प्रत्येक योजनेला तांत्रिक मान्यता ही खातेप्रमुखांची नसते.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, अधिनियमाला अधिन राहून देता येते. मात्र जिल्हा परिषदेच्या खातेप्रमुखांचे अधिकार तांत्रिक मान्यता देण्याचे असतात. हे सर्व अधिनियमाला धरुन नाही. तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा परिषदेच्या खातेप्रमुखालाच आहेत, असे असताना, महाराष्ट्र शासनाने दिनांक ३१ जानेवारी, २०१३ रोजीचा शासन निर्णय निर्गमित करुन, ज्या अधिकाऱ्यांना संबंधित विभागाचे तांत्रिक ज्ञान नाही, त्यांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार दिलेले आहेत. ही कायद्याचा भंग करणारी बाब आहे.

तद्नंतर समितीने निदेश दिले की, मुद्दा क्रमांक २९, ३०, ३१ अशा ३ मुद्यांच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे तांत्रिक मान्यता देण्याच्या संदर्भात दिनांक ३१ जानेवारी, २०१३ रोजीचा शासन निर्णय आहे, त्यांमध्ये तांत्रिक बाबी माहित नसलेल्या अधिकाऱ्यांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार दिले आहेत, कायद्याच्या संदर्भात विसंगती निर्माण होत असल्यामुळे सुधारणा करण्याच्या संदर्भात पंचायती राज समिती त्या शासन निर्णयात सुधारणा व्हावी, या करिता संबंधित विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्याचे ठरवित आहे. लेखापरिक्षणाच्या वेळी नोंदवही उपलब्ध न करुन देणे, कागदपत्रे उपलब्ध न करुन देणे या संदर्भात संबंधित दोषींवर दंडात्मक कारवाई करणे गरजचे आहे. त्यामुळे सदर प्रकरणी सखोल चौकशी करावी, दंडास पात्र असणाऱ्यांकडून दंड आकारावा, त्यांच्या सेवापुस्तिकेत नोंद घ्यावी, त्यांची १ वेतनवाढ रोखण्यात यावी. समिती या प्रकरणाच्या संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

२०% जिल्हा/ वन महसूल निधी अंतर्गत मागासवर्गीयांना पेट्रोकेरोसिन इंजिन पुरविणे योजने बाबत :-

उपरोक्त मुद्यांच्या संदर्भात तांत्रिक बाबी माहिती नसलेल्या अधिकाऱ्यांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार दिल्याने त्या संदर्भात लेखापरीक्षणाच्या वेळी नोंदवही व कागदपत्रे उपलब्ध करून न देणे, संबंधित दोषींवर दंडात्मक कार्यवाही करून सेवापुस्तिकेत नोंद घेऊन एक वेतनवाढ रोखण्याबाबत समितीने दिलेल्या निर्देशानुसार सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीनुसार संबंधिताविरूध्द जबाबदारी निश्चित करून पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.झेडपिए-२०१२/प्र.क्र.६८०/वित्त-९ दिनांक ३१ जानेवारी, २०१३ चे भाग-४ नुसार विकास योजना यांचे संदर्भातील तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकारानुसार रु.१०,००,००१/- ते रु.५०,००,०००/- पर्यंतच्या योजनेस तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी /अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत. त्यानुसार सन २०१२-१३ मध्ये २०% जि.प सेस फंड अंतर्गत राबविण्यात आलेल्या मागासवर्गीय शेतकऱ्यांना पेट्रोकेरोसीन इंजिन पुरविणे ही योजना रु.२९,९९,९००/- ची असल्याने शासन निर्णयानुसार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांचे तांत्रिक मंजुरी आदेश क्र.५२२ दिनांक २६ मार्च, २०१३ अन्वये तांत्रिक मंजुरी घेण्यात आली आहे. शासन निर्णयानुसारच तांत्रिक मंजुरीची कार्यवाही करण्यात आली आहे.

२) लेखापरीक्षणाचे वेळी नोंदवही उपलब्ध करून न देणे, कागदपत्रे उपलब्ध न करून देणे या संदर्भात दोषींवर कार्यवाही करणेबाबत संबधित पंचायत समिती वाशिम, मालेगाव, रिसोड, कारंजा, मानोरा येथील संबधित तत्कालिन जबाबदार कर्मचारी यांचेकडून दंड आकारून त्यांचे सेवा पुस्तिकेत नोंद करून त्यांची एक वेतनवाढ रोखणेबाबत कार्यवाही करण्यात आली आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त -३) जिल्हा परिषद, वाशिम यांच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने वाशिम जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २२ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, उपरोक्त मुद्यांच्या संदर्भात तांत्रिक बाबींची माहिती नसलेल्या अधिकाऱ्यांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार दिल्याने त्यासंदर्भात लेखापरीक्षणाच्या वेळी नोंदवही व कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे, संबंधित दोषींवर दंडात्मक कार्यवाही करुन सेवापुस्तिकेत नोंद घेऊन एक वेतनवाढ रोखण्याबाबत समितीने दिलेल्या निर्देशानुसार सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानंतर त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीस विदित केले की, तांत्रिक मान्यता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिली होती. समितीचा आक्षेप असा होता की, तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार तांत्रिक अधिकारी यांच्याकडे असायला पाहिजेत. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे ते अधिकार असता कामा नये. शासन निर्णयानुसार १० लक्ष ते ५० लक्ष रुपयांपर्यंतच्या कामांना मुख्य कार्यकारी अधिकारी व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तांत्रिक मान्यता देतात. शासन निर्णयानुसार बरोबर कार्यवाही करण्यात आली आहे.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, हे कसे शक्य आहे, तांत्रिक मान्यता अतांत्रिक अधिकारी कशी काय देऊ शकतील. यासंदर्भात जस्टीफिकेशन समितीला सचिवांनी देणे अपेक्षित आहे. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, यामध्ये अतिरिक्त मान्यता, आर्थिक मान्यता व तांत्रिक मान्यता अशा तीन मान्यता असतात. प्रत्येक कामामध्ये या तिन्ही बाबी असायला पाहिजेत. बजेट विभागाने आर्थिक मान्यता द्यावी. त्यानंतर अंशतः मान्यता द्यावी व त्यानंतर तांत्रिक मान्यता दिली पाहिजे. या तिन्ही बाबी प्रत्येक योजनेत झाल्या पाहिजेत असा आपला आग्रह असतो. तांत्रिक मान्यता देण्याबाबत एखाद्या ठिकाणी काम पाहून मान्यता द्यावयाची नसली तरी आपण तांत्रिक मान्यता असा शब्दप्रयोग करतो व त्यानुसार तांत्रिक मान्यता देतो. या प्रकरणामध्ये तसे पाहिले तर तांत्रिक मान्यता देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची गरज आहे अशातला भाग नाही.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, पेट्रोकेरोसिन पंप किती हॉर्सपावरचा असायला पाहिजे. त्याचा वापर कसा असायला पाहिजे. त्या शेतकऱ्यांना रॉकेल कोठून मिळणार या बाबींची मान्यता म्हणजेच तांत्रिक मान्यता होय, रस्त्याच्या कामासाठी किती एमएमची गिट्टी वापरली पाहिजे. आणखी काय बाबी वापराव्या लागतात, त्यामध्ये रेती व सिमेंटचे प्रमाण काय या सर्व बाबींची तपासणी करणे म्हणजे तांत्रिक मान्यता होय. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला विदित केले की, रस्त्याच्या कामाच्या संदर्भात किती एमएमची गिट्टी असावी, तेथील जमीन कशी असावी, तेथे क्रश कसा तयार करणार यासाठी तांत्रिक मान्यतेची गरज आहे. पेट्रोकेरोसिन इंजिनचा विषय आहे, त्यामध्ये समितीने अशी विचारणा केली की, पेट्रोकेरोसिन पंप किती हॉर्सपावरचा असायला पाहिजे, हा तांत्रिक विषय होऊ शकतो. रॉकेल कोठून आणणार यासाठी तांत्रिक ज्ञानाची गरज नाही. शेतकरी कोणत्या कामासाठी त्याचा वापर करणार व त्यासाठी किती हॉर्सपावरचा पंप असायला पाहिजे हा भाग सोडला तर यासाठी तांत्रिक ज्ञानाची गरज नाही असे मला वाटते.

यावर समितीने निदेश दिले की, तांत्रिक मान्यता कृषी विभागाची असेल, पेट्रोकेरोसिन पंपासाठी असेल किंवा आणखी कोणत्याही कामासाठी लागत असेल तर ती फक्त तांत्रिक अधिकाऱ्यांनीच द्यावी. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तांत्रिक मान्यता देणे हे सर्वस्वी चुकीचे आहे. ज्यांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार आहेत त्यांनीच ती दिली पाहिजे. या प्रकरणात तसे न करता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या माध्यमातून तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे. पुढील काळात यामध्ये सुधारणा होणे अपेक्षित आहे. ज्यांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार आहेत त्यांनीच त्या कामाला तांत्रिक मान्यता दिली पाहिजे. हा विषय फक्त एकाच जिल्हा परिषदेचा नसून महाराष्ट्र राज्याच्या दृष्टीने हा महत्वाचा विषय आहे. पेट्रोकेरोसीन इंजिन हा विषय आहे, यामध्ये तपासणी करुन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. यापुढे अशी कोणतीही चुकीची बाब होता कामा नये.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, या प्रकरणात दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. सेवा पुस्तकात नोंद घेऊन त्यांची वेतनवाढ रोखण्यात यावी ही कार्यवाही करण्यात आली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम यांनी समितीस विदित केले की, सेवा पुस्तकात नोंद घेऊन एक वेतनवाढ थांबविण्यात आली आहे.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद उपकर निधीमधून पेट्रोकेरोसिन इंजिन वाटप योजनेसाठी रुपये १७,८००/- प्रमाणे १६८ नगासाठी एकूण २९,९०,४००/- एवढा खर्च करण्यात आला आहे. याबाबत पुढील प्रमाणे आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

२०% जिल्हा परिषद उपकर अंतर्गत मागासवर्गीयांना पेट्रोकेरोसिन इंजिन सन २०१२-१३ मध्ये ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक २० जून, २००८ मधील परिशिष्टामध्ये दिलेल्या वेळापत्रकानुसार योजना राबविण्यात आली नाही, मूळ नस्ती सोबत लाभार्थ्यांची यादी नाही तसेच शेतकऱ्यांना पेट्रोकेरोसिन इंजिन मिळाल्याची पोहोच प्राप्त झाली नाही. पेट्रोकेरोसिन इंजिन १६८ नग खरेदी केलेले आहेत, परंतु प्रत्यक्ष टिप्पणी व वाटप केवळ १६७ नग करण्यात आले. त्यामुळे १ पेट्रोकेरोसिन इंजिन कमी वाटप करण्यात आल्यामुळे रुपये १७,८००/- वसुल करणे आवश्यक आहे.

उपरोक्त लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, २० टक्के जिल्हा निधी अंतर्गत मागासवर्गीयांना पेट्रोकेरोसिन इंजिन पुरविणेबाबत वृत्तपत्रात जाहिरात दिलेली होती. सदर योजनेंतर्गत १६८ लाभार्थ्यांची निवड झाली होती. सर्वांना वाटप झाले आहे. समितीच्या मते पेट्रोकेरोसिन इंजिनकरिता तांत्रिक मंजूरी देण्यापूर्वी शेतकऱ्यांना केरोसिन उपलब्धता पेट्रोकेरोसिन पंप किती अश्व शक्तीचा असावा याबाबीची मान्यता म्हणजे तांत्रिक मान्यता आहे. तांत्रिक मंजुरी मुख्य कार्यकारी अधिकारी देऊ शकत नाहीत. तांत्रिक मंजुरीचे अधिकार खाते प्रमुखांना देणे आवश्यक हाते.

ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक ३१ जानेवारी, २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार विकास योजना यांच्या संबंधातील तांत्रिक मान्यता देण्याच्या अधिकारामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी / अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना रुपये ५० लाख पर्यंत गटविकास अधिकारी यांनी रुपये ५ लाख पर्यंत जिल्हा परिषदेचे खाते प्रमुख यांना रुपये ५,००,००१/- पासून रुपये १०,००,०००/- पर्यंत मर्यादा निश्चित केलेली आहे. तथापि, तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा परिषदेच्या खातेप्रमुखांनाच असणे आवश्यक आहे.

**प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तांत्रिक मान्यता देणे हे सर्वस्वी चुकीचे आहे. ज्यांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार आहेत त्यांनीच तांत्रिक मान्यता दिली पाहिजे असे असताना उपरोक्त शासन निर्णय निर्गमित करुन ज्या अधिकाऱ्यांना संबंधित विभागाचे तांत्रिक ज्ञान नाही, त्यांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार दिलेले आहेत ही बाब कायद्याचा भंग करणारी आहे. त्यामुळे यासंदर्भात विसंगती निर्माण होत असल्यामुळे उपरोक्त शासन निर्णयात सुधारणा करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

## प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, वाशिम

## ग्रामपंचायत चांडस ता.मालेगांव अंतर्गत दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत मर्यादेपेक्षा जास्त अनुदान देण्यातील अनियमिततेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.८९३/६ (सन २०१२-१३)**

ग्रामपंचायत, चांडस ता.मालेगाव यांच्या विहीर पाईप लाईन वस्ती सुधार योजनेअंतर्गत तरतुदीपेक्षा जास्त अनुदान देण्यात आले आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसु २०११/प्र.क.४४२/ अजाक दिनांक ५ डिसेंबर, २०११ (परिशिष्ट क्र. ६.१) नुसार जास्तीत जास्त रुपये २० लक्ष पर्यत मागील लाभार्थ्यांसहीत अनुदान देता येते. परंतु चांडस ग्रामपंचायतीला सन २००४-२००५ मध्ये रु.३ लक्ष व सन २००८-२००९ मध्ये २ लक्ष अनुदान देण्यात आले. उर्वरीत जास्तीत जास्त रुपये १५ लक्ष अनदान देणे आवश्यकता असतांना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांचे जा.क्र.जिप/सकवि/वदसू/५७३ दि.३० मार्च, २०१३ च्या पत्रान्वये रुपये १८ लक्ष अनुदान मंजुर करण्यात आले. त्यामुळे आवश्यक देय अनुदानापेक्षा रुपये ३ लक्ष अनुदान वसुल करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

ग्रामपंचायत चांडस ला सन २००४-२००५ मध्ये रु.३,००,०००/- व सन २००८-२००९ मध्ये २,००,०००/- अनुदान देण्यात आले व सन २०१२-२०१३ मध्ये पाणी पुरवठा योजनेसाठी रुपये १८,००,०००/- अनुदान मंजुर करण्यात आले. प्रत्यक्षात पाणी पुरवठा योजनेसाठी रु.१७,३७,७८५/- एवढा खर्च झाल्याने तेवढेच अनुदान देण्यात आले याप्रमाणे ग्रामपंचायत चांडस यांना त्यांच्या लोकसंख्येनुसार देय असलेल्या अनुदानापेक्षा रु.२,३७,७८५/- अनुदान जादा वितरीत करण्यात आले.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

वाशिम जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ग्रामपंचायत चांडस येथे दलित वस्तीची लोकसंख्या किती होती, व त्या नुसार काम मंजूर करण्यात आले आहे काय, जादा अनुदान रक्कम रुपये २,३७,८७५/- वसूल करण्यात आलेले आहेत काय, अनुदान वाटपाचे निकष काय आहेत, त्याप्रमाणे अनुदान वाटप केले आहे काय, सदर काम पूर्ण झाले आहे का, यावर प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, दिनांक १४ नोव्हेंबर, २००८ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे सदर कामाची मर्यादा १५१ लोकसंख्या व १० लाख रुपये होती. नंतर शासन निर्णयात सुधारणा झाली. दलित वस्ती लोकसंख्येच्या निकषानुसार २० लक्ष त्या वस्तीला दिल्यानंतर पाच वर्षे त्या दलित वस्तीला योजनेचा लाभ देऊ नये, इत्यादी बाबींचा उल्लेख आहे. तरीही या दलित वस्तीला सन २००२-२००३, सन २००८-२००९, सन २०१३-२०१४ मध्ये रक्कम देण्यात आलेली आहे. बृहत आराखडयापेक्षाही जास्त निधी येथे देण्यात आलेला आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, बृहत आराखडयात ५ वर्षाचा खर्च एकत्रित केला जातो. त्यापेक्षा जास्त असेल तर तो थांबविला जातो. यावर प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सन २०१३-२०१४ ते सन २०१७-२०१८ या पाच वर्षाबाबत ते माहिती देत आहेत. प्रभारी समाजकल्याण अधिकारी यांचेकडे तीन महिन्यांपासून या पदाचा कार्यभार आहे.

यावर समितीने विचारणा केली की, सदर कामास समाजकल्याण अधिकारी यांनी भेट देऊन अंतिम हप्ता दिलेला आहे का, भेट दिली असल्यास तशी नोंद ग्रामपंचायतीच्या भेट पुस्तिकेत शेरा दिला आहे का, कार्यकारी अभियंता यांनी ५ टक्के तपासणी केली आहे का, केली नसल्यास त्यांच्यावर कोणती प्रशासकीय कार्यवाही केली. गट विकास अधिकारी ही भेटी देत नाहीत. सन २०१२-२०१३ चे लेखाआक्षेप आहेत की, त्यांनी किती कामांना भेटी दिल्या आहेत, यावर प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, चालू असलेल्या कामांना कार्यकारी अभियंत्यांनी भेट द्यावयाची आहे. १० टक्के भेटी समाजकल्याण निरीक्षकांनी द्यावयाच्या आहेत. यावर समितीने अशी विचारणा केली की, समाज कल्याण खात्याच्या अधिकाऱ्यांनी दलित वस्ती सुधार योजनेच्या किमान ५ टक्के कामांना तरी भेटी दिल्या आहेत का, यावर कार्यकारी अभियंता, (बांधकाम विभाग) यांनी समितीस विदित केले की, याबाबतचे अभिलेखे उपलब्ध नाही. उप अभियंता यांचेकडे अभिलेखे असते. कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग) चार महिन्यांपासून कार्यरत आहे.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, समितीचे या लेखा आक्षेपाला समर्थन आहे. दलित वस्ती सुधारणा योजनेच्या कामाचा दर्जा निकृष्ट आहे. याचे मुळ कारण कार्यकारी अभियंता, उप अभियंता हे कार्यालयामध्ये बसून स्वाक्षऱ्या करतात, त्यांनी या कामांना जास्तीत जास्त भेटी दिल्या पाहिजेत. याबाबत समाजकल्याण खात्याचे अधिकारी व कर्मचारी शिक्षेस पात्र आहेत. त्याला दुसरा काही इलाज नाही, अशी वाईट परिस्थिती आहे, समाजकल्याण अधिकाऱ्यांनी अधिक कामास भेटी दिल्या पाहिजेत.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, जिल्हा नियोजन समितीकडून सर्वात जास्त निधी दलित वस्ती सुधारणा योजनेस दरवर्षी येतो. त्यावेळी किती रक्कम आली होती, यावर प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, त्यावेळी ७ कोटी रुपये

रक्कम आली होती. यावर्षी १४ टक्के रकमेलाही ३० टक्के कट लागलेला आहे. ३० टक्के कट जनरल बजेटला आहे. म्हणजे सध्या ६० टक्के कट आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीस विदित केले की, पाच वर्षाचा बृहत आराखडा कसा धरायचा याबाबत खुलासा विचारणारे एक पत्र जिल्हा परिषदेने आयुक्त, समाजकल्याण विभाग, पुणे यांना लिहिले होते. बृहत आराखडा सुरुवातीपासून धरायचा असे त्यांचे पत्र आलेले आहे.

समितीने असे निदर्शनास आणून दिले की, सन २००८ च्या शासन निर्णयामध्ये याबाबत परिशिष्ट दिलेले आहे. त्यातून समाजकल्याण विभागाने ६० लाखाची मर्यादा केलेली आहे. पूर्वी एका गावामध्ये एकच वस्ती असायची, आता एका गावामध्ये पाच-पाच वस्त्या असतात. दोन पेक्षा अधिक दलित वस्तींकरिता शासनाने सन २००८ मध्ये निर्णय घेतला आहे. त्या गावात दलित वस्ती मोठया प्रमाणावर असेल तर त्यांना जास्त निधी मिळावा या करिता शासनाने हा निर्णय घेतला आहे. त्यास शेवटी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावयाची आहे. या प्रकरणी समाजकल्याण विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात येईल असे निदेश दिले.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, त्यावेळी कार्यकारी अभियंता यांनी जिल्हयातील सर्व कामांना भेटी दिल्या होत्या का, प्रवासाची रोजनिशी व भेट पुस्तिकेमध्ये नोंदी केल्या आहेत का, समाजकल्याण निरीक्षकांच्या रोजनिशीमध्ये किमान तशी नोंद असली पाहिजे. यावर तत्कालिन कार्यकारी अभियंता, बांधकाम यांनी समितीस विदित केले की, त्यावेळी ते त्याठिकाणी प्रभारी पदावर होते. आता ते अमरावती येथे कार्यकारी अभियंता या पदावर कार्यरत आहेत. यावर प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस विदित केले की, त्यावेळी पाणी पुरवठा योजनेचे दलित वस्तीमध्ये १८ लक्ष रुपयांचे काम झाले होते. पाणी पुरवठा विभागाचे तत्कालिन कार्यकारी अभियंता यांना माहिती आहे. यावर समितीने विचारणा केली की, संबंधित अधिकारी आजच्या बैठकीस उपस्थित आहेत का, काम तपासणीची जबाबदारी त्यांची होती. यावर प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग यांनी समितीस माहिती दिली की, तत्कालिन अधिकारी यांचा अपघात झाल्यामुळे ते आजच्या बैठकीस उपस्थित राहू शकलेले नाहीत.

यावर समितीने असे निदेश दिले की, ग्रामपंचायत चांडस, ता.मालेगाव अंतर्गत दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत जास्त अनुदान देण्यातील करारनाम्यामध्ये अनियमितता झाली आहे. कार्यकारी अभियंत्यांनी कामांना भेटी दिलेल्या नाहीत व त्यासंबंधी शेरे लिहिलेले नाहीत. या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सविस्तर चौकशी करुन त्यात जे अधिकारी दोषी आढळून येतील त्यांच्यावर कारवाई करुन त्यासंबंधीचा अहवाल समितीकडे सादर करावा. तसेच या प्रकरणी समाजकल्याण विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात येईल, असे निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

ग्रामपंचायत चांडस ता.मालेगाव अंतर्गत दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत मर्यादेपेक्षा जास्त अनुदान दिले आहे, यासंदर्भात करारनाम्यामध्ये अनियमितता झाली आहे, कार्यकारी अभियंता यांनी कामांना भेटी दिलेल्या नाहीत, याप्रकरणी सविस्तर चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीनुसार संबंधितांची जबाबदारी निशित करून त्यांचेविरुद्ध कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसु २००८/प्र क्र ५२४ वीघयो.१/दिनांक १४ नोव्हेंबर, २००८ (परिशिष्ट क्र. ६.२) चे परिशिष्ट अ मधील अनु.क्रमांक ४ नुसार मंजूर करण्यात आलेले अनुदान ५ वर्षाकरिता अनुज्ञेय आहे, त्यानुसार चांडस ग्रामपंचायतीची २००१ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जातीची लोकसंख्या ३४० असल्यामुळे त्यांना रुपय १०.०० लक्ष अनुदान अनुज्ञेय होते. शासन निर्णय, महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग क्रमांक दवसु २०११२/प्र.क्र.४४२/अजा दिनांक ५ डिसेंबर, २०११ नुसार अनुसूचित जातीची लोकसंख्या ३०१ च्या पुढे असल्यास त्या ग्रामपंचायतीला रुपये २०.०० लक्ष अनुदान अनुज्ञेय आहे.

सदर वस्तीला सन २००४-०५ मध्ये रुपये ३.०० लक्ष व सन २००८-०९ ते सन २०१३-१४ या बृहत आराखड्यानुसार सदर ग्रामपंचायतीला अनुसूचित जातीच्या लोकसंख्येनुसार रुपये २०.०० लक्ष अनुदान अनुज्ञेय होते. त्यानुसार सदर ग्रामपंचायतीला सन २००८-०९ मध्ये रुपये २.०० लक्ष अनुदान देण्यात आले व उर्वरित रुपये १८.०० लक्ष सन २०१२-१३ मध्ये असे एकूण रुपये २०.०० लक्ष अनुदान सन २००८-०९ ते २०१२-१३ च्या मंजूर बृहत आराखड्यानुसार ग्रामपंचायत चांडसला वितरीत करण्यात आले. तद्नंतर मा.आयुक्त समाज कल्याण यांचेकडे वस्तीला निधी मंजूर करताना व निधीची गणना करताना देय निधीचा कालावधी कोणता असावा (सन १९७४ पासून किमान ५ वर्षाचा कालावधी) याबाबत मार्गदर्शन मागविण्यात आले होते. त्यानुसार मा.आयुक्त समाज कल्याण यांचे पत्र जा.क्र.५३७ दिनांक ३० डिसेंबर, २०१७ नुसार लेखापरीक्षण/पंचायती राज समिती यांनी घेतलेला आक्षेप बरोबर असल्याचे नमूद केले होते. त्यानंतर पुनश्चः मा.आयुक्त समाज कल्याण यांचे पत्र जा.क्र.२८१ दि.२७ मार्च, २०१८ नुसार सद्यःस्थितीत गट वर्षासाठी (BLOCK YEAR) ५ वर्षे कालावधी विचारात घेऊन निधीचे वितरण करावे असे नमूद केले आहे, त्यामुळे सन २००८-०९ ते २०१२-१३ गट वर्षात सदर वस्तीला रुपये २०.०० लक्ष अनुदान वितरीत करण्यात आले आहेत. सोबत मा.आयुक्त यांचे पत्राची प्रत जोडण्यात येत आहे. त्यामुळे कोणावरही कार्यवाही करण्यात आली नाही. करीता अनुपालन सविनय सादर.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**समाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अभिप्राय :-जिल्हा** परिषद, वाशिम यांच्या अहवालाशी शासन सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने वाशिम जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २२ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, यामध्ये मर्यादेपेक्षा जास्त अनुदान देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे करारनाम्यात अनियमितता झाल्याचे भेटीच्या वेळी निदर्शनास आले आहे. यावर प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी समितीस विदित केले की, ग्रामपंचायत चांडस, ता.मालेगाव, जि.वाशिम यामध्ये जिल्हा परिषद वाशिमचा बृहत आराखडा सन २००८-०९ ते २०१२-१३ पर्यंत मंजूर होता. पाच वर्षातील कालावधीचा गट लक्षात घेतला तर सन २००८-०९ मध्ये २ लक्ष रुपये व सन २०१२-१३ मध्ये १८ लक्ष रुपये देण्यात आले आहे, त्यांची अनुदान मर्यादा २० लक्ष रुपये होती. पाच वर्षाच्या गटाचा विचार केला तर जे अनुदान देण्यात आले ते मर्यादेपेक्षा जास्त देण्यात आलेले नाही.

यावर समितीने असे निदेश दिले की, अशा प्रकारचे पत्र राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना देण्यात आलेले आहे. सन २०१३ च्या शासन निर्णयानुसार दर पाच वर्षांनी त्यासंदर्भातील आढावा घेतला पाहिजे. यासंदर्भातील पत्रक विभागाने काढलेले आहे. समितीच्या मनातील संभ्रम दूर करण्यासाठी यासंदर्भातील स्पष्ट शासन निर्णय सामाजिक न्याय विभागाने निर्गमित केला पाहिजे. पाच वर्षाचा कृती आराखडा तयार करण्यात येतो. एखाद्या दलित वस्तीमध्ये ५० पेक्षा जास्त लोकसंख्या असेल तर तेथे ५ लक्ष रुपये देण्यात येतात, १०० ते १५० लोकसंख्या असेल तर १० लक्ष रुपये देण्यात येतात. १५० लोकसंख्या असेल तर १५ लक्ष रुपये देण्यात येतात. १५० च्या वर लोकसंख्या असेल तर २० लक्ष रुपये एका दलित वस्तीसाठी देण्यात येतात. ५, १०, १५ व २० लक्ष रुपये हे त्या पाच वर्षात खर्च झाले पाहिजेत. त्याच्या अगोदर खर्च झाले असतील तर त्या पाच वर्षात निधी देऊ नये. हे बरोबर आहे की, सन १९७४ पासून हा सर्व कालावधी धरावा यातील काय बरोबर आहे.

यावर प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी समितीस विदित केले की, यासंदर्भातील पत्र आयुक्तांनी सर्व जिल्हा परिषदांना पाठविले होते. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन १९७४ पासूनचा विषय त्यावेळी उपस्थित करण्यात आला. सन १९७४ पासून आतापर्यंत एका दलित वस्तीमध्ये २३ लक्ष रुपये खर्च झाले होते. या आधारावर आयुक्तांनी एक पत्रक काढले व सर्व जिल्हा परिषदांना ते देण्यात आले. प्रत्येक पाच वर्षांनी बृहत आराखडा तयार केला पाहिजे. त्यासंदर्भातील शासन निर्णय आहे. यावर समितीने पुढे असे मत व्यक्त केले की, ज्या वस्तीसाठी १० लक्ष रुपये अनुदान देय आहे ते पाच वर्षात खर्च करावेत असे स्पष्ट आदेश सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने निर्गमित केले पाहिजेत.

यावर प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी समितीस विदित केले की, यासंदर्भातील स्पष्ट शासन निर्णय विभाग निर्गमित करीत आहे. त्यासंदर्भातील मसूदा तयार करण्यात आला आहे. मंत्री महोदयांकडे तो सादर करण्यात आला आहे. यावर समितीने असे निदर्शनास आणून दिले की, तत्कालिन प्रधान सचिव असताना दलित वस्तीत समाज मंदिर बांधण्यासाठी रक्कमेची मर्यादा ७ लक्ष रुपये होती. आता ती मर्यादा कमीत कमी १५ लक्ष रुपये करण्यात यावी. ७ लक्ष रुपयात समाज मंदिराचे बांधकाम होत नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव येथे उपस्थित आहेत. ७ लक्ष रुपयांमध्ये किती बाय किती क्षेत्रफळाच्या (एरियाच्या) समाज मंदिराचे बांधकाम होऊ शकते ते सचिवांनी सांगावे. माझ्या माहिती प्रमाणे ४०० ते ५०० फूट क्षेत्रफळापेक्षा (एरियापेक्षा) जास्त बांधकाम होऊ शकत नाही. एका व्यक्तीला बसण्यासाठी चार फूट जागा पाहिजे. यावर प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी समितीस विदित केले की, ही रक्कम पुर्नरिक्षित करण्यात येईल. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, समितीला स्पष्ट आश्वासन देण्यात यावे. सर्व गावासाठी एकच समाजमंदिर असावे असे शासन निर्णयात नमूद केले आहे. सर्व समाजाच्या लोकांनी त्याचा वापर करावा. ७ लक्ष रुपयांत किती स्क्वेअर फूटाचे बांधकाम होऊ शकते. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनीसमितीस विदित केले की, प्रति स्क्वेअर फूट ३५०० रुपयांचा दर गृहित धरला तर २०० स्क्वेअर फूट बांधकाम होऊ शकते. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ५० लोकवस्ती असेल तर २०० स्क्वेअर फूटाचे समाजमंदिर त्यांना योग्य होऊ शकते. त्यामध्ये पाहुण्यांसाठी टेबल खुर्च्या टाकल्या तर किती जागा शिल्लक राहू शकते. झोपायचे काम पडले तर किती स्क्वेअर फूट जागा लागेल. येथे तिन्ही विभागांचे सचिव आहेत, ७ लक्ष रुपयांची मर्यादा १५ लक्ष रुपये करण्यात येईल काय , यावर प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी असे मत व्यक्त केले की, यासंदर्भातील प्रस्ताव मंत्री महोदयांकडे सादर करावा लागेल. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, दलित समाजाच्या फायद्यासाठी निर्णय घेतले पाहिजेत. त्यांच्या वतीने आपण आश्वासन द्यावे. समितीने जो विषय उपस्थित केला त्यामध्ये समाजमंदिर बांधकाम योजनेत लोकसंख्येच्या आधारावर निधी दिला जातो. हा निधी कमी पडत असल्यामुळे सचिव म्हणून आपण निधी वाढविण्याचा प्रस्ताव मंत्री महोदयांकडे सादर करावा. पंचायती राज समितीची अशी शिफारस आहे असा त्यामध्ये उल्लेख करावा. पंचायती राज समितीची अशी शिफारस आहे की, मागासवर्गीय वस्तीमध्ये समाजमंदिर बांधण्यासाठी जी रकमेची मर्यादा ठेवण्यात आली त्यामध्ये वाढ केली पाहिजे. यामध्ये कमीत कमी मर्यादा १५ लक्ष रुपये करण्यात

यावी. अशी समितीची शिफारस आहे.  हा प्रस्ताव किती दिवसात तयार करण्यात येईल. यावर प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी समितीस असे आश्वासित केले की,  एक आठवड्याच्या आत प्रस्ताव तयार करुन कार्यवाही करतो. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, समाज मंदिर बांधकामाची रक्कम वाढविण्यासाठी आपण १५ दिवसांचा कालावधी घ्यावा. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागणार आहे त्याच्या अगोदर सन २०१८-१९ चा निधी रिलिज केला नाही तर पुढे विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागेल. दलित वस्ती सुधारणा योजनेचे पैसे वर्षभरात खर्च होणार नाहीत. यासंदर्भातील सूचना व शासन निर्णय तातडीने अंतिम करण्यात यावा. हा प्रश्न यासाठी उपस्थित करण्यात आला की, मागील एक वर्षाचा कालावधी त्या पत्रामुळे वाया गेलेला आहे. आयुक्तांच्या पत्रामुळे दलित वस्ती सुधार योजनेतील निधी खर्च होण्यापासून रोखला गेला आहे. मागासवर्गीय वस्त्यांचा विकास करण्याचे काम तेथे होत आहे. असे होता कामा नये.  या ५ वर्षात असे करावे की, ज्या दलित वस्तीला गेल्या १० ते २० वर्षात एका वेळीही पैसे देण्यात आले नाहीत त्यांना पैसे देण्यात यावे.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१२-१३ या वर्षामध्ये ग्रामपंचायत चांडस ता.मालेगाव यांच्या विहीर पाईप लाईन वस्ती सुधार योजनेंतर्गत तरतुदीपेक्षा जास्त अनुदान देण्यात आलेले आहे, याबाबत असे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत की, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ५ डिसेंबर, २०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार जास्तीत जास्त रुपये २० लक्षापर्यंत मागील लाभार्थ्यांसहीत अनुदान देता येते. परंतु चांडस ग्रामपंचायतीला सन २००४-२००५ मध्ये रुपये ३ लक्ष व सन २००८-२००९ मध्ये रुपये २ लक्ष अनुदान देण्यात आले. उर्वरित जास्तीत जास्त रुपये १५ लक्ष अनुदान देणे आवश्यक असताना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, वाशिम यांना रुपये १८ लक्ष अनुदान मंजूर करण्यात आले. त्यामुळे आवश्यक देय अनुदानापेक्षा रुपये ३ लक्ष अनुदान वसूल करणे आवश्यक आहे.

उपरोक्त लेखा आक्षेपावर जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, ग्रामपंचायत चांडस दलित वस्तीची लोकसंख्येनुसार देय असलेल्या अनुदानापेक्षा रुपये २,३७,,७८५/- एवढे अनुदान जादा वितरीत करण्यात आले. दिनांक १४ नोव्हेंबर, २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार सदर कामाची मर्यादा १५१ लोकसंख्या व रुपये १० लक्ष होती. नंतर शासन निर्णयामध्ये सुधारणा झाली त्यामध्ये दलित वस्ती लोकसंख्येच्या निकषानुसार रुपये २० लक्ष त्या वस्तीला दिल्यानंतर पाच वर्षे त्या दलित वस्तीला योजनेचा लाभ देऊ नये असा उल्लेख आहे. तरीही सदर दलित वस्तीला सन २००२-२००३, सन २००८-२००९ व सन २०१३-२०१४ मध्ये निधी देण्यात आलेला आहे. तथापि, जिल्हा परिषद वाशिमचा बृहत आराखडा सन २००८-२००९ ते सन २०१२-२०१३ पर्यंत मंजूर होता. पाच वर्षातील कालावधीचा गट लक्षात घेतला तर सन २००८-२००९ ते सन २०१२-२०१३ मध्ये १८ लक्ष रुपये देण्यात आले आहेत, त्यामुळे अनुदान मर्यादेपेक्षा जास्त देण्यात आलेले नाही.

**समितीच्या मते सन २०१३ च्या शासन निर्णयानुसार दर पाच वर्षानी राज्यातील सर्व जिल्हा परिषदांनी दलित वस्ती सुधार याजने संदर्भातील अनुदानाबाबत आढावा घेतला पाहिजे तसेच ज्या दलित वस्तीला गेल्या १० ते २० वर्षात एकदाही निधी देण्यात आलेला नाही त्या दलित वस्तीला प्राथम्यक्रमाने निधी देण्यात यावा व यासाठी सामाजिक न्याय विभागाने स्वयंस्पष्ट शासन निर्णय निर्गमित करावा. ज्या दलित वस्तीसाठी १० लक्ष रुपये अनुदान देय आहे ते पाच वर्षात खर्च करण्यास मुभा असावी असे स्पष्ट आदेश सामाजिक न्याय विभागाने निर्गमित करावेत तसेच दलित वस्तीत समाज मंदिर बांधण्यासाठी रक्कमेची मर्यादा रुपये ७ लक्ष होती आता ती मर्यादा कमीत कमी १५ लक्ष रुपये करण्यात यावी व उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण सात

## जिल्हा परिषद, वाशिम

## तेराव्या वित्त आयोगाच्या निधीतून केलेल्या बांधकाम खर्चातील अनियमिततेबाबत

## (पंचायत समिती कारंजा)

**परिच्छेद क्रमांक ४.१६७/१८ (सन २०१२-१३)**

पंचायत समिती, कारंजा अंतर्गत १३ वा वित्त आयोग निधी पंचायत समिती स्तरावर प्राप्त निधीचे अनुदानातून पंचायत सभागृहाने २९ कामांना मंजुरी दिल्यानुसार सदर बांधकामावर रुपये २,११,७८,९५८/- खर्च केला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) तेराव्या वित्त आयोगातील मार्गदर्शक सुचनांचे काटेकोर पालन केले नाही. महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्र. झेडपी- २००८/प्र.क्र. ४७२/ वित्त - ९(३३) दि.०९ फेब्रुवारी, २००९ (परिशिष्ट क्र. ७.१) नुसार ग्राम पंचायत बांधकामे पार पाडण्यास आर्थिक दृष्टया सक्षमतेबाबत खात्री न करता कामे दिली आहेत.

२) परिशिष्टानुसार कामाची विशेष दुरुस्ती व कामाची प्रत्यक्षात पाहणी न करता प्रत्यक्षात दुरुस्ती अनुरुप प्राकलन तयार करणे आवश्यक असतांना टाईप प्लॅन कामे केली आहेत. बाबनिहाय कमी जास्त परिमाणास सक्षम मंजुरी घेतली नाही.

३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता, १९६८ चे नियम १६७ व १६८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही केली नाही.

४) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. २०११/प्र.क्र २१/ पंरा-८ दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ (परिशिष्ट क्र. ७.२) नुसार अंशतः बांधकामे वगळता उर्वरित बांधकामाबाबत कार्यवाही केली नाही.

५) अदा केलेल्या १० बांधकाम देयकातून आयकर, सरचार्ज, विक्रीकर, विमा व संपूर्ण रॉयल्टी असे एकूण रुपये १,३२,७५७/- ची कपात केली नाही.

६) अंतिम देयकासोबत कमी जादा प्रमाणाबाबतचे विवरण पत्र जोडले नाही. वाढीव कामाची सक्षम मंजुरी घेण्यात आली नाही. बरेच कामात १२५% किंवा रुपये ५०००/- पेक्षा जास्त बाबनिहाय कामाचे परिमाण मुल्यानुसार विना मंजुरीने प्रदान केले आहे.

७) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता, १९६८ चे नियम १७४ नुसार पहिले व अंतिम बिल नमुना ५५ मध्ये व धावते देयक नमुना ५६ ते ५८ मध्ये काढणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही केली नाही.

८) काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र दर्शवून अंतिम बिले कामे पुर्ण होण्यापूर्वीच रक्कमांचे नियमबाहय प्रदान केले आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) शासन निर्णय दिनांक ०९ फेब्रुवारी, २००९ मधील दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार ज्या ग्राम पंचायतचे उत्पन्न रू. ५०,०००/- पर्यंत आहे, अशा ग्राम पंचायतींना रु. १०,००,०००/- पर्यंत कामे देता येतात, त्यामुळे ग्राम पंचायतीचे उत्पन्न ५०,०००/- पर्यंत असल्यामुळे सदर ग्राम पंचायती आर्थिक दृष्टया सक्षम असल्याबाबत खात्री करुन त्यानुसार ग्रामपंचायतीलाच कामे देण्यात आलेली आहे.

२) प्राकलन तयार करीत असतांना प्रत्यक्षात कामाची पाहणी करुन प्राकलन तयार करण्यात आली आहेत. तसेच प्रत्येक कामाचे प्राकलनाच्या परिमाणानुसार काम करण्यात आलेली आहे.

३) सदरील कामे ग्राम पंचायतीमार्फत करण्यात आली असून महाराष्ट्र ग्राम पंचायत लेखासंहीता, २०११ नुसार नियम ५७ (१) अन्वये पंचायत समितीचा उपअभियंता यांचेकडे योजना व अंदाजपत्रक तयार करणे, तांत्रिक मंजुरी देणे, तांत्रिक तपासणी करणे व मार्गदर्शक करणे तसेच मोजमाप मुल्यांकन प्रमाणपत्र आणि परिपुर्ती प्रमाणपत्र देण्याचे अधिकार आहेत. शाखा अभियंता यांनी नोंदविलेल्या कामाचे मुल्यांकनाची व कामाची तपासणी नियमानुसार उपअभियंता यांनी केली आहे व पुर्णत्वाचे प्रमाणपत्र दिले आहे.

४) पंचायत समिती स्तरावर शाखा अभियंता/ कनिष्ठ अभियंता व इतर तांत्रिक कर्मचारी कार्यरत असल्यामुळे त्यांचे देखरेखीमध्ये सदरील कामे करण्यात आली आहेत.

५) सदर १० बांधकामाचे मुळ देयकातुन विमा व रॉयल्टीची रक्कम रुपये ७८,३७४/- कपात करण्यात आली आहे. सदर कामे ग्राम पंचायतीनी स्वतः केली असल्यामुळे व ग्राम पंचायत, स्वायत संस्था असल्याने आयकर व विक्रीकर कपात करण्यात आली नाही. (आयकर अधिनियम १९६१ कलम १९० ते २०६AC)

६) आक्षेपानुसार कमी व जास्त प्रमाणाचे विवरण पत्र तयार करण्यात आले आहे. त्यानुसार पडताळणी केली असता, २ कामामध्ये जादा परिमाणाची रक्कम रुपये ११,१७५/- व रुपये ७,११४/- अशी एकूण रुपये १८,२८९/- वसूल केली आहे. चलान दप्तरी उपलब्ध आहे.

७) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता, १९६८ चे नियम १७४ नुसार पहिले व अंतिम बील नमुना ५५ मध्ये व धावते देयक ५६ ते ५८ काढणे आवश्यक असतांना सदर देयके ही नमुना २४ मध्ये काढण्यात आली आहे. याबाबत योग्य तो नमुना वापरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

८) सदर कामे पुर्ण झाल्यानंतरच मोजमाप पुस्तिकेमध्ये झालेल्या कामाचे मुल्याकंन नोंदवुन व पुर्णत्वाचे प्रमाणपत्र घेतल्यानंतर अंतिम देयके अदा केली आहेत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

वाशिम जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, कामे देताना ग्रामपंचायत सक्षमतेचा सक्षम प्राधिकाऱ्यांचा दाखला घेण्यात आला होता काय, असल्यास तो लेखापरीक्षणासाठी का सादर केला नाही. जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ च्या नियम १६७ व १६८ नुसार कार्यकारी अभियंता यांनी तपासणी करणे आवश्यक असताना तशी तपासणी का केली नाही, कामाचे स्वरुप हे क्रॉंक्रिट रस्ता, रस्ता खडीकरण व डब्ल्यूबीएम सभामंडप विशेष दुरुस्ती या स्वरुपाची कामे ग्रामपंचायतीने स्वतः न करता ठेकेदारामार्फत करणे व त्या ठेकेदाराकडून शासकीय कपाती न करण्याची कारणे काय आहेत, रक्कम रुपये १८,२८९/- केव्हा व कोणाकडून वसूल केले, विहीत नमुन्यात बांधकामाची देयके का सादर केली नाहीत.

यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कारंजा यांनी समितीस विदित केले की, पंचायत समिती स्तरावर शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता व इतर तांत्रिक कर्मचारी कार्यरत असल्यामुळे त्यांच्या देखरेखीमध्ये सदरील कामे करण्यात आली आहे. मोजमाप पुस्तिकेत नोंदणी केली आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, संबंधित अभियंता यांचेवर कारवाई केली आहे का, यावर कार्यकारी अभियंता, (बांधकाम विभाग) यांनी समितीस विदित केले की, हे ग्रामपंचायतीकडील काम असून ग्रामपंचायतीने केलेले आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ च्या नियम १७४ नुसार पहिले व अंतिम देयक नमुना ५५ मध्ये व धावते देयक ५६ ते ५८ मध्ये काढणे आवश्यक असताना सदर देयके ही नमुना २४ मध्ये काढण्यात आली आहे. याबाबत योग्य तो नमुना वापरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यावर समितीने पुढे विचारणा केली की, लेखासंहिता नियम १६७ व १६८ नुसार ही ग्रामसेवकाची जबाबदारी होती. याबाबतच्या आक्षेपाचे नीट उत्तर दिले पाहिजे. तसेच तांत्रिक अधिकारी म्हणजे उप विभागीय अभियंता यांनी देखील माहिती भरणे आवश्यक आहे. यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कारंजा यांनी समितीस विदित केले की, सदरील देयक नमुना २४ मध्ये काढण्यात आले आहे.

यावर समितीने निदेश दिले की, लेखासंहिता नियम १६७ व १६८ मधील तरतुदीप्रमाणे उत्तर द्यावे. यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कारंजा यांनी समितीस विदित केले की, सदरील कामे ग्रामपंचायतीमार्फत करण्यात आली असून महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता, २०११ नुसार नियम ५७ (१) अन्वये पंचायत समितीचा उपअभियंता यांचेकडे योजना व अंदाजपत्रके तयार करणे, तांत्रिक मंजूरी देणे, तांत्रिक तपासणी करणे व मार्गदर्शन करणे तसेच मोजमाप मुल्यांकन प्रमाणपत्र आणि परिपुर्ती प्रमाणपत्र देण्याचे अधिकार आहेत. शाखा अभियंता यांनी नोंदविलेल्या कामांच्या मुल्यांकनाची व कामाची तपासणी नियमानुसार उपअभियंता यांनी केली आहे व पुर्णत्वाचे प्रमाणपत्र दिले आहे.

तद्नंतर पुन्हा समितीने निदेश दिले की, लेखासंहिता नियम १६७ व १६८ मधील तरतुदीप्रमाणे उत्तर द्यावे व आता दुरुस्ती केलेली आहे काय, यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कारंजा यांनी समितीस माहिती दिली की, सदरील देयक नमुना २४ मध्ये काढण्यात आले आहे. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी समितीस विदित केले की, लेखासंहितेनुसार कार्यकारी अभियंता यांच्याकडून तपासणीची गरज आहे. ५ टक्के तपासणी केलेली नाही. यावर समितीने निदर्शनास आणून दिले की, ग्रामपंचायतीच्या अंदाजपत्रकाला तांत्रिक मंजूरी कार्यकारी अभियंता देतात. ५ टक्के तपासणीचे काम त्यांचे आहे. त्यामुळे त्यांनी आक्षेप घेतला आहे. ग्रामपंचायतींना तांत्रिक मार्गदर्शन करण्याची त्यांच्याकडे यंत्रणा नाही. ग्रामपंचायतींकडे शाखा अभियंता नाहीत. राज्यभरात ५-६ ग्रामपंचायती अशा असतील की त्यांच्याकडे स्वतःचे तांत्रिक मनुष्यबळ नेमले आहे. बाकी ठिकाणी पंचायत समिती, जिल्हा परिषदेचे अधिकारीच तांत्रिक मार्गदर्शन करतात. आपल्या मार्गदर्शनाखाली त्या ग्रामपंचायतींचे काम चालते. यावर कार्यकारी अभियंता, (बांधकाम विभाग) यांनी समितीस विदित केले की, तत्कालिन कार्यकारी अभियंत्यांनी तपासणी केल्याचा अहवाल उपलब्ध आहे. मी पदभार स्वीकारल्यापासून ४ ग्रामपंचायतींना भेटी देऊन तपासणी केली आहे.

यावर समितीने मत व्यक्त केले की, तुम्ही प्रत्येक ग्रामपंचायतीला भेट देऊ शकत नाही, हे समिती मान्य करते. उप अभियंत्यांचे १०० टक्के तपासणीचे काम असते म्हणून तुम्ही ५ टक्के तपासणी करता. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी समितीस विदित केले की, कनिष्ठ अभियंता यांना ग्रामपंचायतीच्या कामांचे तांत्रिक मंजुरीचे अधिकार दिले आहेत. यावर समितीने पुढे असे मत व्यक्त केले की, हे १३ व्या वित्त आयोगाचे काम होते, या कामाची किंमत किती होती, यावर गट विकास अधिकारी (पंचायत समिती कारंजा) यांनी समितीस

विदित केले की, रु.१,१२,३००/- ते रु.१,७५,०००/- या रक्कमांमधील कामे होती. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, तेव्हा पंचायत समिती व जिल्हा परिषद स्तरावर निधी वितरीत केला जात होते, ग्रामपंचायत स्तरावर निधी दिला जात नव्हता.

तद्नंतर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, कामाची किंमत किती आहे तसेच तांत्रिक मंजुरी केव्हाची आहे, यावर गट विकास अधिकारी (पंचायत समिती कारंजा) यांनी समितीस विदित केले की, अनुक्रमे रु.१,१०,०००/-, रु.१,७५,०००/-, रु.१,१२,०००/-, रु.१,४९,०००/, रु.१,०९,८००/-, रु.१,५१,१८२/-, रु.९९,०००/-, रु.१,५३,९००/-, रु.१,७५,०००/, रु.१,६५,०००/, रु.१,६७,७००/- अशा कामांच्या किंमती आहेत. तद्नंतर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत यांनी समितीस विदित केले की, तांत्रिक मंजुरी सन २०११ मध्ये नोंदविण्यात आलेली आहे.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, उप अभियंता स्तरावरील कामे आहेत, उप अभियंत्यांनी कोणत्या नमुन्यात फॉर्म भरायचा आहे, फॉर्मचा नमुना काय आहे, नियम १७८, १६८ यांना लागू होत नाही का, ग्रामपंचायतीची लेखासंहिता लागू झाली आहे का, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत यांनी समितीस विदित केले की, ग्रामपंचायतीच्या लेखासंहितेनुसार चालावे लागेल. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी निदर्शनास आणून दिले की, अडीच लाख रुपयांच्या वरच्या कामांना ५ टक्के तपासणी आहे. ५० हजार रुपयांच्या वरचे काम असेल तर तांत्रिक मान्यता पाहिजे. जिल्हा परिषदेसाठी ५० हजार रुपयांच्या वरच्या कामांसाठी चेकने मागणी करण्यात येते. ग्रामपंचायतीकडे अडीच लाख रुपयांची तरतुद आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीस माहिती दिली की, १२५ टक्क्यांपेक्षा जास्त काम होते, असा मुद्दा होता. तत्संदर्भात रु.१८,२८९/- वसूल केले आहेत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, यासंदर्भात कोणाकडून वसुली केली आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी समितीस विदित केले की, ग्रामपंचायतीकडून वसुली केली आहे. यावर समितीने निदेश दिले की, वसुली केली आहे, मात्र सदर बाबतीत अनियमितता झाल्यामुळे प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी, वसुली झाली असली तरी, प्रकरण तपासुन दोषींवर प्रशासकीय कारवाई करावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

तेराव्या वित्त आयोग निधीतुन केलेल्या बांधकाम खर्चातील अनियमितते प्रकरणी प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे, सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळुन आले व त्यानुसार वसुली झालेली असली तरी प्रकरण तपासून संबधीत दोषी व्यक्तीविरुध्द केलेल्या प्रशासकीय कारवाईचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायती राज समितीने निर्देशित केल्यानुसार या प्रकरणी लेख्यांची तपासणी करून चौकशी करण्यात आली. तेराव्या वित्त आयोगाच्या निधीतुन करण्यात आलेल्या बांधकामामध्ये ग्रामपंचायतीला जादा प्रदान झालेली रक्कम दिनांक १६ जानेवारी, २०१८ रोजी वसूल करण्यात आलेली आहे. याप्रकरणी दोषी आढळून आलेल्या श्री. डी.एन.मालाणी, कनिष्ठ अभियंता यांचेवर विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून ठपका ठेवण्याची कार्यवाही आदेश क्र.पसका/साप्रवि/ आस्था-१/३६९९ दिनांक २ नोव्हेंबर, २०१८ अन्वये केली असून त्याबाबतची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेण्यात आली आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त -६) सदर प्रकरणी जिल्हा परिषद स्तरावर कार्यवाही केलेली आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने वाशिम जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २२ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, तेराव्या वित्त आयोगाच्या निधीतून केलेल्या बांधकाम खर्चातील अनियमिततेबाबत (पंचायत समिती, कारंजा) समितीस माहिती द्यावी.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, या प्रकरणामध्ये जी अधिकची रक्कम देण्यात आली होती ती वसूल करण्यात आलेली आहे. यावर समितीने समाधान व्यक्त केले.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१२-१३ मध्ये पंचायत समिती, कारंजा अंतर्गत १३ वा वित्त आयोग निधी पंचायत समिती स्तरावर प्राप्त झालेला असून सदर निधीचे अनुदानातून पंचायत समिती सभागृहाने २९ कामांना मंजुरी दिल्यानुसार सदर बांधकामावर रुपये २,११,७८,९५८/- एवढा खर्च केला आहे, याबाबत लेखा परिक्षणामध्ये असे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत की, तेराव्या वित्त आयोगातील मार्गदर्शक सूचनाचे काटेकोर पालन केलेले नाही. ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक ९ फेब्रुवारी, २००९ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार ग्राम पंचायत बांधकामे पार पाडण्यास आर्थिकदृष्टया सक्षमतेबाबत खात्री न करता कामे दिली आहेत. परिशिष्टानुसार कामाचे विशेष दुरुस्ती कामाची प्रत्यक्षात पाहणी न करता टाईपप्लॅन केलेली आहेत. बाबनिहाय कमी जास्त परिमाणास सक्षम मंजूरी घेतली नाही. ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ नुसार अंशतः बांधकामे वगळता उर्वरित बांधकामाबाबत कार्यवाही केली नाही. अदा केलेल्या १० बांधकाम देयकातून आयकर, अधिभार (सरचार्ज), विक्रीकर, विमा व संपूर्ण स्वामित्वधनाची (रॉयल्टी) रक्कम असे एकूण रुपये १,३२,७५७/- कपात केली नाही. अंतिम देयकासोबत कमी जादा प्रमाणाबाबतचे विवरण पत्र जोडले नाही. पहिले व अंतिम देयक नमुना ५५ मध्ये व धावते देयक नमुना ५६ मध्ये काढणे आवश्यक असताना त्यानुसार कार्यवाही केली नाही. काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र दर्शवून अंतिम देयके कामे पूर्ण होण्यापूर्वीच नियमबाह्य प्रदान केले आहे.

उपरोक्त लेखा आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, पंचायत समिती स्तरावर १३ व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून प्राप्त निधीचे अनुदानातून कॉंक्रिट रस्ता, रस्ता खडीकरण व डब्ल्यूबीएम सभामंडप विशेष दुरुस्ती या स्वरुपाची कामे पंचायत समितीचे शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता व इतर तांत्रिक कर्मचारी यांच्या देखरेखीखाली करण्यात आली आहेत. या कामांना तांत्रिक मंजुरी सन २०११ मध्ये देण्यात आलेली आहे. सदर कामे ग्रामपंचायतीकडील असून जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १७४ नुसार प्रथम व अंतिम देयक नमुना ५५ मध्ये व धावते देयक ५६ ते ५८ काढणे आवश्यक असताना सदर देयके ही नमुना २४ मध्ये काढण्यात आली आहेत. लेखासंहिता नियम, १६७ व १६८ नुसार ही ग्रामसेवकाची जबाबदारी होती. तसेच तांत्रिक अधिकारी म्हणून उप शाखा अभियंता (सबडिव्हीजनल इंजिनिअर) यांनी देखील माहिती भरणे आवश्यक आहे. लेखा संहितेनुसार कार्यकारी अभियंता यांनी तपासणी करणे आवश्यक होते. ५ टक्के तपासणी केलेली नाही, ग्रामपंचायतीच्या अंदाजपत्रकाला तांत्रिक मंजुरी कार्यकारी अभियंता देतात, त्यामुळे ५ टक्के तपासणीचे काम कार्यकारी अभियंता यांचे आहे. ग्रामपंचायतीकडे तांत्रिक मार्गदर्शन करण्याची यंत्रणा नाही तसेच शाखा अभियंता नाही. राज्यात फक्त ५-६ ग्रामपंचायतींकडे तांत्रिक मनुष्यबळ आहे. उर्वरित सर्व ग्रामपंचायतींच्या ठिकाणी पंचायत समिती जिल्हा परिषदेचे अधिकारीच तांत्रिक मार्गदर्शन करीत असतात. **तेराव्या वित्त आयोगाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार रुपये २.५० लक्षावरील कामांना ५ टक्के तपासणी असून रुपये ५० हजार वरील काम असेल तर त्यास तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे. १२५ टक्क्यांपेक्षा जास्त काम असल्यामुळे ग्रामपंचायतीकडून रुपये १८,२८९/- एवढी रक्कम वसुल करण्यात आली आहे. तसेच याप्रकरणी दोषी आढळून आलेल्या** श्री. **डी.एन.मालाणी, कनिष्ठ अभियंता यांचेवर महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६४ चे भाग तीन (४) (एक) नुसार ठपका ठेवण्यात आला आहे. त्याबाबतची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेण्यात आलेली आहे. त्यामुळे समिती समाधान व्यक्त करीत आहे.**

## प्रकरण आठ
## जिल्हा परिषद, वाशिम
## खाजगी विहिर/बोअर अधिग्रहण मोबदला रक्कमेचे जादा प्रदानाबाबत
## (पंचायत समिती, मंगरुळपीर)

**परिच्छेद क्रमांक ४.२३०/८ (सन २०१२-१३)**

पंचायत समिती, मंगरुळपीर खाजगी विहिर/बोअर अधिग्रहण मोबदला रक्कमेसाठी रुपये ६,०६,४००/- प्रदान केले याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई २०१२/ प्र.क्र.५३/पा.पु.१४ दिनांक ३० एप्रिल, २०१२ नुसार शासन निर्णय निर्गमित झालेल्या दिनांकापासून खाजगी विहीरी अधिग्रहीत केल्यानंतर त्या विहिर मालकाने पाणी काढण्यासाठी विद्युत डिझेल पंप व विद्युत कनेक्शनसह साधन सामुग्री उपलब्ध करुन दिली नसल्यास रुपये ३०० ऐवजी २०० दराने मोबदला देणे आवश्यक असतांना केवळ ५ विहिरी अधिग्रहित केलेल्या मालकांना याप्रमाणे ३००/- रुपये दर देऊन जादा प्रदान रुपये १४,१००/- वसुल होणे आवश्यक आहे.

२) उपविभागीय अधिकारी यांचे आदेश क्रमांक १०५०९ दिनांक १९ जून, २०१२ नुसार श्री. सुभाष दामोदर निकस यांची विहीर दिनांक २५ फेब्रुवारी, २०१५ पासून बंद केलेली असल्याने त्यांना दिनांक २५ मे, २०१२ ते दिनांक २८ मे, २०१२ पर्यंत या कलावधीचे जादा प्रदान वसुल पात्र ठरते. श्री. सुभाष भगवान फुर्से यांना दिनांक २६ मे, २०१२ ते दिनांक ७ जून, २०१२ पर्यत १३ दिवसांची रक्कम देय असतांना त्यांना ४३ दिवसांचे प्रदान केल्याने ३० दिवसांची जादा प्रदान रक्कम रुपये १२,०००/- वसुल होणे आवश्यक आहे.

३) ज्या विहिर मालकाने पाणी काढण्यासाठी विद्युत पंप /डिझेल पंप कनेक्शन सह साधन सामुग्री उपलब्ध करुन दिली त्यास जादा मोबदला देण्यात आला, मात्र याप्रमाणे साधन सामुग्री उपलब्ध करुन दिल्याबाबत प्राधिकरणाने प्रमाणित केले नाही.

४) श्री. प्रकाश भिमराव जाधव यांचे देयकातुन कपात न केलेली आयकराची रक्कम रु. २०९८/- वसुल करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीस जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) जादा प्रदान वसुली रु. १४,१००/- चलानद्वारे भरणा करण्यात आली आहे. चलान दप्तरीफ्उ ालब्धअ ाहे.

२) श्री. सुभाष दामोदर निकम यांची जादा प्रदान वसुली रुपये १६००/- चलानद्वारे शासन खाती जमा करण्यात आली आहे. श्री. सुभाष भगवान फुसे यांची जादा प्रदान वसुली रु. १२,०००/-चलानद्वारे शासन खाती जमा करण्यात आली आहे. चलान दप्तरी उपलब्ध आहे.

३) मुद्या क्रमांक १ नुसार रक्कम वसुल करण्यात आली आहे.

४) श्री. प्रकाश भिमराव जाधव यांचे मोबदला देयक प्रमाणक क्र. १७८ दि. १८ जुलै, २०१२ नुसार त्यांना देय असलेल्या मोबदला रक्कमेतून रु.१,८२४/- आयकर रक्कम व रुपये २७३/- सरचार्ज असे एकूण रुपये २,०९७/- एवढी कपात करण्यात आलेली आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

वाशिम जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, रक्कम रु. २७,७००/- जादा अदाई केव्हा वसूल केली, जादा अदाईस कोण जबाबदार आहे, रक्कम कोणाकडून वसूल केली आहे, सदर बाबतीत कारवाई केली नसेल तर जबाबदारी निश्चित करावी, यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती मंगरुळपीर यांनी समितीस विदित केले की, रक्कम वसूल केली आहे. यावर समितीने पुढे असे निदेश दिले की, संबंधित दोषींवर प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**उपरोक्त** प्रकरणी रक्कम रु. २७,७००/- जादा अदाई केव्हा वसूल केली, जादा अदाईस कोण जबाबदार आहे, रक्कम कोणाकडून वसूल केली आहे, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार जबाबदारी निश्चित करुन कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती, मंगरुळपीर अंतर्गत खाजगी विहीर/बोअर अधिग्रहण मोबदला रुपये २७,७००/- ही चुकीची असून जादा अदाई केलेली रक्कम रुपये १५,७००/- असून सदर जादा अदाई केलेली रक्कम तत्कालिन स्थापत्य सहाय्यक श्री.व्ही.व्ही. भेलांडे यांच्यावर सदर प्रकरणात महा. जि.प. जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६४ चे नियम ४(१) नुसार या कार्यालयाचे आदेश जाक्र/पं.स./साप्रवि/आस्था-१/४४६८ दि.३ नोव्हेंबर, २०१८ अन्वये ठपका ठेवणे ही शिक्षा देण्यात आलेली आहे. तसेच त्यांच्याकडून अनुक्रमे चलान क्र. १३ दि.२७ डिसेंबर, २०१७ रुपये २१००/-, चलान क्र.१४ दि. २७ डिसेंबर, २०१७ रुपये १२०००/- व चलान क्र. १४ दि.१९ डिसेंबर, २०१७ रुपये १६००/- असे एकूण रुपये १५,७००/- वसुल करण्यात आलेली आहे.

कृपया खुलासा मान्य करण्यात यावा ही विनंती.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय :-** (आस्था-१२) मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.वाशिम यांनी केलेल्या कार्यवाहीस सहमती दर्शविण्यात येते.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने वाशिम जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २२ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, खाजगी विहीर बोर अधिग्रहण मोबदला रक्कमेचे जादा प्रदानाबाबत (पंचायत समिती, मंगरुळपीर) या विषयी समितीला माहिती देण्यात यावी. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस या विषयाबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे अशी माहिती दिली. यावर समितीने समाधान व्यक्त केले.

## अभिप्राय व शिफारशी

मंगरुळपीर पंचायत समितीने खाजगी विहिर/बोअर अधिग्रहण मोबदला रक्कम रुपये ६,०६,४००/- प्रदान केली आहे. याबाबत असे लेखा आक्षेप नोंदविले आहेत की, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दिनांक ३० एप्रिल, २०१२ रोजीच्या शासन निर्णयानुसार विहिर मालकाने विद्युत/डिझेल पंप व विद्युत जोडणीसह साधन सामग्री उपलब्ध करुन दिली नसल्यास रुपये ३०० ऐवजी रुपये २०० या दराने मोबदला देणे आवश्यक असताना ५ विहिर मालकांना रुपये ३०० असा दर देऊन जादा रुपये १४,१००/- वसूल होणे आवश्यक आहे. श्री.सुभाष दामोदर निकस यांची विहीर दिनांक २५ फेब्रुवारी, २०१५ रोजीपासून बंद केलेली असल्याने त्यांना दिनांक २५ मे, २०१२ ते दिनांक २८ मे, २०१२ पर्यंतच्या कालावधीचे जादा प्रदान वसूलपात्र ठरते. त्याचप्रमाणे श्री.सुभाष भगवान फुसे यांना ३० दिवसांचे जादा प्रदान रुपये १२०००/- वसुल होणे आवश्यक आहे. विहीर मालकांनी विद्युत/डिझेल पंप जोडणीसह साधन सामग्री उपलब्ध करुन दिल्याबाबत प्राधिकरणाने प्रमाणित केले नाही. श्री.प्रकाश जाधव यांचे देयकातून कपात न केलेली आयकराची रक्कम रुपये २०९८/- वसूल करणे आवश्यक आहे.

उपरोक्त लेखा आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, खाजगी विहीर/बोअर अधिग्रहण मोबदला म्हणून जादा प्रदान केलेली रक्कम रुपये २७,७००/- वसुल करण्यात आल्याचे गटविकास अधिकारी, मंगरुळपीर पंचायत समिती यांनी विदित केले आहे. तथापि, जादा अदाई केलेली रक्कम रुपये २७,७००/- ही चूकीची असून जादा अदाई केलेली रक्कम रुपये १५,७००/- असल्याचे लेखी माहितीमध्ये नमूद केलेले आहे. त्यामुळे याबाबत निश्चित किती रक्कम वसूल करण्यात आली आहे. याबाबतचा खुलासा होणे आवश्यक आहे.

याप्रकरणी **तत्कालिन स्थापत्य सहायक श्री.व्ही.व्ही.भेलांडे यांच्यावर ठपका ठेवणे ही शिक्षा देण्यात आली आहे. या विषयाबाबत कार्यवाही करण्यात आली आहे. त्यामुळे समिती समाधान व्यक्त करीत आहे.**

## प्रकरण नऊ
## जिल्हा परिषद, वाशिम
## लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करुन देणेबाबत

**१) परिच्छेद क्रमांक ३.४६ (सन २०१२-१३) :-**

**कार्यालयीन फर्निचर जडसंग्रह वस्तु खरेदीतील अनियमिततेबाबत**

जिल्हा परिषद उपकर अंतर्गत सन २०१२-१३ मध्ये रुपये ७७,४३५/- खर्च करण्यात आला याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ८३ नुसार कार्यवाही करण्यात आली नाही.

२) महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक भांखय-२००२/२९९० उद्योग-६ दिनांक ०४ फेब्रुवारी, २००३, शासन निर्णय दि. ०२ जानेवारी, १९९२ नुसार वस्तु खरेदीबाबत कार्यपध्दतीचा अवलंब केला नाही.

३) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग परिपत्रक क्रमांक १०७९/सीआर २७८० दिनांक १५ फेब्रुवारी, १९८२ नुसार विषय समिती सभापती यांच्या निवासाकरिता कुलर खरेदी अनुज्ञेय नसतांना खरेदी करण्यात आली आहे. सदरची रक्कम रुपये ७७,४३५/- वसूल होणे आवश्यक आहे.

४)अर्धसमास पत्र क्रमांक ४ दिनांक १८ डिसेंबर, २०१३ व पत्र क्रमांक ८ दिनांक २० डिसेंबर, २०१३ नुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी व सभापती यांना पुरविलेल्या साहित्याची खरेदीबाबत मागणी करुन सुध्दा मागणीपत्र व दरपत्रके उपलब्ध झाले नाही तसेच पुरवठा आदेश कधी कसा व केव्हा प्राप्त झाला याबाबत शहानिशा झाली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

उपाध्यक्ष, सभापती, शिक्षण व आरोग्य व सभापती, महिला व बालकल्याण तसेच सभापती, समाजकल्याण यांचे निवासस्थानी त्यांनी तात्काळ मागणी केल्यामुळे सर्व साहित्य तातडीने पुरविण्यात आले.

एकूण रक्कम रुपये ७७,४३५/- पैकी, रुपये ५७,४८५/- चे सभापती निवासस्थानी फर्निचर व खुर्च्या पुरविण्यात आल्या व रुपये १९,९५०/- चे ३ कुलर खरेदी करण्यात आले. त्यापैकी १ कार्यालयाकरीता व उर्वरित २ सभापती यांचे निवासस्थानाकरीता देण्यात आलेले आहेत. विदर्भामध्ये तीव्र उन्हाळा असल्याने कुलरची मागणी वाजवी होती त्यामुळे कुलर देण्यात आले.

खरेदी नस्तीचे टिप्पणीमध्येच तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे. पुरवठा आदेश दरपत्रके इत्यादी आनुषंगिक दस्तऐवज जोडलेले आहेत. तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेवूनच खरेदी प्रक्रिया करण्यात आली आहे.

**२) परिच्छेद क्रमांक ३.१८०/३ (सन २०१२-१३)**

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमधील इयत्ता १ ते ४ मधील अनुसूचित जाती, जमातीच्या विद्यार्थ्यांना विशेष सुविधा अंतर्गत गणवेश व लेखन साहित्य पुरवठा करणेबाबतच्या खर्चातील अनियमिततेबाबत.**

शिक्षण विभागात विविध लेखाशिर्षाखाली प्राप्त २०% अनुदानापैकी रुपये ८,६४,१५०/- हे जिल्हा स्तरावर खर्च करण्यात आले आहेत, त्याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) जिल्हाधिकारी सदस्य सचिव, नियोजन समिती वाशिम यांचे स्तरावरुन सन २०११-१२ मधील अखर्चित अनुदान सन २०१२-१३ मध्ये खर्ची टाकणेबाबत जिल्हा परिषद, वाशिम स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ०२ (१) दिनांक ०२ फेब्रुवारी, २०१३ अन्वये मागील वर्षातील अखर्चित निधी खर्च करण्यास मंजूरी घेवून मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश क्रमांक ५९८/२०१३/दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१३ अन्वये तांत्रिक मंजुरी प्रदान करण्यात आली. जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत अनुदान प्राप्त झाले असतांना त्यांचे स्तरावरुन खर्चास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

२) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखांसंहिता, १९६८ चे नियम १५३ (१) अन्वये व पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार करारनामा करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

३) महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय क्रमांक भा.ख.सं.१०८८/(२५१२)/उद्योग ६, मंत्रालय, मुंबई दिनांक ०२ जानेवारी, १९९२ मधील परि.८.४ मधील तरतूदीनुसार साहित्याच्या मालाच्या दर्जाविषयी तपासणी करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. पुरवठा आदेशातील अट क्रमांक ७ नुसार साहित्याची चाचणी झाल्यानंतर देयकाचे प्रदान करण्यात यावे. परंतु विभागाने

साहित्याच्या चाचणी अहवालाची १०% रक्कम रुपये ६८,८४१/- रोखून ठेवण्यात आल्याचे दिसून आले त्यामुळे पुरवठादाराचे स्तरावरुन चाचणी केली नाही असे निदर्शनास येते.

४)देयकानुसार दिनांक २२ मार्च, २०१३ रोजी मालाचा पुरवठा आल्याचे दिसून येते. साठा नोंदवहीला पृष्ठ क्रमांक ३३० वर साहित्याची नोंद घेण्यात आली, परंतु दिनांक नमूद नाही. करिता शैक्षणिक सत्र सुरु होण्यापूर्वी साहीत्य प्राप्त झाल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

५) पंचायत समिती निहाय पुरवठादाराचे स्तरावरुन साहित्य वितरीत करण्यात आले. परंतु साठा नोंदवहीला दिनांक नमुद करण्यात आला नसल्यामुळे शैक्षणिक सत्र सुरु होण्यापूर्वी शैक्षणिक साहीत्याचे वितरण करण्यात आले नसल्याची बाब सकृत दर्शनी निदर्शनास येते. सबब योजनेचा उद्देश सफल झाला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) सन २०११-१२ मधील गणवेश व लेखन साहित्य जिल्हा वार्षिक योजनेच्या निधी वितरण आदेश क्रमांक नियोजन/कक्ष-१५/जिवायो/२०११-१२/३०४ अन्वये जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे.

शासन निर्णय क्रमांक जिवायो १००७/प्र.क्र.३९/का.१४४४ दिनांक १६ फेब्रुवारी, २००८ अन्वये जिल्हा वार्षिक योजनेच्या कामांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार मंत्रालयीन विभागाच्या कार्यान्वयीन यंत्रणेस देण्यात आले आहेत. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी आदेश क्रमांक जाक्र/जिपवा/प्रशि/आस्था/गणवेश व लेखन/३९८/२०१३ दिनांक ६ फेब्रुवारी, २०१३ नुसार तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे.

२) संबंधित पुरवठादार संस्थेने अटी व शर्ती मान्य असल्याबाबत पुरवठा आदेशाच्या कार्यालयीन स्थळप्रतीवर लिहून दिले आहे. सोबत रुपये १००/- चा कोरा स्टॅम्प दिला आहे. सदर अभिलेखे दप्तरी उपलब्ध आहेत.

३) पुरवठादाराने केलेल्या साहित्याची तपासणी करण्यात आलेली आहे. सदर तपासणी अहवाल दप्तरी उपलब्ध आहे. दरकरारातील अटी व शर्तीनुसार ९०% रक्कम माल पुरवठा केल्यानंतर व उर्वरित १०% रक्कम अटी व शर्तीनुसार मालाच्या गुणवत्तेची खात्री पटल्यानंतर प्रदान करण्यात आली.

४) व ५) पंचायत समिती निहाय लेखन साहित्य पुरविल्याचा दिनांकाबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पंचायत समिती | लेखनपाटी संख्या | पंचायत समिती प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| १) | वाशिम | ६९०० | ३०/०३/२०१३ |
| २) | मालेगांव | ७६०० | १६/०४/२०१३ |
| ३) | रिसोड | ७५५० | ३०/०३/२०१३ |
| ४) | मंगरुळपीर | ६६०० | ३१/०३/२०१३ |
| ५) | मानोरा | ५३७० | २८/०६/२०१३ |
| ६) | कारंजा | ५४४१ | ३०/०३/२०१३ |
| | एकूण | ३९४६१ | |

साहित्याची नोंद साठा पुस्तक नमुना ३३ मध्ये पृष्ठ क्र.९९ वर घेण्यात आली असून पंचायत समिती स्तरावर लेखन पाटी साहित्याचा पुरवठा आदेशातील अटी व शर्ती नुसार दोन तालुक्यात विलंबाने पुरवठा झाला आहे.

परंतु शैक्षणिक सत्राआरंभी शाळा स्तरावर साहित्याचे वाटप करण्यात आले असून त्याबाबतचे गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती यांचे प्रमाणपत्र दप्तरी उपलब्ध आहे.

**३) परिच्छेद क्रमांक ३.१८२ (सन २०१२-१३)**

**शालेय पोषण आहार खर्चातील अनियमिततेबाबत**

सन २०१२-१३ या कालावधीतील पंचायत समितीस्तरावर धान्याच्या पुरवठयाबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत :-

१) शालेय पोषण आहार धान्याच्या पुरवठयाबाबत पंचायत समिती निहाय नोंदवहयांची अर्धसमास पत्र क्रमांक १/दिनांक २५/११/२०१३ अन्वये मागणी करुनही उपरोक्त नोंदवहया लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिल्या नाहीत.

२) पंचायत समिती निहाय पुरवठा केलेल्या धान्यांची व इतर मालासंबंधी डिलेव्हरी मेमो वर वाहन क्रमांक व दिनांक नमूद नसतांना मुख्याध्यापकांनी डिलेव्हरी मेमो कसे प्रमाणीत केले.

३) पंचायत समिती मानोरा अंतर्गत शाळांमध्ये पुरवठा करण्यात आलेल्या धान्याची व इतर मालाची मागणी विवरण पत्रानुसार पुरवठा कमी झाल्याचे दिसूनयेते. कमी झालेल्या पुरवठयाची रक्कम ३३१३५/- वसूल होणे आवश्यक आहे.

४)शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्रमांक शापोआ सुधायो/प्राशि/३०३/२०११-१२/दिनांक ०१ नोव्हेंबर २०११ अन्वये परिच्छेद क्रमांक ३ नुसार शाळानिहाय मागणी २० दिवसाचे आत शिक्षणाधिकारी यांना दयावी व शासनाच्या दिनांक २० फेब्रुवारी २०१० च्या परिपत्रकामधील मुद्या क्रमांक अ-८ (क-२) (क-३) (क-६) नुसार पंचायत समिती मानोरा यांनी कार्यवाही केली नाही.

५) करारनामा मधील अट क्रमांक १ नुसार पुरवठादाराने विहित कालावधीत पुरवठा न केल्यास मालाच्या किंमतीवर ०.५ टक्के प्रति मागणी दंड आकारण्यात येईल. दंडाची कमाल मर्यादा रुपये १०००००/- पेक्षा कमी असेल तर अश्या किंमतीवर १०% टक्के ची आकारणी करण्यात येईल त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

६) शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य पुणे यांचे दिनांक १/११/२०११ च्या पत्रामधील परिच्छेद क्रमांक १० मालाचा दर्जा, वजन, भारतीय महामंडळाचे सिल व शिक्का आणि माल साठयामध्ये घेतल्यावर कमी अथवा जादा मालाची जबाबदारी संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकाची राहील. पंचायत समिती मानोरा व पंचायत समिती मालेगांव यांच्यास्तरावरुन उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

७)पंचायत समिती मानोरा यांचे स्तरावरुन मागणी नसतांना केलेल्या पुरवठयाची रक्कम रुपये ६९३७/- वसुल होणे आवश्यक आहे.

८) पंचायत समिती वाशिम (वर्ग १ ते ५ व वर्ग ६ ते ८) यांनी धान्यांची वइतर मालाची साठा नोंदवही ठेवली नाही.

९) पंचायत समिती मानोरा अंतर्गत शाळामध्ये पुरवठादाराने पुरवठा केलेल्या मालाच्या पावती वर मुख्याध्यापकास प्राप्त झालेल्या मालाच्या पावती वरील दिनांकात तफावत दिसून येते. करारनाम्यातील अटी/शर्तीनुसार उशीराने पुरवठा बाबत दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) लेखा परिक्षणास साठा नोंदवह्या उपलब्ध करुन न दिल्याप्रकरणी संबंधित यांचेवर जबाबदारी निश्चित करुन रुपये २५०००/- दंड वसुल करण्यात आला आहे. चालानची प्रत दप्तरी उपलब्ध आहे.

२) शालेय पोषण आहार योजनेचे अंतर्गत एकूण ११०८ शाळांपैकी १२५ शाळेच्या मुख्याध्यापक यांनी डिलेव्हरी मेमोवर पाहोच देतांना वाहन क्रमांक व दिनांक नमुद केला नाही असे निदर्शनास आले आहे. परंतु बहुतांश मुख्याध्यापक यांनी डिलेव्हरी मेमोवर पोहोच देतांना वाहन क्रमांक व दिनांकाची नोंद घेतलेली आहे. यापुढे सर्व मुख्याध्यापक यांना उपरोक्त बाबत दक्षता घेण्याच्या सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

३) पंचायत समिती मानोरा अंतर्गत शाळांमध्ये पुरवठा करण्यात आलेल्या धान्यांची व इतर मालाची मागणी विवरण पत्रानुसार पुरवठा कमी झाल्याचे डिलेव्हरी मेमो व साठा नोंदवही करुन खात्री केली असता आक्षेपामध्ये नोंदविण्यात आलेली रक्कम रुपये ३३१३५/- ऐवजी रुपये ६७५६/- एवढी आहे. जादा प्रदान झालेल्या रक्कमेची वसुली करण्यात आली असून चालनाव्दारे रुपये ६७५६/- शासन खाती भरणा करण्यात आली आहे. चालनाची प्रत दप्तरी उपलब्ध आहे.

४) दिनांक २०/०२/२०१० च्या परिपत्रकानुसार कार्यवाही केली नसल्याचे तत्कालिन प्रभारी गट शिक्षणाधिकारी श्री. अनिल पवार यांचेवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचेवर महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ नुसार प्रशासकीय कार्यवाही करण्यात आली आहे.

५) आक्षेपात नमूद अट क्र. १ नसुन १७ आहे. विहीत कालावधीमध्ये धान्यांचा व इतर मालाचा पुरवठा करण्यात आला नसल्याने पुरवठा करण्यात आलेल्या मालाच्या एकूण किंमतीवर ०.५ % प्रमाणे दंड आकारण्यात येवून रुपये २३,०९३/- रक्कमेचा भरणा शासनखाती जमा करण्यात आला आहे. चालनाची प्रत दप्तरी उपलब्ध आहे.

६) मुख्याध्यापक यांचे स्तरावरुन तांदूळ व धान्यांचा माल उतरवून घेतांना मुख्याध्यापक यांचेकडून पुरवठादारास परिपत्रकामधील निर्देशानुसार डिलेव्हरी मेमोवर सर्व माल चांगल्या प्रतीचा, प्रत्यक्ष मोजून ताब्यात मिळाल्याबाबत व काहीही तक्रार नाही अशी पोहोच मुख्याध्यापक यांचेकडून देण्यात आल्या आहेत.

७) पंचायत समिती, मानोरा यांचे स्तरावरुन मागणी नसतांना केलेल्या धान्यादी मालाचे पुरवठ्याची रक्कम रुपये ६९३७/- पुरवठादाराकडून वसूल करुन शासन खाती जमा करण्यात आली आहे. चालनची प्रत दप्तरी उपलब्ध आहे.

८) पंचायत समिती, वाशिम यांचे स्तरावर साठा नोंदवही ठेवण्यात आली आहे, साठा नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिली नसल्याने दंडाची कार्यवाही करण्यात आली आहे.

९) पंचायत समिती, मानोरा अंतर्गत जिल्हा परिषद शाळा ढोणी, वसंतराव नाईक विद्यालय मानोरा, जयबजरंग विद्यालय भुली, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धावंडा, जिल्हा परिषद शाळा आसोला खुर्द या शाळेवर पुरविण्यात आलेला धान्यांच्या मालाच्या तारखेमध्ये तफावत आढळून आली. शालेय रेकॉर्ड तपासणी अंती खात्री करुन उशिराने पुरविलेल्या मालाच्या एकूण किंमतीवर करारनाम्यामधील अट क्र.१७ अन्वये दंडाची रक्कम रुपये ४९२५/- पुरवठादार यांचेकडून वसुल करुन शासन खाती जमा करण्यात आली आहे. चालनाची प्रत दप्तरी उपलब्ध आहे.

**४) परिच्छेद क्रमांक ३.९९१/२ (सन २०१२-१३)**

**९० % अनुदानावर महिलांना सौर कंदिल पुरविणेबाबत**

जिल्हा परिषद उपकर या लेखाशिर्षा अंतर्गत सन २०१२-१३ मध्ये रुपये २४,३९,६००/- खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :-

१) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.झेडपीए/२००८/प्रक्र ४४६/वित्त-९ दिनांक २०/०६/२००८ अन्वये ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार योजना राबविणे आवश्यक असतांना त्या प्रमाणे कार्यवाही केली नाही.

२) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक पंरास/१०८४/सीआर १६३३ दिनांक १९/०१/१९९५ नुसार हिस्सा प्रथम वसुल करणे आवश्यक असतांना पुरवठा आदेश दिल्यानंतर लाभार्थी हिस्सा वसुल केला आहे.

३) पुरवठा आदेशाप्रमाणे साहित्य पंचायत समितीला पुरवठा करण्यात आला नाही. लाभार्थी अर्जाची निवड मर्यादीत नाही. लाभार्थी अर्जाची पुर्तता नाही. तसेच पंचायत समिती स्तरावर लेखापरिक्षण तारखेपावेतो सहा पंचायत समिती एकूण नग ४२ साठा शिल्लक आहे. त्यामुळे योजना सफल झाल्याचे दिसून येत नाही.

४)पंचायत समिती वाशिम येथील लाभार्थ्यांना पंचायत समिती मानोरा यांनी लाभ कसा दिला अशाप्रकारे ४ लाभार्थी रुपये २६७५/- प्रमाणे रुपये १०७००/- वसुल होणे आवश्यक आहे.

५) पुरवठा आदेशानुसार २.५ आठवडे साहित्य उशीराने केल्याने प्रती आठवडा रुपये ६०९९/- प्रमाणे रुपये १५,२४६/- वसुल होणे आवश्यक आहे. अ.क्र. ४ व ५ ची रक्कम रु. २५९४८/- वसुलपात्र.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

परिच्छेदात नमुद रक्कम २४,३९,६००/- आहे परंतु प्रत्यक्षात रुपये १२,१९,८००/- खर्च करण्यात आलेला आहे.

१) सदर योजनेस महिला व बाल कल्याण विभाग समितीने माहे २६/०६/२०१२ नुसार मंजूरी प्रदान केली. महिला व बाल कल्याण विषय समितीचा ठराव क्र. ४ दिनांक २३/११/२०१२ नुसार लाभार्थीची निवड करण्यात आली. लाभार्थी संख्या जास्त असल्याने मंजूर तरतुदीत वाढ करण्यासाठी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची जादा तरतुदीस मंजुरी घेणे आवश्यक असल्याने दिनांक १६/१/२०१३ रोजी मंजुरी घेण्यात आली. त्यामुळे वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करता आलेली नाही.

२) सदरहू योजनेस जि.प. सर्वसाधारण सभा दि. १६/१/२०१३ रोजी मान्यता मिळाली. त्यानंतर पुरवठा आदेश देण्यात आला. परिच्छेदात नमूद अनियमिततेबाबत संबंधिताचे विरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा (शिस्त व अपिल) १९६४ नुसार विभागीय चौकशीची कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.

३) साहित्य प्रकल्प स्तरावर प्राप्त झाले. प्रकल्प स्तरावरील साठा रजिस्टर प्रमाणे प्राप्त नग व दिनांक खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | प्राप्त नग | दिनांक |
|---|---|---|---|
| १) | वाशिम | ८८ | ३०/०३/२०१३ |
| २) | रिसोड | ७० | ३०/०३/२०१३ |
| ३) | मालेगांव | १३३ | ३०/०३/२०१३ |
| ४) | मंगरुळपीर | ४२ | २९/०३/२०१३ |
| ५) | कारंजा | ७३ | २९/०३/२०१३ |
| ६) | मानोरा | ५० | ३०/०३/२०१३ |
| | एकूण | ४५६ | |

वरील प्राप्त साठयानुसार लेखापरिक्षण तारखेपावेतो ४२ नग शिल्लक होते, लेखापरिक्षणानंतर वाटप करण्यात आले. परिच्छेदात नमूद अनियमिततेबाबत संबंधिताचे विरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा (शिस्त व अपिल), १९६४ नुसार विभागीय चौकशीची कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.

४) संबंधितांकडून वसुलपात्र रक्कम रुपये १०७००/-वसुल करण्यात आलेले आहेत. चलान प्रत दप्तरी उपलब्ध आहे.

५) संबंधित पुरवठाधारकाकडून वसुलपात्र रक्कम रुपये १५२४८/- वसूल करण्यात आलेले आहे. चलान प्रत दप्तरी उपलब्ध आहे.

**५) परिच्छेद क्रमांक ३.१०२२ (सन २०१२-१३)**

**अंगणवाडी केंद्रांना इलेक्ट्रॉनिक वजनकाटे पुरविणेबाबत.**

२२३५-३२६६ शासकीय निधी या लेखाशिर्षाअंतर्गत सन २०१२-१३ मध्ये रुपये ७,४६,६२९/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) पुरवठा आदेश क्र. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम १८१ दिनांक ०६/०३/२०१३ अट क्र. ३ व अट क्र. ५ चे नुसार पुरवठा आदेश दिनांकापासून १५ दिवसाच्या आत पुरवठा करुन त्याबाबत पोच पदनामाच्या दिनांकीत साक्षांकित पुरवठा चलने, साठा नोंदवहीच्या साक्षांकित प्रत व खर्च देयकाच्या दोन प्रती कार्यालयास सादर करणे आवश्यक असताना पुरवठा आदेशातील तरतुदींचे पालन झाले नाही.

२) उपविभाग मंगरुळपीर यांच्या साठापुस्तकात पृष्ठ क्रमांक ५४ वर दिनांक २०/०३/२०१३ ला ६६ नग इलेक्ट्रॉनिक वजनकाटे प्राप्त असून अंगणवाडी पर्यवेक्षकांना दिनांक १०/०४/२०१३ ते १८/०४/२०१३ पर्यंत कमी जास्त प्रमाणात वाटप केले तसेच श्रीमती एल.एन.चौधरी अंगणवाडी पर्यवेक्षिका यांना १० नग पुरवठा केला याबाबत प्राप्तकर्त्यांच्या दिनांकित स्वाक्षरी नाहीत. संबंधितांकडुन १० नग X ५,६१३.७५ = रुपये ५६,१३७.५० रुपये वसूल होणे आवश्यक आहे.

३) उपविभाग कारंजाचे वजन काटे पुरवठादाराने पुरवठा केल्याबाबत अर्धसमास पत्र क्र.४ दिनांक ११/१०/२०१३ नुसार मागणी करुन साठा नोंदवही लेखापरिक्षणास सादर केले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) पुरवठा आदेशानुसार आदेशाचे दिनांकापासून १५ दिवसात पुरवठा करणे आवश्यक होते. परंतु कारंजा तालुक्याला उशीरा पुरवठा केल्याने संबंधित पुरवठादार यांना प्रती आठवडा ०.५ टक्के प्रमाणे एकुण दोन आठवडयाकरिता रु. ३७६२/- एवढा दंड आकारण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने संबंधीत पुरवठादाराकडुन रुपये ३७६२/- एवढा दंड आकारण्यात आलेला आहे. चलान दप्तरी उपलब्ध आहे.

२) बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी अंगणवाडी पर्यवेक्षकांना वजनकाटे वाटप केले आहे. श्रीमती एल.एन.चौधरी अंगणवाडी पर्यवेक्षिका यांना दिनांक १८/४/२०१३ रोजी इलेक्ट्रॉनिक बेबी वेईग स्केल (CGMS) Basic वजन काटे १० नग देण्यात आले होते. परंतु नजरचुकीने स्वाक्षरी घेण्याचे राहिलेली होती. तदनंतर स्वाक्षरी घेण्यात आली आहे. श्रीमती एल.एन.चौधरी पर्यवेक्षिका यांनी त्यांच्य बीटमधील अंगणवाडयांना वजनकाटे वाटप केलेले आहेत.

३) एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प, कारंजा यांना इलेक्ट्रॉनिक वजन काटे पुरविल्याबाबत साठा पुस्तक दप्तरी उपलब्ध आहे. तसेच संबंधित कनिष्ठ सहाय्यक यांनी लेखा परिक्षणाकरिता अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्यामुळे, त्यांच्याकडून दंडाची रक्कम रुपये २५,०००/- वसुलीची कारवाई सुरू आहे.

**६) परिच्छेद क्रमांक ३.१०६९ (६१, ६२ व ६३) (सन २०१२-१३)**

**जिल्हा परिषदेने लेखापरिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे :-**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखा परिक्षणाचे काम सुरु करण्याचे ठरले जात त्या तारखे संबंधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरु झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुध्दा लेखापरिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतांनाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते.

त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेद लेखापरिक्षण पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करण्यासाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसाचे आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सूचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करुन देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करुन देऊनसुध्दा लेखापरिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल, जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हा परिषद | विभाग | लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवाल परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ६१ | वाशिम | बांधकाम | ०६ | १,८५,१७०/- |

| अ.क्र. | जिल्हा परिषद | विभाग | लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवाल परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ६२ | वाशिम | ग्रामीण पाणीपुरवठा | ०१ | २,४८,५१,०००/- |

| अ.क्र. | जिल्हा परिषद | विभाग | लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवाल परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ६३ | वाशिम | वित्त | ०४ | --- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) सदर अभिलेखे लेखा परिक्षण पथकास दाखविण्यात आले असून त्यावर हिरव्या पेन्सिलने तपासणी केल्याबाबत खुणा आहेत. त्यात आक्षेपामधील खर्चाची रु. १,८५,१७०/- ची प्रमाणके उपलब्ध आहेत.

२) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नळ पाणी पुरवठा योजनेची अंमलबजावणी अध्यक्ष/ सचिव ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत करण्यात आली आहे. त्यामुळे योजनेची सर्व दस्ताऐवज ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध आहेत.

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, वाशिम या कार्यालयाकडून प्रत्यक्ष झालेल्या कामाचे अनुषंगाने ग्रामपंचायतीकडुन झालेल्या कामाचे उपयोगिता प्रमाणपत्र व निधी वितरण मागणीचा प्रस्ताव प्राप्त झाल्याप्रमाणे चार टप्प्यामध्ये निधी वितरीत करण्यात येतो. सदर निधी वितरीत केल्याबाबतचे अभिलेखे नस्ती या कार्यालयाकडे उपलब्ध आहेत.

३) सन २०१२-१३ या वित्तीय वर्षाचे वार्षिक लेखा महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ६५ नुसार दिनांक ३० जुन, २०१३ पर्यंत तयार करुन लेखा परिक्षणास सादर करणे आवश्यक होते. तथापि, पंचायत समितीसह जिल्हा परिषदेचा एकत्रित वार्षिक लेखा तयार करण्यास विलंब झाल्यामुळे सन २०१२-१३ चा वार्षिक लेखा परिक्षणास सादर करता आलेला नव्हता.

सन २०१२-१३ या वार्षिक लेखा तयार करुन स्थानिक निधी लेखा कार्यालयाकडून तपासणी करुन घेवून शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे.

**७) परिच्छेद क्रमांक ४.२६१/१६ (सन २०१२-१३)**

**विशेष घटक योजने अंतर्गत सन २०१२-१३ मध्ये केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत** पंचायत समिती रिसोड यांनी विशेष घटक योजना अंतर्गत एकूण ७२ लाभार्थ्यांची निवड करुन प्राप्त अनुदानातून रुपये ५५,९०,०००/- इतका खर्च केला आहे. याबाबत अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

१) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. ३८० दि. २ मे, २०१२ व पत्र क्र. ३९५ दि. ५ मे, २०१२ अन्वये विशेष घटक योजना अनुसूचित जाती व उपयोजना अंतर्गत शेतकऱ्यांना अर्थसहाय्य योजनेचे मार्गदर्शक सुचनेनुसार योजना राबविण्यात आली नाही.

२) विहिरीचे प्रत्यक्ष भौगोलिक व भुस्तराची पाहणी न करता एकसारखी प्राकलने तयार केले आहेत. स्वतंत्ररित्या प्राकलने तयार केली नाहीत. खोदकामाचे भुस्तरानुसार जिल्हा दर सूचीनुसार प्रदान न करता रोजगार हमी योजनेचे दरानुसार जे दर फायदेशीर आहेत त्यांचे परिमाण व दर मापण पुस्तीकेत आकारण्यात आले.

३) बदल केलेल्या लाभास पुरवणी निवड यादी तयार करुन त्यास निवड समितीचे मंजुरी प्राप्त न करता लाभ देण्यात आला आहे.

४) विहिरितील पाण्याचा उपसा डिझेल इंजीनव्दारे करण्याचे मुल्यांकन मोजमाप नोंदवहित केले आहेत. परंतु दर्शविण्यात आलेल्या बि.एच.पी नुसार त्यास लागणारे इंधन व पाण्याचा उपसा केलेले तास याबाबत लॉगबुक ठेवण्यात आलेले नाही. लॉगबुक नोंदी अभावी सदर मुल्यांकनाची रक्कम रुपये ९२,६६४/- रुपये वसूल होणे आवश्यक आहे.

५) पुर्ण केलेल्या विहिरीची नोंद नमुना ७/१२ मध्ये नसतांना तसेच नवीन ७/१२ प्राप्त न करता अंतिम प्रदान केले आहे.

६) मास्टर नोंदवही अद्ययावत नोंदीसह ठेवण्यात आली नाही. त्यामुळे दुबार लाभ दिल्याची शक्यता असल्याने नाकारता येत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

**१)** कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक ३८० दिनांक २ मे, २०१२ व पत्र क्र. ३९५ दि. ५ मे, २०१२ अन्वये विशेष घटक योजना अनुसूचित जाती व उपयोजना अंतर्गत शेतक-यांना अर्थसहाय्य योजनेचे मार्गदर्शक सुचनेनुसार योजना राबविण्यात आलेली आहे.

**२)** चाचणी खड्डा (ट्रायल पिट) साठी तरतूद नसल्यामुळे विहिरीची भौगोलिक व भूस्तराची पाहणी न करता एक सारखे प्राकलने ढोबळ मानाने तयार केले आहे. वाशिम जिल्हा दख्खन पठारचा प्रदेश या भूस्तराच्या प्रकारामध्ये येत असून भौगोलिक दृष्टया व भूस्तराची रचना एक सारखी आहे त्यामुळे प्राकलने एक सारखी आहेत. प्राकलने लाभार्थीने स्वतंत्ररित्या तयार केली असून स्वतंत्ररित्या तांत्रिक मान्यता उप अभियंता लघु सिंचन उप विभाग वाशिम यांच्याकडून घेण्यात आलेली आहे. मार्गदर्शक सुचना परिशिष्ट २ मुद्दा क्र. १० मध्ये (शा.नि.क्र. रोहयो २००७/प्र.क्र.१७९/रोहयो-१ मंत्रालय, मुंबई-३२ दि. १० एप्रिल, २००८) सुचविल्याप्रमाणे नवीन विहिर खोदकामासाठी रोजगार हमी योजनेचे आर्थिक निकष वापरण्यात आले आहेत. सदर योजना राबवितांना रोजगार हमी योजनेचे सुधारित मापदंडानुसार भूस्तरनिहाय नवीन विहिरीकरीता खर्चाचे मापदंड लागू असल्यामुळे प्राकलने तयार करताना रोजगार हमी योजनेचे तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग दरसूची सन २०१०-११ नुसार घेण्यात आली आहे. तांत्रिक अधिका-यांनी सदर कामास ज्या दरानुसार मंजूरी दिली त्याच दरानुसार दर आकारुन रक्कमेची अदायगी केली आहे.

**३)** सन २०१२-१३ मध्ये निवड झालेल्या लाभार्थ्यांच्या मुळ प्रस्तावामध्ये नमूद असलेल्या बाबीला निवड समितीने मंजुरात दिली. सदर निवड झालेल्या लाभार्थ्यांना मार्गदर्शन करणेसाठी दिनांक १२/१२/२०१२ रोजी बुधवार ला सभा आयोजित करण्यात आली होती. सदर सभेमध्ये लाभार्थ्यांनी बाब बदलून मागितल्याने तसेच लाभार्थ्यांना १४ बाबींचा लाभ देय असून तो त्यांच्या इच्छेनुसार देय असल्यामुळे लाभार्थ्यांकडून लेखी घेऊन त्यानुसार एकत्रित आराखडा दि. १३/१२/२०१२ रोजी पुढील मंजुरीस्तव कृषी विभाग, जिल्हा परिषद, वाशिम येथे सादर करण्यात आला. तरी सदर लाभार्थ्यांना बाब बदल करुन मंजुरात प्राप्त झाल्यामुळे त्यांना त्याप्रमाणे लाभ देण्यात आला आहे. मंजुर प्रत दप्तरी उपलब्ध आहे.

**४)** विहिरीतील पाण्याचा उपसा डिझेल इंजिनद्वारे करण्याचे मूल्यांकन एकूण ११ लाभार्थ्यांचे मोजमाप पुस्तिकेत परिगणित केलेले असूनत्यांचे लॉंगबुक ठेवले आहे. प्रत्यक्ष एकूण मुल्यांकन ५५,४५८/- रुपये होते.

उर्वरित ८ लाभार्थ्यांचे पाण्याचा उपसा डिझेल इंजिनद्वारे करण्याचे मुल्यांकन मोजमाप पुस्तिकेत परिगणित केलेले नसतांना व अदा केलेली नसताना रक्कम रुपये ३७,२०६/- वसुलपात्र दाखविण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर रक्कम लॉंगबुक व मोजमाप पुस्तिकेची छायांकित प्रत दप्तरी उपलब्ध आहे.

**५)** शेतकऱ्यांच्या शेतामध्ये प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर व प्रत्यक्ष विहिरीचे खोदकाम व बांधकाम पूर्ण झाल्याबाबत खात्री पटल्यानंतर लाभार्थ्यांना व संबंधीत तलाठयांना सदर विहिरीची नोंद ७/१२ उतारा व फेरफार नोंद घेण्याबाबतीत पत्र देण्यात आले होते. सदर नोंदीच्या प्रक्रियेस विलंब होत असल्यामुळै तसेच आर्थिक वर्ष अखेर अनुदान अखर्चित राहु नये, या बाबी लक्षात घेऊन अंतिम प्रदान देण्यात आले. तरी सद्य:स्थितीत संबंधित शेतकऱ्यांना ७/१२ दप्तरी उपलब्ध आहे.

**६)** कृषी विभाग पंचायत समिती, रिसोड येथे सदर योजनेचे मास्टर नोंदवही ठेवलेली असून अद्ययावत आहे. लाभार्थ्यांना दुबार लाभ दिलेला नाही.

**८) परिच्छेद क्रमांक ४.४३७ (४८) (सन २०१२-१३)**

**पंचायत समित्यांनी लेखापरिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे :-**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखा परिक्षणाचे काम सुरु करण्याचे ठरले जात त्या तारखे संबंधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरु झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुध्दा लेखापरिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतांनाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेद लेखापरिक्षण पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करण्यासाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसाचे आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सूचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करुन देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करुन देऊनसुध्दा लेखापरिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल, जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| **अ.क्र.** | **जिल्ह्याचे नाव** | **पंचायत समितीचे नाव** | **लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवाल परिच्छेद क्रमांक** | **रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|
| ४८ | वाशिम | मंगरुळपीर | ६ | ३३,५७,८०५/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध न केल्याबाबत संबंधितांकडून रुपये २५,०००/- दंडाची वसुली करण्यात आली आहे व सद्यस्थितीत अभिलेखे दप्तरी उपलब्ध आहेत.

**९) परिच्छेद क्रमांक ५.३१/६ (सन २०१२-१३)**

**जिल्हा ग्रामविकास निधी सन २००८-०९ मधून कर्ज घेऊन केलेल्या सिमेंट काँक्रीट रस्ता बांधकामातील अनियमितता.**

जिल्हा ग्रामविकास निधीतून कर्ज घेऊन रुपये ८,३१,३९६/- इतका खर्च केला याबाबत खालील प्रमाणे आभिप्राय आहेत.

१) खर्च प्रमाणके सरपंच यांनी प्रमाणित केली नाहीत.

२) काम पुर्ण होण्यापूर्वी कार्यकारी अभियंता यांची तपासणी झाल्याशिवाय अंतिम देयक अदा करु नये असे असतांना तशा प्रकारची तपासणी केलेली नाही.

३) बांधकाम साहित्याची तपासणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रयोगशाळेतुन केल्याचे आढळून आले नाही.

४) रुपये ५०,०००/- वरिल साहित्य खरेदीकरिता निविदा मागवून खरेदी करणे आवश्यक होते. परंतु तसे केलेले नाही. खुलासा होणे आवश्यक आहे.

५) रिकाम्या सिमेंट गोण्यांची विक्री करुन रक्कम जमा करण्यात आलेली नाही. त्यामुळे बाजार भावाप्रमाणे रक्कम वूसल करणे आवश्यक आहे.

६) ग्रामपंचायत लेखासंहिता २००५ चे नियम २६ नुसार रु. १०००/- चे वरील प्रदान रेखांकीत धनादेशाने करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) सद्यःस्थितीत सरपंच यांनी प्रमाणित केलेले प्रमाणके ग्रामपंचायत दप्तरी उपलब्ध आहे.

२) जिल्हा ग्राम विकास निधी अंतर्गत सिमेंट क्रॉंक्रिट रस्ता बांधकाम हे ग्रामपंचायतीने शाखा अभियंता पंचायत समिती मालेगांव ह्या तांत्रिक अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली बांधकाम पूर्ण केली असून सदर कामाचे मुल्यांकन करुन उप अभियंता यांनी पूर्णत्वाचा दाखला दिलेला आहे.

३) सदर योजने अंतर्गत रस्ता बांधकामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याची तपासणी प्रयोग शाळेतून करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत तपासणी अहवाल ग्रामपंचायत दप्तरी उपलब्ध आहे.

४) जिल्हा ग्राम विकास निधी अंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रस्ते बांधकामाकरिता रुपये ५०,०००/- चे वरिल साहित्य खरेदी ग्रामपंचायती ने दरपत्रक मागवून केलेली आहे.

५) या कामाचे सिमेंटच्या रिकाम्या गोण्या वापरुन वनराई बंधारे बनविण्यात आले आहे. सदर वनराई बंधाऱ्यांचे छायांकित फोटो ग्रामपंचायत दप्तरी उपलब्ध आहे.

६) जिल्हा ग्राम विकास निधी अंतर्गत सिमेंट कॉंक्रिट रस्ता बांधकामाकरिता कामावर असलेल्या मजुरांची व मिक्सर मशिन भाडे धारकांचे बँकेत खाते नसल्याने त्यांच्या मागणीनुसार त्यांना रु. १०००/- वरिल रक्कम ही रोखीने अदा करण्यात आली आहे.

परिच्छेदात केलेल्या अनियमिततेबाबत तत्कालिन ग्रामसेवक एस.आर. काकडे यांची एक वार्षिक वेतनवाढ बंद करण्याची शिक्षा देण्यात आली आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

वाशिम जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १७ व १९ जानेवारी, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने असे निदेश दिले की, सन २०१२-१३ या वर्षाच्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेद क्रमांक ३.४६, ३.१८०, ३.१८२, ३.९९१, ३.१०२२, ३.१०६९ (६१), ३.१०६९ (६२), ३.१०६९ (६३), ४.२६१, ४.४३७ (४८), ५.३१ हे सर्व परिच्छेद लेखापरीक्षणास अभिलेखे सादर न करण्यासंदर्भातील आहेत. त्यामुळे या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अहवाल सादर करावा व यासंदर्भात मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये २५ हजार रुपये दंड आकारावयाचा असून सेवापुस्तिकेत नोंदही घ्यावयाची आहे. तसेच, वेतनवाढ रोखण्यासंदर्भात देखील तरतूद आहे. ही सर्व कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या स्तरावर करावी व समितीला एक महिन्याच्या आत अहवाल सादर करावा. त्यानंतर विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

१) सन २०१२-१३ या अहवाल वर्षात लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन दिले नसल्या प्रकरणी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर समितीच्या निर्देशानुसार महाराष्ट्र स्थानिक लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अनुसार दंडाची व एक वेतनवाढ रोखुन तशी नोंद संबंधिताचे सेवापुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई केली आहे काय, त्यानुसार प्रकरण व परिच्छेद निहाय दोन्ही अहवाल वर्षाची माहिती समितीस सादर करण्यात यावी.

२) भविष्यात लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध न करुन देणे असे आक्षेप वारंवार उपस्थित होवू नयेत याबाबत काटेकोर अंमलबजावणी करण्या संदर्भात मंत्रालयीन विभागाकडुन कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१) सन २०१२-१३ या अहवाल वर्षात लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन दिले नसल्याप्रकरणी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर समितीच्या निर्देशानुसार महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | केलेली कारवाई |
|---|---|---|
| १) | श्री.अमोल रामदास कोकाटे, कनिष्ठ सहाय्यक | १ वेतनवाढ रोखली व रुपये २५,०००/- दंड वसुल केला |
| २) | श्री.बी.एन.ठाकरे, विस्तार अधिकारी (कृषी) | १ वेतनवाढ रोखली व रुपये २५,०००/- दंड वसुल केला |
| ३) | श्री.आर.डी.मनवर, अधिक्षक, शालेय पोषण आहार | रुपये २५,०००/- दंड वसुल केला |
| ४) | श्री.ए.एम.देशमुख, कनिष्ठ लेखा अधिकारी | १ वेतनवाढ रोखली व रुपये २५,०००/- दंड वसुल केला |

२) भविष्यात लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करुन न देणे असे आक्षेप वारंवार उपस्थित होवू नयेत याकरिता दक्षता घेण्यात येत आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त-७) महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३७/कोषा-प्रशा-४/ दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ च्या परिपत्रकानुसार मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम, १९३० मधील कलम ७ (सुधारीत अधिनियम २०११ मधील कलम ८ ) नुसार लेखापरिक्षणासाठी विहीत मुदतीत अभिलेखे उपलब्ध न झालेस दंडात्मक कारवाईचा प्रस्ताव विभागीय सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा यांनी विभागीय आयुक्त यांचेकडे सादर करावा असे निर्देश आहेत. जिल्हा परिषदेच्या स्तरावरून कार्यवाही करण्यात आलेली आहे.

२) महालेखापाल व स्थानिक निधी लेखा परिक्षण सुरू असताना त्यांना लेखा परिक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करुन देण्यासाठी नोडल ऑफिसरची नियुक्ती करण्याबाबतच्या सूचना सर्व जिल्हा परिषदांना या विभागाच्या परिपत्रक क्र.लेखाप २०१३/ (७/९३), वित्त-८ दि.११ फेब्रुवारी, २०१३ व परिपत्रक क्र. पंरास-२०१५/प्र.क्र.२८/वित्त-७ दि.३० मार्च, २०१६ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने वाशिम जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २२ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे यामध्ये दंड वसूल करण्यात यावा, वेतनवाढ रोखण्यात यावी व सेवा पुस्तिकेमध्ये नोंद घेण्यात यावी, अशा प्रकारची कारवाई करण्यात यावी, असे सांगितले होते.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, सदरहू विषयाबाबतची कारवाई करण्यात आलेली आहे.

## अभिप्राय व शिफारशी

वाशिम जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समवेत झालेल्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, सन २०१२-१३ च्या स्थानिक निधी लेखा परिक्षणाच्या वेळी लेखा परिक्षकांस ते तपासणी करीत असताना त्यांनी मागितलेली कागदपत्रे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी दाखविली नाहीत. सन २०१२-१३ या वर्षाचे एकूण ९ परिच्छेदांच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार रुपये २५०००/- इतकी दंडाची शास्ती तसेच एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करुन तशी नोंद संबंधितांचे सेवा पुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई करण्याची शिफारस करुन देखील काही अधिकारी या नियमास न जुमानता लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन देत नाहीत.

समिती राज्यात अनेक ठिकाणी भेट देत असताना लेखा परिक्षकांना अभिलेखे संबंधित अधिकाऱ्यांकडून वेळीच उपलब्ध करुन दिले जात नाहीत. त्यामुळे लेखापरिक्षण करता येत नाही. या बाबींचा फायदा संबंधितांकडून घेतला जातो हे टाळण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या दंडात्मक तरतुदीत बदल करणे आवश्यक आहे. सदर बाब विचारात घेता आता समिती अशी शिफारस करीत आहे की, **'जी कोणतीही व्यक्ती कलम ६ पोटकलम (१) खंड (अ) किंवा खंड (ब) अन्वये कायदेशीररित्या तिला केलेल्या कोणत्याही आज्ञेचे पालन करण्यात जाणूनबुजून दुर्लक्ष करेल किंवा तिचे अनुपालन करण्याचे नाकारेल ती विभागीय आयुक्तांपुढे सदर बाब सिध्द झाल्यानंतर लेखापरिक्षणास उपलब्ध न झालेले दस्तऐवज/अभिलेख यामध्ये गुंतलेल्या एकूण रक्कमेच्या ५% किंवा रुपये ५०,०००/- यापैकी जास्त असणाऱ्या रक्कमे इतक्या दंडात्मक रक्कमेस पात्र ठरविण्यात यावी. तसेच त्यांची एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करुन तशी नोंद संबंधितांच्या सेवा पुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई करण्यात यावी'** अशी सुधारणा संबंधित अधिनियमात करण्यात यावी व करण्यात आलेल्या रक्कमेबाबतची माहिती समितीला कळविण्यात यावी.

ज्या प्रकरणामध्ये अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत, त्या प्रकरणांमध्ये दंडात्मक कारवाई केलेली दंड आकारणी करण्यात यावी. समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी केलेल्या अनुपालन अहवालामध्ये सदर अभिलेखे उपलब्ध असल्याचे स्पष्टीकरण केले आहे. मात्र सदर अभिलेखे लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. **वाशिम जिल्हा परिषदेमध्ये सन २०१२-१३ या वर्षामध्ये एकूण ९ परिच्छेदांसंदर्भात अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अभिलेखे लेखापरिक्षणाच्यावेळी सादर करण्यात आलेले नाहीत अशा सन २०१२-१३ मधील परिच्छेदासंदर्भात कलम ६ मधील पोटकलम (१) खंड (अ) किंवा खंड (ब) नुसार कायदेशीर कारवाई करुन वसुल केलेली रक्कम व गुंतलेली एकूण रक्कम याबाबतचा सविस्तर अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण दहा
## जिल्हा परिषद, वाशिम
## सर्वसाधारण शिफारशी

**१. गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रक्कमा जमा करण्याबाबत :-**

समितीने राज्यातील जिल्हा परिषदांना भेटी दिल्या असता विशेषतः वाशिम जिल्हा परिषदेत गैरव्यवहार व अपहाराच्या मोठ मोठ्या रकमा वसुलीविना प्रलंबित आहेत. अशी अनेक प्रकरणे समितीसमोर तपासणीसाठी आली असता समितीने या प्रकरणात सदरच्या रकमा शासन खाती जमा करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदेशित केले आहे. सदर गैरव्यवहाराची/अपहाराची अनेक प्रकरणे असून ती जुनी आहेत. जिल्हा परिषदांनी वेळीच कार्यवाही केली असती तर शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी या प्रकरणांमध्ये अडकून पडला नसता व तो वेळीच वसूल झाला असता. जिल्हा परिषदांनी सदरच्या रकमा संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करुन वसुल केल्या असत्या तर या रकमा केंव्हाच शासन खाती जमा झाल्या असत्या. शासनाचा विविध योजनांवरील निधी हा गैरव्यवहाराने जेव्हा हडपला जातो तेव्हा त्या त्या योजना राबविताना त्यात निश्चितच मोठ्या प्रमाणावर अनियमितता होऊन योजनेच्या फलनिष्पत्तीवर त्याचा विपरीत परिणाम होतो असे समितीला आढळून आले आहे. जिल्हा परिषदांकडून त्यांच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात विलंब होत असल्यामुळे जिल्हा परिषदा अशा कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत असून त्यांचेवरील संभाव्य कार्यवाहीस पुढे ढकलण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्याद्वारे एकप्रकारे शासनाचा निधी वेळीच वसूल होत नसल्यामुळे याबाबत मोठ्या प्रमाणात प्रशासकीय अनियमितता होत असल्याचे समितीला आढळून आले आहे. **याप्रकरणी समिती अशी शिफारस करीत आहे की, जिल्हा परिषदेची योजना राबविताना संबंधित योजनेत एखादा गैरव्यवहार अथवा अपहार उघडकीस आला असल्यास त्या गैरव्यवहारासंदर्भात कोणत्याही परिस्थितीत तीन महिन्यात दोषारोपपत्र दाखल करुन असे प्रकरण सहा महिन्यात निकाली काढण्यासंदर्भात शासनाने निश्चित अशी भूमिका घ्यावी त्याचप्रमाणे अशी कार्यवाही मुदतीत पूर्ण करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या संबंधित विभाग प्रमुखांवर सोपविण्यात यावी व असे विभाग प्रमुख गैरव्यवहाराच्या अथवा अपहाराच्या रकमा सहा महिन्यात शासन खाती जमा करण्यात अयशस्वी झाल्यास त्यांचेविरुध्द जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर त्या प्रकरणी शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत विभागाने ठोस भूमिका घ्यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

शासनाकडून एखादी योजना राबविताना कोट्यवधी रुपयांचा निधीची तरतूद करुन मिळविला जातो मात्र असा निधी वेळेत खर्च केला जात नाही व तो शासन खाती देखीलजमा केला जात नाही. त्यामुळे वित्तीय बाबीत मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असून संबंधित अधिकाऱ्यांकडून रक्कम वेळीच खर्च करण्याबाबत कमालीचा हलगर्जीपणा करण्यात येतो. कोट्यवधी रुपये अखर्चित ठेवल्यामुळे शासनाला असा निधी आवश्यक असणाऱ्या अत्यंत महत्वाच्या योजनांवर खर्च करता येत नाही. पर्यायाने विविध भौगोलिक भागातील निधी वाटपातील असंतोष वाढतो. खर्चाच्या बाबतीतील अनियमितता व योजना राबविण्याच्या कामातील अधिकाऱ्यांद्वारा होत असलेला हलगर्जीपणा हा प्रशासकीयदृष्ट्या अत्यंत गंभीर असून त्यामुळे अखर्चित निधी राहून तो दुसऱ्या महत्वाच्या योजनांवर खर्च केला जात नाही. **म्हणून एखाद्या योजनेसाठी मागितलेला निधी त्या योजनेची उपयुक्तता तसेच जनसामान्यांच्या हिताचा विचार करुन राबविणे आवश्यक आहे. जनतेला देय असलेल्या सुविधा योजना राबवून वेळीच मिळत नसल्याने जनतेत नैराश्य व संतापाच्या भावना वाढीस लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता अखर्चित रकमेवर बंधन टाकण्यासंदर्भात शासनाने यासंदर्भात कडक धोरण आखून त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात जिल्हा परिषदांना एका परिपत्रकाद्वारे कळविण्यात यावे अशीही समितीची शिफारस आहे.**

**गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्यासंदर्भात समितीने उपरोक्तप्रमाणे केलेल्या शिफारशीनुसार यासंदर्भात शीघ्रतेने कार्यवाही करुन वाशिम जिल्हा परिषदेमधील रक्कमा शासन खाती जमा करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व पंचायती राज समितीने तपासणी केलेल्या अहवालासंदर्भात एकूण किती रकमेची शासन खाती वसुली केली याबाबीची माहिती समितीला कळविण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे.**

**२. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे :-**

समितीने वाशिम जिल्हा परिषदेला भेट दिली असता अनेक लेखा परिच्छेदांमध्ये लेखा परिक्षकांना संबंधित लेख्यांवरील कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नसल्याने त्याबाबतचा अंतिम अभिप्राय लेखा परिक्षकांस व्यक्त करता आला नाही. याबाबत समितीने असे लेखे विचारात घेतले असता अनेक प्रकरणात लेखा परीक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध नव्हती आता उपलब्ध आहेत असे समितीला सांगण्यात आले. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध नव्हती त्याची कारणे काय या शोधात समितीला अनेक गंभीर बाबी निदर्शनास आल्या. **मुळात कागदपत्रे उपलब्ध असतानाही ते लेखा परिक्षणास न दाखविणे ही गंभीर बाब आहे. तो सरळ शिस्तभंगाचा प्रकार आहे. लेखा परीक्षक**

**सुरुवातीला कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यासाठी चार महिन्यांचा वेळ देतात व त्यानंतर पुन्हा दोन महिन्यांचा कालावधी संबंधितांना दिला जातो. असे असूनदेखील संबंधित अधिकारी लेखा परीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन देत नाहीत. मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ मध्ये सन २०११ पूर्वी लेखा परीक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करुन देणाऱ्या अधिकाऱ्यास केवळ १०० रुपयांचा दंड आकारण्यात येत असे. कदाचित त्यामुळे लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध होत नसतील अशी समितीने भावना व्यक्त केल्यानंतर शासनाने सन २०११ मध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ७ मध्ये सुमारे २५,००० रुपये (पंचवीस हजार रुपये) दंडाच्या रकमेची तरतूद केली आहे. समितीने या प्रकरणी जिल्हा परिषदांना ज्या कोणी लेखा परीक्षणाचे वेळी लेखा परिक्षकांस कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नाहीत अशा जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधितांना अधिनियमातील तदतुदीनुसार रु.२५,०००/- इतका दंड आकारण्याची शास्ती करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार वाशिम जिल्हा परिषदेमध्ये अशा किती व्यक्तींना प्रत्येक प्रकरणी दंड करण्यात आला व एकूण किती रक्कम शासन खाती जमा करण्यात आली याची संपूर्ण माहिती प्रकरणनिहाय समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**३. नियमानुसार व नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरुन दोषीतांवर कारवाई करण्याबाबत :-**

संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीततेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, प्रभावी व अर्थपूर्ण असे नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे म्हणून कार्यकारी प्रशासन राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी पंचायती राज समितीची रचना करण्यात आली. समितीला अधिकार मिळाल्यावरुन समितीने अनेक प्रकरणात दोषीतांवर कार्यवाही करण्याबाबत शासनाला निर्देश दिले आहेत. असे निर्देश देत असताना समितीने एखाद्या अधिकारी/कर्मचाऱ्याची प्रथमदर्शनी चूक आढळून देखील संबंधित दोषींविरुध्द जाणीवपूर्वक निलंबनाची कारवाई प्रस्तावित केलेली नाही. भारतीय संविधानाने प्रत्येकाला समान संधी देण्याचे धोरण दिल्याने कारवाई करतानादेखील दोषीताने तो निर्दोष असल्याचे अभिकथन करणे आवश्यक आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते. कोणत्याही निर्दोष व्यक्तीवर दोष लादले जाणे हे नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरुन नाही असे समितीला वाटते. म्हणून प्रशासनाने कार्यवाही करताना कोणत्याही निर्दोष व्यक्तीला शास्ती करुन नये आणि दोषी व्यक्तीला कोणत्याही परिस्थितीत शास्तीविना सोडू नये असे समितीला वाटते. भेटीच्या वेळी संबंधित प्रकरणाची निष्पक्षपणे चौकशी करुन चौकशी अहवालामध्ये दोषीविरुध्द कार्यवाही करुन त्यास शिक्षा करणे योग्य आहे. **तथापि, एखाद्या निर्दोष व्यक्तीवर कारवाई केल्यास त्यात समितीच्या सूचनेनुसार कारवाई केली असे म्हणणे ही बाब समाजाची लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास उडवणारी आहे. जनमानसात समितीची भूमिका ही प्रशासनाने केलेल्या चांगल्या व वाईट बाबींना शोधून काढून त्यातून जनतेप्रती महत्वाची कामे कशी केली जातील याबाबतची प्रतिमा उभी करणे हे संसदीय लोकशाहीने दिलेले एक कर्तव्य आहे. समितीची नाहक बदनामी काही कर्तव्यपारायणवता व सचोटी नसलेले अधिकारी निर्माण करतात आणि जाणीवपूर्वक वैयक्तिक द्वेषापोटी, हेवेदाव्यापोटी निर्दोष व्यक्तींवर कार्यवाही करुन समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सतर्क राहणे आवश्यक असून एखादा गुन्हेगार सुटत असताना त्यास नैसर्गिक न्याय मिळेल परंतु एखाद्या निर्दोष व्यक्तीला शिक्षा होता कामा नये ही समितीची भूमिका असल्यामुळे समितीने ज्या ज्या प्रकरणांमध्ये चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत. अशा सर्व प्रकरणांमध्ये दोषारोपांची चौकशी करताना सर्व संबंधित व्यक्तींना नैसर्गिक न्याय तत्वानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार संपूर्ण वस्तुस्थिती विचारात घेतल्यानंतरच निःपक्षपातीपणे कार्यवाही करुन दोषींना शास्ती तर निर्दोषींना मुक्ती या तत्वानुसार कारवाई करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

# परिशिष्ट (अ)
# शासनाचे आदेश व परिपत्रके

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना निधी
अर्थसंकल्पीत करणे,वितरीत करणे व या
निधीतील कामांना प्रशासकीय मान्यता
देणेबाबतची सुधारीत कार्यपध्दती

(परिशिष्ट क्र.१.१)

महाराष्ट्र शसन
नियोजन विभाग
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
शासन निर्णय क्रमांकः जिवायो १००७/प्र.क्र.३९/का-१४४४
दिनांक : १६ फेब्रुवारी, २००८

**प्रस्तावना**:- जिल्हा हा नियोजनाचा आधारभूत घटक मानून विकेंद्रीत नियोजनाची प्रक्रिया १९७४-७५ पासून सुरु करण्यात आली. जिल्हा नियोजनासाठी प्रत्येक जिल्हयात "जिल्हा नियोजन समिती " कार्यरत आहे. राज्याच्या योजनांच्या आकारमानाच्या अनुषंगाने जिल्हा योजनेसाठी द्यावयाची रक्कम ठरल्यावर त्या रकमेचे जिल्हानिहाय वाटप संबंधित जिल्ह्यांना करण्यांत येते. त्याप्रमाणे जिल्ह्याचे पालकमंत्री यांचे अध्यक्षतेखाली असलेली जिल्हा नियोजन समिती जिल्हा योजनेची आखणी करते व सदरची योजना मा.मंत्री (नियोजन) यांचेबरोबर चर्चा करून अंतिम केली जाते.

२. **जिल्हा योजनेची सध्याची कार्यप्रणाली:-** जिल्हा योजनेमधून प्रस्तावित योजनेवर निधीचे वाटप प्रशासकीय विभागनिहाय करून सदरची रक्कम संबंधित प्रशासकीय विभागांना कळविण्यांत येते व सदर निधी अर्थसंकल्पीत करून घेणे, निधीचे वाटप जिल्हा स्तरापर्यंत करणे, योजनांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देणे व त्याचे समन्वयन, संनियंत्रीत करणे इत्यादी बाबी संबंधित प्रशासकीय विभागामार्फत केल्या जातात.

**३. सध्याच्या कार्यप्रणाली बाबतचा अनुभव :-**

अ) सर्व जिल्ह्यांच्या नियोजन समितीने मान्य केलेला योजनावार निधी प्रशासकीय विभागांना कळविल्यानंतर सदरचा निधी अर्थसंकल्पित करण्यास कालावधी लागतो. काही निधी अर्थसंकल्पीय अधिवेशनात अर्थसंकल्पीत होतो. परंतु काही निधी नंतरच्या अधिवेशनातअर्थसंकल्पित केला जातो.

ब) अर्थसंकल्पित झालेला निधी मंत्रालयीन प्रशासकीय विभाग त्यांच्या राज्यस्तरीय आयुक्तालय/संचालनालय, विभागीय कार्यालये यांचेमार्फत जिल्हा यंत्रणेला वितरीत करतात. या प्रक्रियेस कांही कालावधी लागतो आणि त्यामुळे जिल्हा योजनेची रक्कम जिल्ह्याला मिळण्यास विलंब होतो.

क) जिल्हा योजनेला प्रशासकीय मान्यता देण्याबाबत प्रस्ताव जिल्हा यंत्रणेकडून विभागीय यंत्रणेला, राज्यस्तरीय आयुक्तालय/संचालनालय यांना व त्यानंतर मंत्रालयीन प्रशासकीय विभागाला सादर केला जातो व प्रशासकीय मंत्रालयीन विभागाची मान्यताही त्या

..२

पद्धतीने जिल्हा यंत्रणेपर्यंत पोहोचते. या प्रक्रियेसही कांही कालावधी लागतो.

ड) प्रशासकीय विभागांनी अर्थसंकल्पित तरतूद केल्यानंतर त्यापैकी कोणत्या जिल्ह्यासाठी किती तरतूद आहे याबद्दलची माहिती अर्थसंकल्पात उपलब्ध नसते.

वरील कारणांमुळे जिल्हा योजना राबविण्यामध्ये कांही कालावधी लागतो आणि कांही वेळेस रक्कम पूर्णपणे खर्च होत नाही व एका जिल्ह्याने केलेली तरतूद दुसऱ्या जिल्ह्यात वापरली जाण्याची शक्यता असते किंवा एखादी जिल्हास्तरीय योजनेची रक्कम राज्यस्तरीय योजनेवरसुद्धा खर्ची पडू शकते.

वरील कारणांमुळे सध्याच्या पद्धतीत बदल करून मंजुर निधी लवकरात लवकर जिल्हा योजनेला उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यावर शासनाचा निर्णय होवून तो खालीलप्रमाणे आहे.

**शासन निर्णयः-** सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेचा निधी अर्थसंकल्पीत करुन वितरीत करणे व त्यामधील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबतच्या प्रचलित कार्यपध्दतीमध्ये बदल करुन यापुढे जिल्हा वार्षिक योजनेचा निधी अर्थसंकल्पीत करणे, तरतुदीचे वितरण व प्रशासकीय मान्यता प्रदान करणे, तसेच पुनर्विनियोजन करणे इ. बाबत खालील नमूद केल्याप्रमाणे सुधारीत कार्यपध्दती अवलंबण्यात येईल

**१. <u>जिल्हा योजनेचा आराखडा तयार करणे</u> -**

१.१ नियोजन विभागाच्या आदेशानुसार निर्गमीत केलेल्या जिल्हा वार्षिक योजनेच्या तयार करावयाच्या आराखड्या संदर्भातील वेळापत्रकानुसार कार्यवाहीस सुरवात करावी.

१.२ जिल्हा वार्षिक योजनेचा आराखडा तयार करतांना मानव विकास निर्देशांक उंचावणे, जिल्ह्याच्या मुलभुत गरजा, सामाजिक व भौगोलिक व्याप्ती यांचा विचार करण्यात यावा.

१.३ योजना प्रधान लेखाशिर्षवार दाखविण्यात याव्या.

१.४ चालु योजनांच्या उर्वरीत खर्चावर प्राथम्याने विचार करण्यात यावा.

१.५ आराखड्यात कामे प्रस्तावित करतांना अपूर्ण कामांना लागणा-या निधीची पूर्ण तरतुद केल्यानंतरच नवीन बाबी/कामे प्रस्तावित करावीत.

१.६ जिल्हा आराखड्यात प्रस्तावित केलेल्या नियतव्यय मर्यादेतून अपूर्ण कामांना लागणारा निधी वजा करुन उर्वरीत रकमेच्या दीड पट रकमेच्या मर्यादेतीलच नवीन कामे प्रस्तावित करता येतील.

१.७ जिल्हा वार्षिक योजनेतून घेण्यात येणारी कामे २ वर्षाच्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील.

१.८ "नवीन योजनांच्या" बाबतीत (New Schemes/ New Items) संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी तांत्रिक व प्रशासकीय मान्यता दिली असेल व त्या योजनांना शासनाची मान्यता मिळालेली आहे असे कळविल्यानंतरच या नवीन योजनांसाठी जिल्हा योजनेमध्ये तरतुद प्रस्तावित करावी. सदर नवीन योजनांसाठी विधीमंडळाची मान्यता मिळविण्याची जबाबदारी संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांची राहील.

१.९ नवीन योजनांच्या बाबतीत जर पद निर्मितीचा समावेश असेल तर विहित पद्धतीचा अवलंब करुन पदांना शासनाची मान्यता मिळाल्यानंतरच अशा योजनांचा समावेश जिल्हा योजना आराखड्यात करावा.

१.१० आराखड्यात प्रस्तावित प्रत्येक योजनेच्या खर्चाची बाबवार माहिती देणे आवश्यक राहील.

१.११ आराखड्यात मान्य केलेल्या नियतव्ययात जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेशिवाय बदल करता येणार नाही.

१.१२ राज्यस्तरीय बैठकीत जिल्हा वार्षिक योजनेचा अंतिम आराखडा निश्चित करण्यात येईल.

## २. वार्षिक योजनेचा निधी अर्थसंकल्पित करणे-

२.१ सध्या जिल्हा नियोजन समितीने प्रस्तावित केलेल्या तरतुदी एकत्रित करुन तसेच राज्य स्तरावर काही तरतुदी करावयाच्या असल्यास त्यांचा समावेश करुन संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागामार्फत एकत्रित तरतुदी विधीमंडळासमोर अर्थसंकल्पात सादर केल्या जातात व विधीमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर सदर निधीचे वाटप मंत्रालयीन प्रशासकीय विभागांमार्फत जिल्हयांना केले जाते. या प्रक्रियेत काही कालावधी लागतो व जिल्हा स्तरावर योजना कार्यान्वयीन करण्यासाठी तितका वेळ कमी उपलब्ध होतो.

२.२ नवीन पध्दतीमध्ये जिल्हा नियोजन समितीने मान्य केलेल्या जिल्हा योजनेसाठीची अर्थसंकल्पीय तरतुद नियोजन विभागाच्या अर्थसंकल्पीय प्रकाशनात जिल्हानिहाय स्वतंत्र मागणीखाली विधी मंडळाला सादर केली जाईल. त्या मागणी क्रमांकामध्ये त्या जिल्ह्याच्या विभिन्न प्रधान शिर्ष, उप शिर्ष निहाय तपशिलवार तरतुद दर्शविली जाईल.

२.३ जिल्हावार मागणी क्रमांक खालीलप्रमाणे राहतील :-

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | मागणी क्रमांक | अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | मागणी क्रमांक | अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | मागणी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई शहर | ओ-१० | १३ | सातारा | ओ-२२ | २५ | गोंदिया | ओ-३४ |
| २ | मुंबईउपनगर | ओ-११ | १४ | सांगली | ओ-२३ | २६ | चंद्रपूर | ओ-३५ |
| ३ | ठाणे | ओ-१२ | १५ | सोलापूर | ओ-२४ | २७ | गडचिरोली | ओ-३६ |
| ४ | रायगड | ओ-१३ | १६ | कोल्हापूर | ओ-२५ | २८ | औरंगाबाद | ओ-३७ |
| ५ | रत्नागिरी | ओ-१४ | १७ | बुलढाणा | ओ-२६ | २९ | जालना | ओ-३८ |
| ६ | सिंधुदूर्ग | ओ-१५ | १८ | अकोला | ओ-२७ | ३० | बीड | ओ-३९ |
| ७ | नाशिक | ओ-१६ | १९ | वाशिम | ओ-२८ | ३१ | परभणी | ओ-४० |
| ८ | धुळे | ओ-१७ | २० | अमरावती | ओ-२९ | ३२ | हिंगोली | ओ-४१ |
| ९ | नंदूरबार | ओ-१८ | २१ | यवतमाळ | ओ-३० | ३३ | नांदेड | ओ-४२ |
| १० | जळगाव | ओ-१९ | २२ | नागपूर | ओ-३१ | ३४ | उस्मानाबाद | ओ-४३ |
| ११ | अहमदनगर | ओ-२० | २३ | वर्धा | ओ-३२ | ३५ | लातूर | ओ-४४ |
| १२ | पुणे | ओ-२१ | २४ | भंडारा | ओ-३३ | | | |

२.४ सर्व जिल्ह्यांची जिल्हावार मागणी नियोजन विभागाच्या एकाच पुस्तकामध्ये विधी मंडळासमोर मान्यतेसाठी सादर करण्यात येईल. त्यामध्ये प्रधान शिर्षनिहाय महसुली खर्च, भांडवली खर्च व कर्ज यांची विगतवारीसुध्दा दाखविण्यात येईल.

२.५ प्रत्येक प्रशासकीय विभागाच्या राज्यस्तरीय योजना तसेच विशेष घटक योजना व आदिवासी विकास योजना यांच्या तरतुदी दर्शविणारी मागणी संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडून सादर केली जाईल. मात्र प्रत्येक विभागाला त्यांनी विधी मंडळाला सादर केलेल्या मागणीशिवाय सर्वसाधारण जिल्हा योजनांपैकी किती तरतुद प्राप्त होत आहे ही माहिती दर्शविणारा मतदानास आवश्यक नसणारा तक्ता (Statement not requiring voting) विधीमंडळाला माहितीसाठी स्वतंत्रपणे सादर करण्यात येईल.

२.६ जिल्हा योजनांचे रुपांतर जिल्हाधिकारी कार्यालयांनी अर्थसंकल्पीय विवरणपत्रात करावे. तसेच संबंधित कार्यान्वयीन यंत्रणांच्या सल्ल्याने प्रतिमाह खर्चाचा तपशील प्राप्त करुन रोख प्रवाह (cash flow) तयार करावा. अर्थसंकल्पीय प्रकाशनाच्या भाग-तीन परिशिष्टात समाविष्ट करण्यासाठी विहीत नमुन्यात रस्ते, साकव, इमारती व तत्सम बांधकामाची यादी आणि रोखप्रवाहाचे विवरण जिल्हाधिकारी यांनी वार्षिक योजनेच्या अर्थसंकल्पीय विवरणपत्राबरोबर सादर करावे. मंजुर नियतव्ययाच्या मर्यादेत जी बांधकमे त्यावर्षी अथवा अधिकाधिक पुढील वर्षी पूर्ण होणार असतील अशीच बाधकामे यादीत समाविष्ट करावीत.

२.७ जिल्हा योजनेतील केंद्र पुरस्कृत योजनेतील राज्य हिश्श्याची तरतुद जिल्हा योजनेमध्ये करून अर्थसंकल्पीय तरतुदीचे वाटप जिल्हाधिकारी कार्यान्वयीन यंत्रणेला करतील. मात्र ज्या योजनांबाबत केंद्र शासनाच्या हिश्श्याची तरतुद राज्य शासनाच्या खाती जमा (एकत्रीत निधीमध्ये) होते, त्या रकमेची अर्थसंकल्पात तरतुद करून संबंधित प्रशासकीय विभागाकडून प्रचलीत पध्दतीने कार्यान्वयीन यंत्रणेला वाटप केले जाईल. केंद्र पुरस्कृत योजनांच्या बाबतीत ज्या प्रमाणात केंद्र शासनाचा हिस्सा मंत्रालयीन प्रशासकीय विभागांमार्फत प्राप्त होईल त्या प्रमाणात आणि योजनांच्या वित्तीय हिश्श्याच्या प्रमाणात (financing pattern) जिल्हा योजनांचा निधी खर्च करावा. उदा. एका जिल्ह्यासाठी १०० रुपयांची तरतुद करावयाची असेल आणि त्यामध्ये केंद्राचा हिस्सा ७५% व राज्याचा हिस्सा २५% असे असल्यास जिल्ह्याच्या योजनेमध्ये २५ रुपयांची तरतुद करावी. संबंधित प्रशासकीय विभागाने केंद्र शासनाचा हिस्सा म्हणून ६० रूपये वितरीत केल्यास राज्य शासनाचा हिस्सा म्हणून २० रुपये जिल्हाधिकारी यांनी विभागाच्या जिल्हास्तरीय कार्यान्वयीन यंत्रणेस खर्च करण्यास प्राधिकृत करावे.

२.८ जिल्हा योजनांच्या बाबतीत नियोजन विभागाच्या अर्थसंकल्पिय प्रकाशनात जिल्हावार योजना व मागण्या विधीमंडळासमोर मा. मंत्री (नियोजन) यांचेकडून सादर केल्या जातील. जिल्हा योजनांमध्ये समाविष्ट रकमेच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये सहभागी होणे व उत्तरे देणे व तत्सम विधीमंडळ कार्यनियमावली अंतर्गत इतर कार्यवाही, संबंधित विषयांचे मा. मंत्री महोदय यांचेकडून करण्यात येईल.

२.९ विधी मंडळाने अर्थसंकल्पिय मान्यता दिल्यानंतर संबंधित जिल्ह्यांसाठी असलेल्या एकूण तरतुदीचे वितरण नियोजन विभागाकडून संबंधित जिल्हाधिकारी यांना विहित कार्यपध्दतीनुसार करण्यात येईल.

२.१० जिल्हाधिकारी हे त्या जिल्ह्याच्या जिल्हा योजनेसाठी निधी वाटपासंबंधात नियंत्रक

अधिकारी राहतील. संबंधित जिल्हाधिकारी हे त्याना प्राप्त झालेल्या निधीचे कार्यान्वयीन यंत्रणेला पुनर्वाटप करण्यास सक्षम राहतील.

२.११ जिल्हाधिकारी यांनी नियोजन विभागाकडून निधी प्राप्त झाल्यापासून जास्तीत जास्त एक महिन्याचे आत कार्यान्वयीन यंत्रणांना तात्काळ वाटप करणे आवश्यक राहील. एखाद्या जिल्हाधिका-याने सदरची जबाबदारी वेळीच पार पाडली नाही तर संबंधित विभागीय आयुक्त यांनी संबंधित जिल्हाधिका-याकडून निधी वाटपाचे काम पूर्ण करुन घेणे अनिवार्य राहील.

**३. <u>प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही</u> -**

३.१ परिच्छेद ३.२ मधील प्रकरणे सोडून जिल्हा वार्षिक योजनेतील इतर कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे प्रशासकीय विभागांचे व त्यांच्या क्षेत्रिय यंत्रणांचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील.

३.२ स्थानिक स्वराज्य संस्थांकडील (जिल्हा परिषद, नगर पालिका, महानगरपालिका,नगरपंचायत) योजनांसाठी त्यांना असलेले प्रशासकीय मान्यतेचे अधिकार प्रचलित पद्धतीप्रमाणे कायम राहतील.

३.३ प्रशासकिय मान्यता देण्यासंबंधी संबंधित मंत्रालयीन विभागांकडून जिल्हाधिकारी तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांना मार्गदर्शक सूचना, निकष व तपासणी याद्या निर्गमीत करण्यात येतील. त्याप्रमाणे जिल्हाधिकारी व स्थानिक स्वराज्य संस्था यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची कार्यवाही करावी.

३.४ जिल्हा वार्षिक योजनेतील कामे दोन वर्षात पूर्ण होणे अपेक्षित असून त्यामध्ये सुधारीत प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता वाटल्यास मूळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा ३० टक्के पर्यंतच्या जास्त रकमेच्या प्रस्तावाला सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील व त्यापेक्षा जास्त रकमेची सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याची आवश्यकता वाटल्यास मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या सध्याच्या प्रणालीनुसार कार्यवाही करावी.

**४. तांत्रीक मान्यतेचे व तत्संबधीचे अधिकारः-**

४.१ जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गतच्या कामांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या कार्यान्वयीन यंत्रणेच्या अधिका-यांना सध्या प्रमाणेच असतील.

४.२ तांत्रिक मान्यता देण्यासंदर्भात संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडुन जिल्हास्तरीय अधिका-यांना तांत्रिक मान्यतेच्या दृष्टीने मार्गदर्शक सूचना व तपासणी यादी निर्गमित करण्यात येईल.

**५. <u>निविदा व खरेदी प्रक्रिया</u> -** निविदा मागविणे, स्वीकृत करणे व खरेदी बाबतचे सर्व अधिकार प्रचलित प्रध्दतीनुसार राहतील.

..६

**६. <u>योजनेची अंमलबजावणी, सनियंत्रण, लेखापरिक्षण व विधिमंडळ कामकाज विषयक बाबी हाताळणे</u>**

६.१ कामाची गुणवत्ता राखण्याची जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

६.२ संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून तांत्रिक गुणवत्तेबाबत संनियंत्रण केले जाईल.

६.३ जिल्हा योजनेच्या अंमलबजावणीवर, खर्चावर व तांत्रिक बाबींवर संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे नियंत्रण असेल.

६.४ जिल्हा वार्षिक योजनांच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र, पूर्णत्वाचे दाखले, खर्चाचा ताळमेळ व विनियोजन लेखे इत्यादीबाबतची सर्व कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाची राहील.

६.५ जिल्हा योजनेतील गैरव्यवहार, लेखा आक्षेप, लोकलेखा समिती, विधिमंडळ कामकाज इत्यादी बाबीसाठी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा व त्यांचा मंत्रालयीन प्रशासकीय विभाग जबाबदार राहील.

६.६ जिल्हास्तरीय कार्यकारी यंत्रणा, संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना प्रशासकीय मान्यता, प्रत्यक्ष खर्च, भौतिक साध्य याबाबतची माहिती देतील. जिल्हा योजना संबंधी विधानमंडळाला माहिती सादर करणे तसेच विधानमंडळाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे, अर्थसंकल्पीय नियमावलीच्या तरतुदीनुसार विविध बाबीसंबंधी कार्यवाही करण्याची जबाबदारी प्रशासकीय विभागांची राहील.

६.७ जिल्हास्तरीय योजनांचे मासिक खर्चाचे अहवाल दरमहा ५ तारखेपर्यंत जिल्हाधिकारी यांना संबंधित कार्यन्वयीन यंत्रणा सादर करतील.

६.८ जिल्हाधिकारी हे प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपूर्वी वार्षिक योजनेच्या खर्चाचे अहवाल विभागीय आयुक्त व नियोजन विभागास सादर करतील.

**७. <u>जिल्हा योजनेचे पुर्नविनियोजन व सुधारीत अंदाज</u> -**

७.१ जिल्हा योजनेतील मंजूर अर्थसंकल्पित तरतुदीमधील योजना / कार्यक्रमांतर्गत पुर्नविनियोजन करण्याचे अधिकार जिल्हा नियोजन समितीच्या पूर्व मंजुरीने जिल्हाधिकारी यांना असतील.

७.२ पुर्नविनियोजन करतांना जिल्हाधिकारी शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करतील.

७.३ जेव्हा आचारसंहिता किंवा अन्य संविधानिक अडचणींमुळे जिल्हा नियोजन समितीची बैठक आयोजित करणे शक्य नसेल अशावेळी महसूल विभागीय आयुक्तांच्या मान्यतेने पुर्नविनियोजन करण्यात येईल परंतू अशा पुर्नविनियोजनाची माहिती जिल्हा नियोजन समितीच्या पुढील बैठकीत सादर करण्यात येईल.

७.४ अर्थसंकल्पीय कार्यप्रणालीप्रमाणे सुधारित अंदाजांचे प्रस्ताव नियोजन विभागाला पाठविल्यानंतर जिल्हाधिकारी यांना पुर्नविनियोजन करता येणार नाही व तसा प्रस्तावही नियोजन विभागाला पाठविता येणार नाही.

७.५ जिल्हा वार्षिक योजनेसाठी निश्चित केलेला नियतव्यय पूर्णपणे अर्थसंकल्पीत करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी व नियोजन विभाग यांची राहील. योजनानिहाय तपशील विहित वेळेत शासनास सादर करण्यास व शासनाकडून वितरीत झालेला निधी संबंधीत कार्यान्वयीन यंत्रणांना वितरीत करण्यास जिल्हाधिकारी जबाबदार राहतील. प्राप्त तपशिलाप्रमाणे निधी अर्थसंकल्पीत करण्याची जबाबदारी नियोजन विभागाची राहील.

७.६ प्राप्त झालेल्या तरतुदीपैकी खर्च पूर्णपणे होईल किंवा कसे याचा अंदाज प्रत्येक कार्यान्वयीन यंत्रणेने घ्यावा आणि त्यांना असे वाटले की निधी पूर्णपणे खर्च होणार नाही व काही रक्कम शिल्लक राहणार आहे तर त्यांनी तसा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांना ५ मार्चपर्यंत मिळेल या बेताने पाठवावा. जिल्हा कार्यान्वयीन यंत्रणेने ५ मार्चपर्यंत संभावित बचत समर्पित केली नाही व खर्च पूर्णपणे पडला नाही तर त्याची जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

७.७ जिल्हाधिकारी यांनी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेकडून प्राप्त झालेली बचत/समर्पित निधी लक्षात घेऊन जिल्हा योजना निधीमधून काही रक्कम समर्पित करावयाची असल्यात सदर आदेश १० मार्चपूर्वी काढणे आवश्यक राहील.जिल्हाधिकारी यांनी काढलेल्या निधी समर्पणाची प्रत नियोजन विभागास १५ मार्च पर्यंत मिळेल याबाबतची खबरदारी जिल्हाधिकरी यांनी घ्यावी. कार्यान्वयीन यंत्रणेकडून निधी ५ मार्चपर्यंत समर्पित झाला असल्यास व जिल्हाधिका-यांनी निधी समर्पणाचे आदेश विहित मुदतीत काढले नाहीत तर जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

७.८ जिल्हा योजनेसाठी योजनानिहाय तपशील व रकमेची फोड (breakup) नियोजन विभागाला सादर करणे ही जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील. जिल्हाधिकारी यांनी अशी तपशीलवार माहिती सादर केली नाही तर त्याबाबत जिल्हाधिकारी जबाबदार राहतील. जिल्ह्यांमधून योजनानिहाय तपशील प्राप्त झाल्यावर एकत्रित मागणी विधी मंडळाला सादर करणे व विधी मंडळाने मान्य केलेल्या तरतुदीचे जिल्हानिहाय वाटप करणे नियोजन विभागाची जबाबदारी राहील. यासाठी नियोजन विभागातील संबंधित अधिकारी जबाबदार राहतील.

७.९ जिल्हाधिकारी यांना सदरचे काम करणे शक्य व्हावे म्हणून एक लेखाधिकारी वर्ग-२ व एक किंवा दोन संशोधन सहायक यांची पदे मंजूर करण्याचे प्रस्तावित आहे.

८. वरील सुधारीत कार्यपध्दतीचा अवलंब २००८-०९ या आर्थिक वर्षापासून लागू होणार असल्याने सर्व जिल्हाधिकारी यांनी याबाबीची त्वरीत कार्यवाही करावी.

९. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक सीआर-६१/०८/व्यय-८, दि. १६.२.२००८ अन्वये प्राप्त सहमतीस अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहेत.

१०. हा शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २००८०२१६१७०४२९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( प्र.अ.महेंद्रकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति

१. मा. राज्यपालांचे सचिव, ..८

२. मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव,
३. मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
४. सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. मा.कार्यकारी अध्यक्ष, राज्य नियोजन मंडळ, नवीन प्रशासकीय भवन, १८ व मजला, मंत्रालयासमोर, मुंबई,
६. महालेखापाल-१(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
७. महालेखापाल-१(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
८. महालेखापाल-१(लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
९. महालेखापाल-१(लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
१०. शासनाचे मुख्य सचिव,
११. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
१२. सदस्य सचिव, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ, नवीन प्रशासकीय इमारत,१८वा मजला,मुंबई,
१३. सदस्य सचिव, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ,नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय कम्पाऊंड, तळमजला, औरंगाबाद,
१४. सदस्य सचिव, विदर्भ वैधानिक विकास मंडळ,बी-२३/१,साऊथ अंबाझरी मार्ग, अंध विद्यालयाजवळ, नागपूर,
१५. संचालक,लेखा व कोषागारे, महाराष्ट्र शासन, मुंबई,
१६. अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र शासन, मंबई,
१७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई,
१८. सर्व विभागीय आयुक्त,
१९. मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
२०. सर्व मुख्य अभियंते, जलसंपदा प्रादेशिक विभाग,
२१. सर्व मुख्य अभियंते, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,
२२. सर्व जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती,
२३. सर्व अधीक्षक अभियंते, सार्वजनिक बांधकाम मंडळे,
२४. सर्व अधीक्षक अभियंते, जलसंपदा मंडळे,
२५. नियोजन विभागातील सर्व सह सचिव/उप सचिव.
२६. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
२७. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
२८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२९. सर्व विशेष कार्य अधिकारी (नियोजन), विभागीय आयुक्तांची कार्यालये,
३०. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालये,
३१. नियोजन विभागातील सर्व जिल्हा प्रभारी अधिकारी व इतर अधिकारी.
३२. निवड नस्ती का. १४४४.

--------

(परिशिष्ट क्र. ४.७)

जिल्हास्तरीय अनुसूचित जाती उपयोजना (विघयो) /आदिवासी उपयोजना/आदिवासी क्षेत्रा बाहेरील उपयोजने अंतर्गत ०२ दुभत्या जनावरांचे गट वाटप करणे या योजनेस प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : जिवायो-२०११/प्र.क्र.३०५/पदुम-४,**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक : २२ नोव्हेंबर, २०११**

प्रस्तावना –

विशेष घटक त्याचप्रमाणे, आदिवासी क्षेत्रउपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजने अंतर्गत अनुसूचित जाती, नवबौध्द/अनुसूचित जमातीच्या लाभार्थींना स्वयंरोजगाराद्वारे उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विशेष घटक योजने अंतर्गत ०३ संकरित दुधाळ गाई/म्हशी तर आदिवासी क्षेत्र उपयोजने अंतर्गत ०२ दुधाळ गाई/म्हशींचा गट ५० टक्के अनुदान व ५० टक्के लाभार्थी हिस्सा/वित्तीय संस्थेचे कर्ज या तत्वावर वाटप करण्याची योजना राज्यामध्ये कार्यान्वित आहे. सद्यस्थितीत गुरांच्या बाजारामध्ये ८-१० लिटर दैनिक दूध उत्पादन क्षमता असलेल्या संकरित गाईंच्या तसेच म्हशींच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढलेल्या आहेत.

विविध शासकीय योजने (अनुसूचित जाती उपयोजना (विघयो)/ आदिवासी उपयोजना/आदिवासी क्षेत्रा बाहेरील उपयोजने)अंतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजनेतील पशुधनाच्या खरेदीचे आधारभूत दर निश्चित करणे व सर्व योजनांसाठी अनुदान मर्यादा ७५ टक्के करणे संदर्भात मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.२५.१.२०११ रोजी बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत विविध योजनेतील पशुधनाच्या आधारभूत किंमतीत वाढ करणे, त्याच प्रमाणे अनुदान मर्यादेत ७५ टक्के पर्यंत वाढ करणे संदर्भात सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग, नियोजन विभाग व वित्त विभागाने सहमती दर्शविली होती.

राज्यात दूध उत्पादनास चालना देणेसाठी ०६ दुधाळ संकरीत गायी/म्हशींचे वाटप करणे या नाविन्यपूर्ण राज्यस्तरीय योजनांतर्गत योजनेस (सर्वसाधारण/ अनुसूचित जाती उपयोजना/ आदिवासी उपयोजने अंतर्गत) दि.१.६.२०११ रोजीच्या मा. मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आलेली असून सदर योजनेसाठी दुभत्या जनावराची आधारभूत किंमत प्रति संकरित गाय/म्हैस रू ४०,०००/- करण्यास त्याचप्रमाणे अनुसूचित जाती/जमातीच्या लाभार्थ्यांना दुभत्या जनावराचा गटाचा पुरवठा ७५ टक्के अनुदानावर करण्यासही मंत्रीमंडळाने मान्यता दिलेली आहे.

या अनुषंगाने जिल्हास्तरीय अनुसूचित जाती उपयोजना / आदिवासी उपयोजना/आदिवासी क्षेत्रा बाहेरील उपयोजने अंतर्गत दुभत्या जनावरांचे गट वाटप योजने अंतर्गत दुभत्या जनावरांचा गटाचा पुरवठा करणे या योजनेसाठी दुभत्या जनावराच्या आधारभूत किंमतीत व अनुदानाच्या मर्यादेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. विशेष घटक योजना, आदिवासी क्षेत्र उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजने अंतर्गत दुधाळ जनावरांचा पुरवठा करणे या योजनेच्या अनुषंगाने या पूर्वी निर्गमित करण्यात आलेले सर्व शासन निर्णय तसेच शुध्दीपत्रक अधिक्रमित करून खालील प्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय -

जिल्हास्तरीय अनुसूचित जाती उपयोजना (विघयो) / आदिवासी उपयोजना/ आदिवासी क्षेत्र बाहेरील उपयोजने अंतर्गत ०२ दुभत्या जनावरांचे गट वाटप करणे या योजनेस याद्वारे शासनाची प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात येत आहे. सुधारीत आर्थिक निकषानुसार सदर योजना सन २०११-१२ पासून राबविण्यात यावी.

**योजनेचे स्वरूप (आर्थिक निकष) –**

या योजने अंतर्गत ०२ संकरीत गायी/म्हशींच्या एका गटाची किंमत खालीलप्रमाणे राहील.

| क्र. | बाब | किंमत रुपये |
|---|---|---|
| १ | ०२ संकरीत गाई/म्हशींचा गट प्रति गाय/म्हैस रु. ४०,०००/- किंमती प्रमाणे | ८०,०००/- |
| २ | ५.७५% + १०.०३ % सेवादर. या दराने तीन वर्षाचा विमा | ५,०६१/- |
| | एकुण | ८५,०६१/- |

या योजने अंतर्गत अनुसूचित जाती/जमातीच्या लाभार्थीना २ दुधाळ जनावरांचा एक गट वाटप करताना ७५ टक्के म्हणजेच रू ६३,७९६/- शासकीय अनुदान अनुज्ञेय राहील. अनुसूचित जाती/जमातीच्या लाभार्थ्यांना अनुदाना व्यतिरिक्त उर्वरित २५ टक्के रक्कम स्वतः उभारावी लागेल. बँक/वित्तीय संस्थेकडून कर्ज घेणाऱ्या (अनुसूचित जाती/जमाती साठी ५ टक्के लाभार्थी हिस्सा व २० टक्के बँकेचे कर्ज) लाभार्थ्यास या योजने अंतर्गत प्राधान्य देण्यात यावे.

**लाभार्थी निवडीचे निकष -**

अनुसूचित जाती/जमातींच्या लाभार्थ्यांची निवड खालील प्राधान्य क्रमानुसार करण्यात यावी. प्राधान्यक्रम (उतरत्या क्रमाने)

१. दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी
२. अत्यल्प भूधारक शेतकरी (१ हेक्टर पर्यंतचे भूधारक)
३. अल्प भूधारक शेतकरी (१ ते २ हेक्टर पर्यंतचे भूधारक)
४. सुशिक्षित बेरोजगार (रोजगार व स्वयंरोजगार केंद्रात नोंद असलेले)
५. महिला बचत गटातील लाभार्थी (अ.क्र.१ ते ४ मधील)

**लाभार्थी निवड समिती -**

लाभार्थ्यांची निवड खालील जिल्हास्तरीय निवड समितीव्दारे करण्यात येईल.

१. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त - अध्यक्ष
२. जिल्हा समाज कल्याण अधिकारी - सदस्य
३. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प - सदस्य
४. जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी (राज्यस्तर) - सदस्य
५. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार अधिकारी ( जिल्हा परिषद) - सदस्य
६. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि.प. (जि.प. मार्फत राबवण्यात येणाऱ्या योजनांसाठी)/सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, (जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय)(उपआयुक्त कार्यालयामार्फत राबवण्यात येणाऱ्या योजनांसाठी) - सदस्य सचिव

**योजनेच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना –**

१. अंमलबजावणी अधिकाऱ्याने या योजनेस सर्वप्रकारच्या प्रसिध्दी माध्यमाद्वारे व्यापक प्रसिध्दी देवून लाभार्थीकडून अर्ज मागविण्यात यावेत.
२. योजनेचा लाभ मिळण्यासाठी लाभार्थ्याने करावयाच्या अर्जाचा नमुना व त्यासोबत जोडावयाची इतर आवश्यक कागदपत्रे याचा तपशिल आयुक्त पशुसंवर्धन यांनी त्यांच्या स्तरावर 'निश्चित

करून तो क्षेत्रिय अधिकाऱ्यांना पाठवावा. तसेच सदर अर्जाचा नमुना आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असावा.

३. लाभार्थी निवडताना ३० टक्के महिला लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात यावे.

४. शासन निर्णय क्रमांक :-संकीर्ण-२०११/ प्र.क्र.४१४/पदुम-४, दिनांक ६.९.२०११ नुसार ३ टक्के विकलांग लाभार्थ्यांना या योजनेअंतर्गत लाभ देण्यात यावा.

५. तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी (पविअ-विस्तार) अर्ज स्विकारून प्राप्त झालेले सर्व अर्ज जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद/जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालयातील सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन यांचेकडे जिल्हास्तरीय लाभार्थी निवड समितीच्या मान्यतेसाठी सादर करावेत. प्राप्त झालेल्या सर्व अर्जाची तारीखनिहाय नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवण्यात यावी.

६. सन २०१२-१३ पासून दरवर्षी जून-जुलै महिन्यात अर्ज मागविण्यात यावेत. अर्ज स्विकारण्यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात यावी. या मुदतीनंतर अर्ज स्विकारू नये. सदर अर्जाची वैधता ही त्या आर्थिक वर्षातील उपलब्ध तरतूदीच्या मर्यादेच्या अधिन असेल तसेच कोणत्याही स्वरूपात सदरील अर्ज पुढील आर्थिक वर्षासाठी ग्राह्य धरला जाणार नाही. प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची छाननी करून एका महिन्याच्या कालावधीत जिल्हा निवड समितीमार्फत पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी. त्याचप्रमाणे प्रतिक्षासूची तयार करावी.

७. जिल्हास्तरीय लाभार्थी निवड समितीने निवड केलेल्या लाभार्थीची यादी आयुक्त पशुसंवर्धन तसेच संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावी. सदरची यादी या सर्व कार्यालयातील सूचना फलकावर सर्व लोकांना दिसेल अशाप्रकारे ठळकपणे लावण्यात यावी

८. योजनेसाठी लाभार्थीची निवड झाल्यावर लाभार्थीनी एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थी हिस्सा रक्कम अथवा बँकेचे कर्ज उभारणे आवश्यक राहील असे न केल्यास प्रतिक्षा सूचीवरील लाभार्थीस या योजने अंतर्गत लाभ देण्यात यावा.

९. एका कुटूबांतील एकाच व्यक्तीस या योजनेचा लाभ देण्यात यावा. या किंवा तत्सम योजने अंतर्गत लाभ दिलेल्या लाभार्थीस पुन्हा सदर योजनेचा लाभ देण्यात येवू नये.

१०. ही योजना शक्यतो क्लस्टर स्वरूपात आणि अस्तित्वातील/प्रस्तावित दूध संकलन मार्गावरील गावामध्ये राबविण्यात यावी.

११. या योजनेमध्ये एच एफ, जर्सी या १० ते १२ लिटर प्रति दिन दूध उत्पादन असलेल्या संकरीत गायी तसेच मुऱ्हा व जाफराबादी या ८ ते १० लिटर प्रति दिन दूध उत्पादन असलेल्या सुधारीत जातीच्या म्हशी, दुसऱ्या/तिसऱ्या वेतातील १५ ते ३० दिवसांपूर्वी व्यालेल्या संकरीत गायी/म्हशीचे वाटप करण्यात यावे.

१२. दुधाळ जनावरांची खरेदी खालील समितीद्वारे करण्यात यावी. दुभती जनावरे लाभार्थीच्या पसंतीने खरेदी करावे.

**दुधाळ जनावरे खरेदी समिती**

- संबंधित तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती
- कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय दवाखान्याचे संस्थाप्रमुख
- गावातील प्राथमिक सहकारी दूध संस्थेचे प्रतिनिधी
- बँक प्रतिनिधी
- विमा प्रतिनिधी
- लाभार्थी

१३. दुभत्या जनावरांची खरेदी शक्यतो राज्याबाहेरील नामांकित पशुंच्या बाजारातून करण्यात यावी.

१४ या योजनेखाली वाटप करण्यात येणाऱ्या दुधाळ जनावरांचा लाभार्थी व संबंधित जिल्ह्यातील जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त/जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या नावे ३ वर्षासाठी विमा उतरविण्यात यावा.

१५. या योजने अंतर्गत खरेदी केलेल्या दुधाळ जनावरांची महाराष्ट्र ॲनिमल आयडेंटिफिकेशन ॲन्ड रेकॉर्डिंग ॲथॉरिटी यांचेकडे नोंदणी करणे बंधनकारक राहील.

१६. योजनेतील जनावर मृत झाल्यास विम्यापोटी मिळालेल्या पैशातून उक्त समितीने निवड करुन शासनाच्या सहमतीने दुसरे जनावर खरेदी करुन लाभधारकास देणे बंधनकारक राहील.

१७. सदर योजना राबविताना प्रथमतः एका दुधाळ जनावराचे वाटप करण्यात यावे व सहा महिन्यानंतर किंवा सदरचे वाटप केलेले दुधाळ जनावर आटल्यानंतर (यामधील जो कालावधी कमी असेल तद्नंतर) दुसरे दुधाळ जनावर वाटप करण्यात यावे.

१८. योजनेच्या अंमलबजावणी अधिकाऱ्याने या योजने अंतर्गत लाभ दिलेल्या लाभार्थींची यादी (जनावरांचा तपशिल व किंमतीसह ) संबंधित अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, पशुधन विकास अधिकारी (विस्तार), कार्यक्षेत्रातील पशुवैदयकीय संस्था व संबंधित ग्रामपंचायत यांना देण्यात यावी. तसेच कार्यक्षेत्रातील पशुवैदयकीय संस्थांनी लाभार्थ्यांची नोंद पशुधनाच्या तपशिलासह स्वतंत्र नोंदवहीत घ्यावी.

१९. संबंधित पशुवैद्यकीय संस्थेव्दारे सदर दुधाळ जनावरांना आरोग्य विषयक आणि पैदाशीच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात व त्याची नोंद स्वतंत्र नोंदवहीमध्ये घेण्यात यावी. यामध्ये जनावरांपासून मिळालेले वेतातील दूध उत्पादन, माज दाखविल्याचा दिनांक, कृत्रिम रेतनाचा दिनांक, गर्भ तपासणीचा दिनांक व निष्कर्ष, गाय/म्हैस व्याल्याचा दिनांक, नर/मादी वासरू, जन्मतःच वासराचे वजन इ. बाबींचा समावेश असावा. याबाबतच्या नोंदवहीचा नमुना आयुक्त पशुसंवर्धन यांनी सर्व कार्यान्वयन अधिकाऱ्यांना परिपत्रित करावा. तसेच सदर अधिकारी/कर्मचाऱ्यांमार्फत दर तिमाहीस वाटप केलेल्या दुधाळ जनावरांची पशुपालकांच्या घरी जाऊन १०० टक्के पडताळणी करण्यात यावी व त्याचा अहवाल पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांच्यामार्फत वरिष्ठास सादर करण्यात यावा.

२०. पशुधन विकास अधिकारी(विस्तार) यांनी वाटप केलेल्या दुधाळ जनावरांच्या २५ टक्के जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी करावी तसेच जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी १० टक्के जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी करावी व तसा अहवाल वरिष्ठास सादर करावा.

२१. आर्थिक वर्ष संपल्यानंतर दर ६ महिन्यांनी आयुक्त पशुसंवर्धन हे प्रत्येक विभागासाठी प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून या योजनेचे मुल्यमापन सदर समितीद्वारे करतील व आयुक्त पशुसंवर्धन यांच्या अभिप्रायासह सदर योजनेचा मूल्यमापन अहवाल शासनास सादर करतील.

२२. लाभार्थ्यांने हा व्यवसाय किमान ३ वर्षे करणे बंधनकारक राहील व या कालावधी दरम्यान जनावरांच्या पडताळणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना वाटप केलेली दुधाळ जनावरे पडताळणीसाठी दाखविणे आवश्यक राहील.

२३. योजनेतील दुधाळ जनावरांना नजिकच्या पशुवैद्यकीय संस्थेमधून वेळोवेळी साथीचे रोग प्रतिबंधक लसीकरण करून घेणे, जंतनाशके पाजणे याची सर्वस्वी जबाबदारी लाभार्थ्याची राहील.

२४. लाभार्थ्यांनी योजने अंतर्गत दिलेल्या शासकीय अनुदानाचा गैरविनियोग केल्याचे निदर्शनास आल्यास अनुदानाची व्याजासह एक रकमी वसूली महसूली कार्यपध्दतीने लाभार्थीकडून

करण्यात यावी. तसेच अशा लाभार्थीस/कुटूंबास शासनाच्या इतर विभागाच्या कोणत्याही विशेष घटक/आदिवासी क्षेत्र/आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजने अंतर्गत पुढील ५ वर्षासाठी लाभ देण्यात येवू नये असे कळविण्यासाठी अशा लाभार्थ्यांची यादी संबंधित ग्राम पचायतांस, विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना पाठविण्यात यावी.

२५. या योजने अंतर्गत निवडलेल्या लाभार्थ्याकडून घ्यावयाच्या बंधपत्राचा प्रारूप शासन निर्णयातील तरतूदी विचारात घेवून आयुक्त पशुसंवर्धन यांनी त्यांच्या स्तरावर अंतिम करून क्षेत्रिय अधिकाऱ्यांना पाठविण्यात यावा.

२६. या योजने अंतर्गत वाटप केलेल्या जनावरांमध्ये काही कायमपणाचे व्यंग उद्भवल्यास त्याची नुकसान भरपाई मिळण्यासाठी दुधाळ जनावरांचा यासाठी देखील विमा उतरविता येईल. तथापि, या विम्याचा संपूर्ण खर्च लाभार्थ्याने स्वतः करावयाचा आहे. त्यासाठी शासकीय अनुदान देय राहणार नाही.

२७. लाभार्थ्याकडे ०२ दुधाळ जनावरांचे पालन करण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध असावी.

२८. लाभार्थ्याने दुग्ध व्यवसाय/गाय-म्हैस पालन विषयक प्रशिक्षण घेणे आवश्यक राहील.

२९. दुधाळ जनावरांचे खरेदी नंतर जनावरे वाहतुकीचा संपूर्ण खर्च लाभार्थ्याने करावा.

३०. लाभार्थ्याने विहित नमुन्यातील बंधपत्र करून देणे आवश्यक राहील.

३१. सदर योजनेच्या आर्थिक निकषाच्या अधिन राहून योजना यशस्वीपणे राबवण्याकरिता आवश्यक त्या इतर मार्गदर्शक सुचना आयुक्त पशुसंवर्धन यांनी त्यांच्या स्तरावरून क्षेत्रिय अधिकाऱ्यांना निर्गमित कराव्यात.

३२. या योजनेसाठी वित्तीय कर्ज पुरवठ्यासाठीची तरतूद संबंधित जिल्ह्याच्या Potential Linked Credit Plan मध्ये करणेबाबत आयुक्त स्तरावरून सर्व संबंधितांना सूचना देण्यात याव्यात.

३३. **सदर योजनेचे अंमलबजावणी अधिकारी तसेच आहरण व संवितरण अधिकारी संबंधित जिल्ह्याचे** जिल्हा **पशुसंवर्धन उपआयुक्त** (जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी) **जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद** (जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी) **हे राहतील.** विभागीय स्तरावर संबंधित प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन व राज्याकरिता आयुक्त पशुसंवर्धन हे सनियंत्रण अधिकारी राहतील.

जिल्हास्तरीय अनुसूचित जाती उपयोजना (विघयो) / आदिवासी क्षेत्र उपयोजना / आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजनेअंतर्गत दोन दुभत्या जनावरांचे गट वाटप या योजनेचा खर्च खालील लेखाशिर्षाखाली नोंदविण्यात यावा.

**१. अनुसूचित जाती उपयोजना (विघयो)**
मागणी क्रमांक डी-४
२४०३-पशुसंवर्धन
१०२-पशु व म्हैस विकास
(०९) जिल्हा परिषदांना योजनांतर्गत अनुदाने
(०९) (०३) विशेष घटक योजना (जिल्हा योजना)
संकरित गायी पुरविणे व दुभत्या जनावरांना सकस खादयाचा पुरवठा करणे.
३१-सहाय्यक अनुदाने
संकेतांक (२४०३ २०५ ४)

२. आदिवासी क्षेत्र उपयोजना
मागणी क्रमांक टी-५
२४०३-पशुसंवर्धन
७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना
(०१) (१२) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ याच्या कलम १८७ अन्वये जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदान ( जिल्हास्तरीय योजना )
३१-सहाय्यक अनुदान-वेतनेतर
संकेतांक (२४०३ १०८ ५)

**३. आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजना**
मागणी क्रमांक टी-५
२४०३-पशुसंवर्धन
७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना
(०२) (०५) दुभत्या जनावरांचे गट वाटप (जिल्हा)
( जिल्हास्तरीय योजना )
३१-सहाय्यक अनुदान-वेतनेतर
संकेतांक (२४०३ १४३ २)

हा शासन निर्णय सामाजिक न्याय विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्र१०२/११/विघयो-१ दि.२५.८.२०११,आदिवासी विकास विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्र.५२/का-९ दि.९.९.२०११, नियोजन विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४७७/का-१४३१, दिनांक १.१०.२०११ आणि वित्त विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्र.५७६/११/व्यय-२, दि.१४.१०.२०११ अन्वये व त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नांवाने,

स्वाक्षरीत /-
(डॉ.मा.ना.सवाईसोनकांबळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
४. सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक.
५. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य.
६. सर्व मान्ताप्राप्त राजकीय पक्षांचे मध्यवर्ती कार्यालये.
७. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
८. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई-४०० ०२०.
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती)
११. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. सचिव, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती).
१८. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.

G Scp Tsp DairyAnim GR.doc

८० (10)

(परिशिष्ट क्र. ६.१)

दलित वस्ती सुधारणा योजना
अनुदानाच्या रकमेत वाढ करणेबाबत

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय,क्रमांकः-दवसु-२०११/प्र.क्र. ४४२/अजाक
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ५ डिसेंबर, २०११

वाचाः- १) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
क्रमांकः-दवसु-२००८/प्र.क्र.५२४/विघयो-१,दिनांक १४/११/२००८
२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
क्रमांकः-दवसु-२००८/प्र.क्र.५२४/विघयो-१,दिनांक १९/१२/२००८

प्रस्तावना:- दलित वस्ती सुधार योजनेचा एक भाग म्हणून ग्रामीण व शहरी भागामधील दलित वस्त्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी प्रत्येक दलित वस्तीला सन १९९९ पासून रु.५,००,०००/- (रुपये पाच लाख फक्त) इतके अनुदान मंजूर करण्यात येत होते. शासन निर्णय, दिनांक १४.११.२००८ अन्वये दलित वस्तीच्या लोकसंख्येच्या निकषानुसार लोकसंख्येच्या प्रमाणात अनुदानाच्या रकमेत वाढ करण्यात आली होती. या योजनेंतर्गत घेण्यात येणारे बांधकाम उदा. जोडरस्ते, गटारे बांधकाम, पाणी पुरवठा,दलित वस्ती अंतर्गत रस्ते, दलित वस्तींना पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरींची दुरुस्ती, वीज पुरवठा व समाज मंदिर बांधकामांच्या खर्चाची किंमत दिवसेंदिवस वाढत असल्याने तसेच योजनेची उपयोगिता लक्षात घेता, या योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या अनुदानामध्ये वाढ तसेच अन्य सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:- दलित वस्ती सुधारणा योजनेच्या सर्व बाबींचा विचार करून दलित वस्ती सुधारण्यासाठी लोकसंख्येच्या निकषानुसार जास्तीत जास्त रु. २०,००,०००/- (रुपये वीस लाख फक्त) अनुदान देण्याबाबत सोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यास अनुसरुन प्रत्येक दलित वस्तीला लोकसंख्येच्या प्रमाणात पुढीलप्रमाणे अनुदानाच्या रकमेत वाढ करण्यास शासन मंजूरी देत आहे:-

| अ.क्र. | लोकसंख्या | अनुदान रक्कम (रुपये लाखात) |
|---|---|---|
| १ | १० ते २५ | २.०० लाख |
| २ | २६ ते ५० | ५.०० लाख |
| ३ | ५१ ते १०० | ८.०० लाख |
| ४ | १०१ ते १५० | १२.०० लाख |
| ५ | १५१ ते ३०० | १५.०० लाख |
| ६ | ३०१ च्या पुढे | २०.०० लाख |

२. ही योजना दिनांक १.१२.२०११ पासून अंमलात येईल.

३. दलित वस्ती सुधारणा योजनेंतर्गत करण्यात येणारे बांधकाम ग्रामपंचायत व पंचायत समितीच्या मदतीने करण्यात यावे. आयुक्त, समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. दलित वस्ती सुधारणा योजनेसाठी होणारा खर्च पुढील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व हा खर्च प्रतिवर्षी करण्यात येणाऱ्या तरतूदीमधून भागविण्यात यावा:-

२२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण,

०१- अनुसूचित जातीचे कल्याण,

८००- इतर खर्च, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना

(०६)(०२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम १८७ अन्वये जिल्हा परिषदांना अनुदाने-दलित वस्त्यांची सुधारणा

(२२२५ ३०५ ५)

३१- सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)

५. सदर शासन निर्णय हा ग्रामीण दलित वस्त्यांसाठी असून नागरी दलित वस्त्यांसाठी नगर विकास विभागामार्फत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सुनंदा मो. घड्याळे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति:-

आयुक्त, समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय आयुक्त
महालेखापाल ,(लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षण) महाराष्ट्र-१/२ ,मुंबई/नागपूर
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
सहसचिव, मा. मुख्यमंत्री यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
सह आयुक्त, समाजकल्याण (अनुसूचित जाती उपयोजना),महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
वित्त विभाग/ नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण
सर्व सहाय्यक आयुक्त,समाजकल्याण
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
मा. मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय, मुंबई
ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
उपसचिव/ कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय, मुंबई
निवडनस्ती (अजाक)

प्रधान सचिव,नगर विकास विभाग यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त अनुदानाच्या रकमेतील वाढ लक्षात घेऊन नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करावा.

## परिशिष्ट 'अ'

शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
क्रमांक:-दवसु-२०११/प्र.क्र.४४२/अजाक, दिनांक ५/१२/२०११

**दलित वस्ती सुधारणा योजनेंतर्गत अनुदानाच्या रकमेत वाढ करणेबाबत**

| अ.क्र. | मुद्दा | बदल |
|---|---|---|
| १ | योजनेच्या नावात बदल | योजनेचे नांव *दलित वस्ती सुधार योजना* ऐवजी *अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे.*असे असावे. |
| २ | दलित वस्तीची लोकसंख्या | सदरहू वस्ती घोषित करण्याचे निकष अधिक स्पष्ट असावेत. लोकसंख्येमध्ये दरवर्षी बदल होणार हे लक्षात घेता अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीतील लोकसंख्येची मोजणी करताना जनगणनेच्या निकषाबरोबर या वस्तीमध्ये असलेली प्रत्यक्ष लोकसंख्या लक्षात घेऊन, त्याप्रमाणे ग्राम सभेने ठराव पारित करावा व तो ग्राम पंचायतीकडे पाठविण्याची कार्यवाही करावी. त्यानंतर अशा अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीची तपासणी करुन,आवश्यक दुरुस्तीनंतर पंचायत समितीचा संकलित प्रस्ताव जिल्हा समितीकडे पाठविण्याचे अधिकार गट विकास अधिका-यांना असावेत. |
| ३ | योजनेअंतर्गत घ्यावयाची कामे | पाणी पुरवठयाची कामे,मलनिस्सारण, वीज, गटर बांधणे, अंतर्गत रस्ते, पोचरस्ते, पर्जन्य पाण्याचा निचरा (Rain Water Harvesting), इ. कामे प्राधान्याने घ्यावीत व गावातील सर्व वस्त्यांमधील मुलभूत सुविधांची कामे झाल्यानंतर समाजमंदिराचे बांधकाम करावे. जातीय ऐक्यता दृष्टीने संपूर्ण गावांसाठी एकच समाजमंदिर असावे व ते सर्व अनुसूचित जाती व नवबौध्द जातीच्या सर्व वस्त्यांना लाभ घेता येईल अशा मोक्याच्या ठिकाणी असावे. |
| ४ | पोहोच रस्ते | या योजनेअंतर्गत घेण्यात येणारे पोहोच रस्ते गावातील मुख्य रस्त्यापासून जिथपर्यंत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्या आहेत तिथपर्यंत घेण्यात यावेत. |
| ५ | समाजमंदिराबाबत | अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तींचा विकास करणे या योजनेअंतर्गत घ्यावयाच्या समाज मंदिराच्या बांधकामासाठी Type Plan निश्चित करुन त्याची बांधकाम मर्यादा रु.७.०० लाख करावी. समाज मंदिराचे बांधकाम झाल्यानंतर ते सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी ग्राम पंचायतीवर राहील. समाजमंदिराची दैनंदिन देखभाल व स्वच्छता रहावी यासाठी हे समाजमंदिर खाजगी कार्यक्रमासाठी नाममात्र भाडयाने देता येईल. हे भाडे किती असावे याबाबत ग्रामपंचायतीने निर्णय घेऊन ते वसुल करावे. त्यांचे स्वतंत्र खाते ठेवुन, त्यातुन दैनंदिन देखभाल व स्वच्छतेचा खर्च भागविण्यात यावा. परंतु ५ वर्षानी रु. १.०० लाख पर्यंत दुरुस्ती करता येईल.हा दुरुस्ती खर्च अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तींचा विकास करणे या योजनेसाठी दिलेल्या निधीतून भागविण्यात यावा. |

एच-२४१७ -२

| अ.क्र. | मुद्दा | बदल |
| --- | --- | --- |
| ६ | सामाजिक न्याय विभागाच्या नामफलकाबाबत | अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तींचा विकास करणे या योजनेअंतर्गत घेण्यात आलेल्या कामांचा सविस्तर तपशील व झालेला खर्च याची माहिती देण्यासाठी कोनशिला /नामफलक बसविण्यात यावा. |
| ७ | कामाच्या निवडीचे अधिकार | या योजनेंतर्गत करावयाच्या कामांचा ग्रामपंचायतीकडून प्राप्त झालेला प्राधान्यक्रम व निकड लक्षात घेऊन कामांची निवड करण्याचे पुर्ण अधिकार मुख्य/अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीला असावेत.त्यामध्ये कार्यकारी अभियंता,जिल्हा परिषद , मुख्य लेखा व वित्त अधिकारी व संबधित पंचायत समितीचे गट विकास अधिकारी सदस्य राहतील, जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी हे सदस्य सचिव राहतील. |
| ८ | प्रशासकीय मंजूरी | कामांना प्रशासकीय मंजुरी देण्याचे अधिकार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या अधिनियमानुसार असतील. |
| ९ | दलित वस्तीच्या कामाचे नियंत्रण | कामावर प्राथमिक नियंत्रण पंचायत समितीचे गट विकास अधिकारी ,संबधित उप अभियंता व जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता यांचेकडे राहील. कामाची निवड प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही व निधी वितरण प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सप्टेंबर महिना अखेर पुर्ण व्हावी व शक्यतो कामे त्याच आर्थिक वर्षात पूर्ण व्हावीत. कोणत्याही परिस्थितीत कामे मंजुर केल्यापासून एक वर्षाच्या आंत संबंधित ग्रामसेवकाच्या सहाय्याने ग्रामपंचायतीमार्फत पुर्ण करण्याची जबाबदारी त्या त्या तालुक्याच्या गट विकास अधिकाऱ्याची राहील. गावातील काम अपूर्ण राहिल्यास, त्या ग्राम पंचायतीला पुढील २ वर्षाकरिता निधी देण्यात येऊ नये. |
| १० | दलित वस्ती निधी वाटप करतानाचा प्राधान्यक्रम | या योजने अंतर्गत कामे घेताना खालीलप्रमाणे प्राधान्यक्रम यावा:-<br>- गावांतील ज्या वस्त्यांना अद्यापी काहीच लाभ दिला नाही अशा वस्त्या.<br>- जादा अनुदानाचा लाभ देणे बाकी आहे अशा वस्त्या<br>- एकदा लाभ दिलेल्या वस्त्या व<br>- दोनदा लाभ दिलेल्या वस्त्या<br>बऱ्याच वेळा लोकप्रतिनिधी एकाच गावांला किंवा वस्तीला सलग वर्षात लाभ मिळावा यासाठी आग्रही असतात. त्यामुळे प्राधान्य क्रमाने गावांना/वस्त्यांना लाभ देता येत नाही. याकरिता वरील प्रमाणे प्राधान्य क्रमानेच कामे करावीत. |
| | | प्राधान्य क्रम देणेसाठी गट विकास अधिकारी यांनी त्यांच्या तालुक्यातील सर्व गावांची प्राधान्य क्रमाने यादी तयार करुन जिल्हा कार्यालयास सादर करावी व त्यानुसारच परिपुर्ण प्रस्ताव कार्यालयास सादर करावेत. |

| अ.क्र. | मुद्दा | बदल |
|---|---|---|
| | | या योजनेअंतर्गत घेण्यात येणा-या कामांसाठी निधीचे वाटप करताना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या साहाय्याने तालुकानिहाय अनुसुचीत जाती /नवबौध्द घटकांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात करावे. |
| ११ | दलित वस्ती निधी वितरित करावयाची कार्यपद्धती | ज्या कामांना मंजुरी दिली आहे त्या कामांचा ९० टक्के निधी गट विकास अधिका-यांना वितरित करावा. ग्रामपंचायतीला उपलब्ध करुन दिलेली रक्कम ग्राम सेवक व गट विकास अधिकारी यांच्या संयुक्त खात्यामध्ये ठेवावी. काम सुरु करण्यापूर्वी २५% रक्कम प्रथम अदा करावी व तद्नंतर प्रत्यक्षात पुर्ण झालेल्या कामाचे मूल्यांकन करुन त्या त्या प्रमाणात रक्कम अदा करावी. उदा. २५%,५०% व ७५%. ९०% रक्कम अदा केल्यानंतर जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी कामाची पाहणी करुन १००% काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतर उर्वरित १०% रक्कम ग्रामपंचायतीस अदा करावी. |
| १२ | कामे देण्याबाबतच्या सूचना | दलित वस्तीतील कामे करण्यासाठी ग्रामपंचायतीकडून अनुसुचीत जाती /नवबौध्द घटकांतील सुशिक्षित बेरोजगार अभियंते तसेच अनुसुचीत जाती /नवबौध्द घटकांचे लोक सदस्य असलेल्या मजूर सोसायटयांची निवड करण्यात यावी. |

सुनीपिसाळे

*****

(परिशिष्ट क्र. ६.२)

दलित वस्ती सुधारणा योजना
अनुदानाच्या रकमेमध्ये वाढ करण्याबाबत...

समाज कल्याण विभाग
क्रमांक: १४०३६
का. अ.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक :दवसू-२००८/प्र.क्र.५२४/विघयो-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १४ नोव्हेंबर, २००८.

संदर्भ :- १) शासन निर्णय, सा.न्या.सां.का. क्री.व प.क्र.दवसु-१०९८/
प्र.क्र.३५३/मावक-२, दि.४.३.१९९९.
२) शासन पत्र, सा.न्या.सां.का. क्री.व प.क्र.दवसु-२०००/
प्र.क्र.१०७/मावक-२, दि.२२.१.२०००.

**प्रस्तावना :-** संदर्भाधिन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये दलित वस्ती सुधारणा या योजनेचा एक भाग म्हणून ग्रामीण व शहरी भागांमधील दलित वस्त्यांमधील अनुसूचित जातीच्या मुलभूत गरजा भागविण्यासाठी प्रत्येक दलित वस्तीला सन १९९९ पासून रु.५,००,०००/- इतके अनुदान मंजूर करण्यात येत होते. या योजनेंतर्गत घेण्यात येणारे बांधकाम उदा.जोडरस्ते, गटारे (बांधकाम, पाणी पुरवठा, विहीरींची दुरुस्ती, वीज पुरवठा व समाज मंदीर इ.बांधकामांच्या खर्चाची किंमत दिवसेंदिवस वाढत चालल्यामुळे तसेच या योजनेची लोकप्रियता लक्षात घेता, या योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या अनुदानामध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता यापुर्वीचे सर्व शासन निर्णय, परिपत्रके अधिक्रमीत करुन खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

**शासन निर्णय :-** शासनाने या योजनेच्या सर्व बाबींचा सखोल विचार करुन दलित वस्ती सुधारण्यासाठी लोकसंख्येच्या निकषानुसार जास्तीत जास्त रु.१०,००,०००/- (रुपये दहा लाख फक्त) अनुदान देण्याबाबत परिशिष्ट-"अ" मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार प्रत्येक दलित वस्तीला लोकसंख्येच्या प्रमाणात पुढीलप्रमाणे अनुदानाच्या रकमेत वाढ करण्यास शासन मंजूरी देत आहे :-

| अ.क्र. | लोकसंख्या | अनुदान रक्कम (रुपये लाखात) |
|---|---|---|
| १ | ५० ते १०० पर्यंत | ४.०० |
| २ | १०१ ते १५० पर्यंत | ६.०० |
| ३ | १५१ ते पुढे | १०.०० |

२. ही योजना दि.१४.११.२००८ पासून अंमलात येईल.

G.R.I...lwp/RASHMI
रोटे T/एच-२४१०[ १०००-१२-२००८ ]-१

३. दलित वस्ती सुधारणा योजनेंतर्गत करण्यात येणारे बांधकाम, ग्रामपंचायत व पंचायत समितीच्या मदतीने करण्यात यावे. संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. [illegible] यासाठी [illegible] खर्च "२२२५ अनुसूचित जाती [illegible] व इतर मागासवर्ग यांचे कल्याण, ०१-अनुसूचित जातींचे कल्याण, ८००-इतर खर्च, पंचवार्षिक [illegible] योजना, राज्य योजनांतर्गत योजना (०६)(०२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम १८७ अन्वये जिल्हा परिषदांना अनुदाने - दलित वस्त्यांची सुधारणा (२२२५ [illegible]) (कार्यक्रम [illegible] समायोज्य) ३१- सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येऊन हा खर्च यासाठी प्रतिवर्षी करण्यात येणाऱ्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय हा ग्रामीण दलित वस्त्यांसाठी असून नागरी दलित वस्त्यांसाठी नग विभागामार्फत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेब साईटवर उपलब्ध करुन देण्यात आला अ संगणक सांकेतांक २००८१२०५१५१६०००००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(एन.आरुमुगम)
सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

प्रत,
संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
सह संचालक, अनुसूचित जाती उप योजना, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व विभागीय समाज कल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी
सर्व समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
वित्त विभाग, (का-अर्थ-७/व्यय-१४), मंत्रालय, मुंबई
ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
सह सचिव /उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, सा.न्या.व वि.स.वि., मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती-का-विघयो-१

सचिव,नगर विकास विभाग यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त अनुदानाच्या रकमेतील वाढ लक्षा घेऊन नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करावा.

C:\RT..\wp\RASHMI
रब-२४१० -२३

परिशिष्ट-अ

शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक:दवसु-२००८/प्र.क्र.२४/ विघयो-१, दि.१४.११.२००८.

दलित वस्ती सुधारणा योजनेंतर्गत अनुदानाच्या रकमेमध्ये वाढ करण्याबाबत.

१) सन २००१ च्या जनगणनेनुसार प्रत्येक गावातील दलित वस्तीची / वस्त्यांची लोकसंख्या किती आहे, हे विचारात घेऊन, ती वस्ती / वस्त्या दलित वस्त्या म्हणून घोषित करणारा ठराव ग्रामपंचायतीने मान्य करुन तो गटविकास अधिकाऱ्यामार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे सादर करावा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दलित वस्ती घोषित करावी व त्याच्या प्रती जिल्हाधिकारी, विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी व संचालक, समाज कल्याण, पुणे यांना पाठवाव्यात. एकदा घोषित झाल्यानंतर ५ वर्षे त्यामध्ये बदल करता येणार नाही.

२) विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यातील वरीलप्रमाणे घोषित केलेल्या सर्व दलित वस्त्यांना स्वतंत्र सांकेतांक देऊन त्यांची यादी तयार करावी.

३) दलित वस्तीला स्वतंत्र सांकेतांक देताना परिशिष्ट "ब" मधील जिल्हा व तालुक्याच्या यादीतील सांकेतांक देऊन दलित वस्तीचा क्रमांक पुढे जोडावा. उदा.जिल्हा उस्मानाबाद, तालुका वाशी मधील एका गावातील "डॉ.बाबासाहेब आंबेडकरनगर" या दलित वस्तीचा "००१" असा क्रमांक असेल तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरनगर या दलितवस्तीचा सांकेतांक "२३-०८-००१" असा असेल. (जिल्ह्याचा व तालुक्याचा सांकेतांक प्रत्येकी दोन अंकी व दलित वस्तीचा सांकेतांक प्रत्येकी तीन अंकी असावा.)

४) दलित वस्तीला लोकसंख्येच्या निकषानुसार पूर्ण अनुदानाचा एकदा लाभ दिल्यानंतर पुन्हा ५ वर्षे त्या दलित वस्तीला या योजनेचा लाभ देण्यात येऊ नये. उदा.८० लोकसंख्या असलेली दलित वस्ती रु.४.०० लाख अनुदानास पात्र आहे. अशा वस्तीला पहिल्या वर्षी (२००८-०९) रु.२.०० लाख व दुसऱ्या वर्षी (२००९-१०) रु.२.०० लाख मिळतील. त्यानंतर सलग ५ वर्षे त्या वस्तीला अनुदान मिळणार नाही.

५) दलित वस्ती सुधार योजना ही जिल्हास्तरीय योजना असल्याने यासाठी अतिरीक्त निधी राज्यस्तरीय नियतव्ययातून देता येणार नाही. खास बाब म्हणून जास्तीचा निधी मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येऊ नये.

६) विभागीय समाज कल्याण अधिकारी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी व समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचे दलित वस्ती सुधारणेच्या कामावर प्रत्यक्ष नियंत्रण राहील व ते आपल्या कामाच्या प्रगतीचा अहवाल समाज कल्याण संचालनालय व शासनास सादर करतील.

७) दलित वस्तींची विकास कामे घेण्यापूर्वी त्या वस्तीचा विकास कामनिहाय बृहत्त आराखडा (Master Plan) तयार करावा. या आराखड्यांमध्ये मलनिस्सारण, वीज, पोचरस्ते, अंतर्गत रस्ते तसेच पर्जन्य पाण्याचा निचरा यासारख्या पायाभूत सुविधा आणि समाज मंदीरासारख्या सामाजिक बाबी दर्शविण्यात याव्यात. सदर बृहत आराखडा स्थानिक परिस्थिती व गरजा लक्षात घेऊन ग्रामपंचायतीने ठरवावा व तो पंचायत समितीचे कनिष्ठ अभियंता यांनी तयार करावा व त्यास विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्याची मान्यता घ्यावी.

८) फक्त १०० मीटर लांबीच्या पोच रस्त्यांना मान्यता देण्यात यावी. "दलित वस्तींना जोडणारा रस्ता" असे काम मंजूर करताना दलित वस्तीपासून गावाकडे जाणारा रस्ता जास्तीत जास्त १०० मीटर लांबीचा असावा. यापेक्षा जास्त लांबीच्या रस्त्यांची कामे या योजनेतून घेण्यात येऊ नयेत.

९) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांनी जिल्ह्यामधील सर्व दलित वस्त्यांच्या बृहत आराखडयांचे पुस्तक तयार करावे व दरवर्षी ऑक्टोबरमध्ये त्यासाठीच्या तरतुदींचा प्रस्ताव सादर करावा. तसेच एप्रिल महिन्यात मागील वर्षात किती कामे झाली याचा अहवाल परिशिष्ट "क" मधील विवरणपत्राने भरुन पाठवावा.

१०) गट विकास अधिकाऱ्याने कामे सुरु करण्यापूर्वी तेथील परिसराची छायाचित्रे घ्यावीत. काम पूर्ण झाल्यानंतर त्या परिसराची पुन्हा छायाचित्रे घ्यावीत व त्याच्या प्रती संचालक, समाज कल्याण, पुणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्याकडे पाठवाव्यात. यासाठी लागणारा खर्च योजनेच्या अनुदानातूनच करावा.

११) बृहत्त आराखडा राबविताना मल निस्सारणाची कामे आधी घ्यावीत. रस्त्यांची कामे हाती घेताना पर्जन्य जलव्यवस्थापनाचा विचार करण्यात यावा. पाणी पुरवठ्याकरीता मुख्य पाण्याच्या टाकीपासून किंवा पाण्याच्या साठ्यापासून दलित वस्तीतील नळापर्यंत (हातपंप) (Stand Post) पाईपलाईन टाकण्यासाठी तरतूद करता येईल.

१२) काम पूर्ण झाल्यानंतर त्या ठिकाणी" हे काम सामाजिक न्याय विभागाच्या अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत पूर्ण करण्यात आले आहे." असे वाक्य कोनशिलेवर कोरुन ती बसविण्यात यावी. तसेच कोनशीलेवर कंत्राटदाराचे नाव व काम पूर्ण केल्याचा दिनांक हे देखील कोरण्यात यावे.

१३) संचालक, समाज कल्याण, पुणे यांनी या योजनेअंतर्गत होणाऱ्या कामांची तपासणी त्याच जिल्ह्याच्या विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यामार्फत न करता दुसऱ्या जिल्ह्याच्या विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्याकडून करुन घ्यावी तसेच ५% वस्त्यांमधील कामांची तपासणी संचालक, समाज कल्याण, पुणे यांच्यामार्फत व २% वस्त्यांमधील कामांची तपासणी शासन स्तरावर करण्यात यावी.

१४) एका महसूली गावामध्ये जर एकापेक्षा जास्त दलित वस्त्या असतील तर दलित वस्ती या आवश्यकतेनुसार कामे मंजूर करावीत. मात्र जातीय ऐक्यासाठी समाजमंदीर एकच असावे व ते सर्व दलित वस्त्यांना लाभ देता येईल, अशा मोक्याच्या ठिकाणी असावे.

G.R1 lwp/RASHMI
एच-२४१० २३

१५) वाचनालयाचे काम गावातील गरजू व्यक्तीस पाहण्यास ग्रामपंचायतीने सांगावे व त्याच्या मानधनावरील खर्च स्वतःच्या उत्पन्नातून करावा.

१६) समाज मंदीराची देखभाल ग्रामपंचायतीने करावी. भविष्यात यावरील दुरुस्ती व देखभालीचा कोणताही खर्च शासनाकडून मिळणार नाही.

१७) संचालक, समाज कल्याण, पुणे यांनी अनुदान समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फत ग्रामपंचायतीस द्यावे. सदर अनुदान ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांच्या नावे बँकेचे संयुक्त खाते उघडून त्यात ठेवावे.

१८) शासन निर्णय, दि.४.३.१९९९ अन्वये ज्या दलित वस्त्यांना अनुदान मंजूर झाले आहे अशा वस्त्यांना फरकाचे अनुदान मंजूर करावे.असे प्रस्ताव मंजूर करताना जिल्ह्यातील सर्व दलित वस्त्यांना दलित वस्ती सुधार योजनेचा लाभ दिला गेला असला पाहिजे.

----------

G.R.(.)wp/RASHMI
[illegible]-२४१०[ १००० -[illegible]-२००[illegible]]-[illegible]

**ग्रामपंचायतीच्या विकास कामांबाबत**

(परिशिष्ट क्र. ७.१)

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२००८/प्र.क्र.४७२/वित्त-९(३३)
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ९ फेब्रुवारी,२००९

वाचा - १) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांकः झेडपीए-२०००/ प्र.क्र.१८/३३, दिनांक २ मे २०००.
२) शासन आदेश, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांकः झेडपीए-२०००/ प्र.क्र.१८/३३, दिनांक १९ जानेवारी २००१.
३) शासन अधिसूचना, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रः झेडपीए-२०००/ प्र.क्र.१८-अ/३३, दिनांक १९ मार्च २००४.
४) शासन आदेश, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांकः झेडपीए-२०००/ प्र.क्र.१८/३३, दिनांक ३० जून,२००४.
५) शासन निर्णय,सार्वजनिक बांधकाम विभाग,क्रमांकःसीएटी०७/०६/प्र.क्र.९४/इमा-२, दिनांक १६/११/२००६
६) शासन निर्णय,सार्वजनिक बांधकाम विभाग,क्रमांकःसीएटी०१/०६/प्र.क्र.१४१/इमा-२, दिनांक ८/२/२००७.

**प्रस्तावाना -** ७३व्या घटना दुरुस्तीनुसार ग्रामपंचायत संस्थांचे बळकटीकरण करण्याचे धोरण शासनाने स्विकारले आहे. ग्राम पंचायतींना जादा अधिकार देणे, ग्राम पंचायतींचे सर्वार्थाने बळकटीकरण करणे व ग्राम पंचायतींना आर्थिक दृष्टया सक्षम करणे या शासनाच्या धोरणाच्या अनुषंगाने ग्रामपंचायतीच्या हद्दीतील कामे, ग्रामपंचायतींना करण्यासाठी दिल्यास, कांमाना गती येते, कामे अधिक चांगली होतात व ग्रामपंचायत निधीमध्येही भर पडतो, हे लक्षात घेवून संदर्भ क्रमांक ४ मधील शासन निर्णयात ग्रामपंचायतींना कामे देण्याची वित्तीय मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने संदर्भ क्रमांक ५ अन्वये मजूर सहकारी संस्थांच्या कामाच्यासवलतीत वाढ करून रू. ५ लक्ष वरून रू.१५ लक्ष (वर्षभरात रू.५० लक्षपर्यंतची )केलेली आहे. तसेच संदर्भ क्रमांक ६ अन्वये सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंत्यांनाही देण्यात येणा-या सवलतीत वाढ करून त्यांना वर्ग६ ऐवजी वर्ग-५ मध्ये समाविष्ट करून ,त्यांनाही विना निविदा देण्यात येणा-या कामाची कमाल मर्यादा रू.१५ लक्ष (वर्षभरात रू.६० लक्षपर्यंतची कामे ) केलेली आहे. याच धर्तीवर ग्रामपंचायतींनाही विनानिविदा देण्यात येणा-या कामाची मर्यादा रू. १० लक्षावरून १५लक्ष करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे. याबाबत पुढील प्रमाणे सुधारीत आदेश देण्यात येत आहेत.

**शासन निर्णय :-**

संदर्भाधीन क्रमांक ३ येथील अधिसूचने अन्वये दिलेल्या मर्यादा खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहेत.

(१) **रु.५०,०००/**-पर्यंत उत्पन्न वार्षिक उत्पन्न असणा-या ग्रामपंचायतींना **रु.१०,००,०००/-**

(२) **रु.५०,००१/**-च्या पुढे उत्पन्न असणा-या ग्रामपंचायतींना **रु.१५,००,०००/-**

उपरोक्त मर्यादेपर्यंत वार्षिक उत्पन्न असणा-या ग्राम पंचायतीला, जिल्हा परिषदेमार्फत विकास कामे खालील अटीच्या अधिन राहून देण्यात यावी.

१) कोणत्याही पंचायतीने दुस-या पंचायतीचे कामे करू नयेत.

२) पंचायतीनी त्यांच्या गावठाणातील विकास कामे करावीत.

३) गावाशी निगडीत असलेली कामे उदा. शाळा खोल्या,समाज मंदीरे, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे यासारखी कामे गावठाणा बाहेर असली तरीही पंचायतीनी करावीत.

४) रस्त्याची कामे देताना त्या कामसाठीची अवजारे किंवा यंत्रे असतील तरच अशी कामे ग्राम पंचायतींना देण्यात यावीत. वा जर ग्राम पंचायती अशी अवजारे व यंत्रे भाडयाने घेऊ शकत असतील तर त्यांना रस्त्याची कामे देण्यात यावी.

५) तांत्रिक सल्ला जिल्हा परिषद/पंचायत समिती /व ग्राम पंचायत स्तरावरील अभियंत्यांचा घेण्यात यावा. संबंधित ग्राम पंचायत ज्या पंचायत समिती/ उपविभागाच्या कक्षेत येते त्या शाखा अभियंता /उप अभियंता, व कार्यकारी अभियंता यांनी प्रचलित नियमाप्रमाणे तांत्रिक दृष्टया काम पहावे. व त्याची अभिलेख नोंदणी करणे, देयक तयार करणे अशी अनुषंगीक कामे करावित.

६) ज्या ग्राम पंचायतीकडे अवजारे व यंत्रे नसतील वा भाडयाने घेणे शक्य नसतील तर अशा ग्राम पंचायतीनी उत्पन्नाच्या उपरोक्त अटीप्रमाणे कामे घेतल्यास, **सदरचे काम त्यांनी मजूर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंते,बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्था व स्थानिक मक्तेदारांकडून जाहिर निविदा मागवून विहित पध्दतीनुसार करून घ्यावे. हया कामाची गुणवता व संनियंत्रण याची पूर्ण जबाबदारी ग्राम पंचायतीची राहील.**

७) त्यास तांत्रिक व देयकाची मोजमापे इत्यादी कामे प्रचलित नियमाप्रमाणे जिल्हा परिषदेचे शाखा अभियंता/उप अभियंता व कार्यकारी अभियंता हे पाहतील.

८) सदरील कामास सक्षम अधिकारी/ समिती यांची प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता घेण्यात यावी.

९) ग्रामपंचायत प्रत्येक ग्रामसभेमध्ये ग्रामपंचायतींने केलेल्या कामाची संपूर्ण माहिती सादर करील.

१०) जिल्हा परिषदेने सर्व ग्राम पंचायतींना सक्त सूचना दयावी की, विविध प्रकल्पातून किंवा योजनेतून घेतलेल्या कामाची यादी न चुकता ग्रामपंचायत कार्यालयातील फलकावर लावली पाहिजे.

११) ग्राम पंचायतींना कामे देणे, व ती मंजूर करणे याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील परिशिष्ट-८ मधील अटी व शर्तींचे पालन करावे.

CR-472.lwp

यासंदर्भात महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता, १९६८ मध्ये योग्य ती दुरुस्ती यथावकाश करण्यात येईल. या बदलाचा परिणाम उक्त नियमांतील भाग २, नियम १५ खालील उप नियम (१) मधील कलम (iii) मध्येही अंर्तभूत करण्यात आल्याचे समजण्यात यावे.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलबध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक **२००९०२०९१२४७३८००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( एकनाथ मोरे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
महालेखाकार ( लेखा व अनुज्ञेयता ) / ( लेखा व परिक्षा ) महाराष्ट्र-१, मुंबई.
महालेखाकार ( लेखा व अनुज्ञेयता ) / ( लेखा व परिक्षा ) महाराष्ट्र-२, नागपूर.
वित्त विभाग,व्यय-१५ व अर्थसंकल्प-१९.
सर्व विभागीय आयुक्त ( विकास शाखा ),
मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा कोकण भवन, नवी मुंबई
उप मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा नवी मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,नागपूर,अमरावती.
सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व जिल्हा लेखा परिक्षक अधिकारी ,स्थानिक निधी लेखा,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,का.क्र. आस्था ४, ६, ८,
निवड नस्ती, कार्यासन क्रमांक वित्त-९.

(परिशिष्ट क्र. ७.२)

ग्राम पंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषदे अंतर्गत, बांधकाम विभागामार्फत करावयाच्या वेगवेगळ्या कामाच्या दर्जा व गुणवत्ते संदर्भात.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग ,
शासन निर्णय क्र.विकास-२०११/प्र.क्र.२१७ /पं.रा.८
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- १५ नोव्हेंबर, २०११.

वाचा : १) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.झेडपीए-२००८/ प्र.क्र.४७२/ वित्त-९(३३),दि.०९.०२.२००९.

२) शासन निर्णय,ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.झेडपीए २००८/ प्र.क्र.४४४/ वित्त-९, दि.१५.०७.२००८.

३) शासन परिपत्रक ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.तेविआ २०१०/प्र.क्र.७३/वित्त-४,दिनांक ८.१२.२०१०

शासन निर्णय :-

ग्राम पंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनेच्या अनुषंगाने करावयाच्या बांधकामाचा कामाचा दर्जा व गुणवत्ता राखण्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

(१) वेगवेगळ्या योजनेतंर्गत मंजूर झालेली कामे गावाच्या विकासाशी संबंधित असल्याने सदर कामे शासन निर्णय क्र.झेडपीए २००८/प्र.क्र.४७२/ वित्त-९(३३), दिनांक ९.२.२००९ अन्वये दिलेल्या सूचना व घालून दिलेल्या कार्यपध्दतीनुसार ग्रामपंचायतीमार्फत करण्यात यावीत.तसेच ग्रामपंचायतीची सदर मर्यादा ज्या-ज्या वेळी सुधारित करण्यात येईल त्या सुधारित मर्यादेनुसार ग्रामपंचायतीमार्फत कामे करण्यात येतील. कामावर संपूर्ण नियंत्रण संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे राहील. सदर सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी होईल याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

(२) कामांचा दर्जा व गुणवत्ता ही शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मानकाप्रमाणे असावीत. ती तशी नसल्यास ग्रामपंचायतीचे सरपंच,ग्रामसेवक व कंत्राटदार यांना सामुहिक व वैयक्तिकरित्या जबाबदार धरण्यात येईल.

(३) सदर योजनेसाठी गावातील योजनेतंर्गत कार्यक्रमाची अंमलबजावणी तांत्रिकदृष्टया सक्षम व परिणामकारक व्हावी यासाठी संदर्भाधीन क्र.३ वरील दिनांक ८.१२.२०१० च्या शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार ग्रामपंचायत स्तरावर कनिष्ठ अभियंता नेमण्याची कार्यवाही करण्यात यावी.

अथवा.

सदर योजनेसाठी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या धर्तीवर गावातील वर नमूद केलेल्या कामांचे प्रकल्प चित्र करणे,सर्व्हे करणे,तंत्रज्ञान इत्यादीसाठी सल्ला देण्याकरिता तांत्रिक पॅनल खालीलप्रमाणे गठित करण्यात यावे :-

(अ) प्रत्येक पंचायत समिती स्तरावर साधारणत: दहा ग्रामपंचायतीसाठी एक याप्रमाणे ग्रामपंचायतींना तांत्रिक सहाय्यासाठी अभियत्यांचे पॅनल मुख्य कार्यकारी अधिकारी, यांचेकडून पारदर्शक पध्दतीचा अवलंब करुन तयार करण्यात यावे.सदर पॅनेलवरील अभियंत्यांचे सहाय्य ग्रामपंचायतींना तांत्रिक सेवा उपलब्ध करुन घेता येईल. (प्लॅन इस्टिमेट तयार करणे, ग्रामपंचायतीचे वतीने तांत्रिक संनियंत्रण करणे,ग्रामपंचायतीने काम बाहेरील कंत्राटदारांना दिले तर त्यांचे कामावर ग्रामपंचायतीच्या वतीने तपासणी करणे इ.) त्यांना आवश्यक शुल्क मुख्य कार्यकारी अधिकारी ठरवून देतील त्या दराने ग्रामपंचायतींनी अदा करावे यासाठी ग्रामपंचायती व संबंधित अभियंता यांनी करार करावा.कराराचे नुतनीकरण प्रत्येक वर्षी करण्यात येईल.

(ब) या पॅनलमध्ये स्थापत्य अभियंता हा किमान पदविका धारण करणारा असावा व त्यास क्षेत्रिय कामाचा अनुभव असावा. अभियंता पॅनलची निवड जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, व कार्यकारी अभियंता (बांधकाम) हे एकत्रितपणे व जाहिरात देवून करतील.

(क) सदर पॅनलकडून प्रत्येक दहा ग्रामपंचायतींसाठी एक अशा नेमलेल्या तांत्रिक कामाचे अन्वेषण करणे,सर्वेक्षण करणे,अंदाजपत्रक तयार करणे,कामांची तांत्रिक मान्यता सक्षम अधिकाऱ्यांकडून प्राप्त करुन घेणे, कामांचे क्षेत्रिय स्तरावर रेखांकन करणे, तांत्रिक मार्गदर्शन करणे,मजूरांना कामांची आखणी करुन देणे, कामांचे मूल्यांकन करणे, मोजमाप पुस्तिकेत मापे नोंदविणे,कामाच्या पूर्णत्वाची कार्यवाही करणे इत्यादी कामे करावी लागतील.

(ड) सदर पॅनल गट विकास अधिकारी यांच्या अधिपत्याखाली पंचायत समितीमध्ये काम करतील.

(इ) वरीलप्रमाणे नियुक्त केलेल्या तांत्रिक सहाय्यकांना कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १% (एक टक्का) या दराने कामाचा मोबदला देण्यात यावा व ही रक्कम कामाच्या अंदाजपत्रकामध्ये अंतर्भूत करावी.

(४) ग्रामपंचायतीने करावयाची कामे सुध्दा जर त्याची किंमत ५ लाखाचेवर असेल व ती कंत्राटदाराकडून करुन घेणार असल्यास ई- निविदा मागवूनच कामे करावी लागतील. जिल्हा परिषदेकडील यादीतील कंत्राटदारांकडून कामे करुन घेता येतील.तसेच ग्रामपंचायत स्वत: काम करणार असल्यास व कंत्राटदार नेमणार नसल्यास खरेदी करावयाच्या मटेरियलच्या प्रत्येक बाबीसाठी जर Procurement ची किंमत रु.१ लाखा पेक्षा जास्त असल्यास खरेदी ई- निविदेद्वारे करावी.त्यापेक्षा कमी किंमतीची सामग्री किमान तीन कोटेशन मागवुन व ISI प्रतिची खरेदी करावी.

(५) (अ) सदर योजनेंतर्गत होणारी कामे चांगल्या दर्जाची व टिकाऊ व्हावीत यासाठी सध्या प्रधानमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत कार्यान्वित असलेल्या राज्य गुणवत्ता समन्वयक (SQC) यांचे अधिपत्याखालील पॅनेलवरील राज्य गुणवत्ता नियंत्रक (SQM) यांचेकडून संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कामांची तपासणी करुन घ्यावी.यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी राज्य गुणवत्ता समन्वयक (SQC) यांचेकडून आवश्यकतेनुसार यादी घ्यावी व त्याप्रमाणे वाटप करावे. यासाठी अंदाजपत्रकीय रकमेच्या १% (एक टक्का) या दराने मोबदला देण्यात यावा व ही रक्कम कामाच्या अंदाजपत्रकामध्ये अंतर्भूत करावी. सदर यंत्रणेकडून कामाच्या विविध टप्प्यावर तपासणी करण्यात येईल. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनीही अचानकपणे यापैकी कोणत्याही कामाची तपासणी करावी.

(ब) वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्यानुसार कामाची तपासणी करताना सदर कामे अंदाजपत्रकाप्रमाणे करण्यात येत आहेत याची संबंधितांनी खात्री करावी. तसेच आवश्यकता भासल्यास कामांच्या नमुन्यांची प्रयोगशाळेतही चाचणी करता येईल.

(क) वरीलप्रमाणे ठरलेल्या टप्प्यानुसार या यंत्रणेकडून गुणवत्ता तपासणी होवून कामाचे दर्जाबाबत प्रमाणित केल्याशिवाय कंत्राटदारांची बिले अदा करता येणार नाहीत.तपासणी यंत्रणेने तपासणी केलेल्या कामांबाबतचे अहवाल संबधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात येतील व सदर अहवालांची तपासणी झाल्यानंतर संबंधित कामांची देयके मंजूर करण्यात येतील.

(ड) सदर कामांबाबत जनतेच्या तक्रारी उद्‌भवल्यास संबंधित जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समक्ष जागेवर तक्रारीची शहानिशा करावी किंवा स्वतंत्र गुणवत्ता नियंत्रकाकडून फेरतपासणी करावी. जर कामाचा दर्जा निकृष्ट आढळून आल्यास संबंधित तपासणी यंत्रणा जबाबदार राहील.

(६) वर परिच्छेद ३ (ई) मध्ये नमूद केलेली १% रक्कम व ५ (अ) येथे नमूद केलेली १% रक्कम या दोन्ही रकमा संबंधित कामाच्या अंदाजपत्रकामध्ये अंतर्भूत असतील व या रकमा शासन स्तरावरुन प्रत्येक कामासाठी मंजूर होणाऱ्या निधीमध्ये समाविष्ट असतील. कोणत्याही परिस्थितीत शासन स्तरावरुन प्रत्येक कामासाठी मंजूर केलेल्या निधीपेक्षा जास्त रक्कम देय होणार नाही.

७) सर्व कामे मुदतीमध्ये पूर्ण होतील यादृष्टीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नियंत्रण ठेवावे व कामाचे पुर्णत्त्वाचे दाखले व उपयोगिता प्रमाणपत्र मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महालेखापाल, विभागीय आयुक्त व शासनास सादर करावेत.

२. ग्राम पंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेअंतर्गत बांधकामाच्या विविध कामासाठी राज्य शासनाने एक मार्गदर्शिका निर्गमित केलेली असून ती मार्गदर्शिका राज्य शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. त्याचा देखील आवश्यकतेनुसार वापर करण्यात यावा व कामाची देखरेख करताना ज्या सूचना दिलेल्या आहेत त्याचे काटेकोरपणे पालन करावे.

३. सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in वेबसाईटवर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा संगणक सांकेतांक क्र.२०१११११५०५४९४९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( दि.ग.मोरे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत -

मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
मा.विधानसभा / विधान परिषद सदस्य (सर्व), विधानमंडळ, मुंबई.
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई.
अतिरिक्त मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, नियोजन विभाग / वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
विभागीय आयुक्त (सर्व)
जिल्हाधिकारी, जिल्हा (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
मुख्य लेखा परीक्षक ,स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती.
सर्व सह सचिव / उप सचिव / विकाअ / अवर सचिव / कार्यासन अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
निवड नस्ती, का.क्र.पं.रा.८, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.

“

# परिशिष्ट (ब)
# समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**बुधवार, दिनांक १७ जानेवारी, २०१८**
**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, वाशिम**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(४) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
(५) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(६) श्री. तुकाराम काते, वि.स.स.
(७) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

**विशेष निमंत्रित सदस्य**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव
(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरिक्षा**

श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखा

**जिल्हा परिषद, पदाधिकारी**

(१) श्रीमती हर्षदा देशमुख, अध्यक्षा, जिल्हा परिषद, वाशिम
(२) श्री चंद्रकांत ठाकरे, उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, वाशिम
(३) श्रीमती छाया पाटील, सभापती, पंचायत समिती, रिसोड
(४) श्रीमती पानुबाई जाधव, सभापती, समाजकल्याण समिती, जिल्हा परिषद, वाशिम
(५) श्रीमती यमुनाबाई जाधव, सभापती, महिला व बालकल्याण समिती, जिल्हा परिषद, वाशिम
(६) श्री. विकास गवळी, सदस्य, जिल्हा परिषद, वाशिम
(७) श्रीमती ज्योती गणेशपुरे, सदस्या, जिल्हा परिषद, वाशिम
(८) श्रीमती धनश्री राठोड, सभापती, पंचायत समिती, मानोरा
(९) श्रीमती मंगलाताई गवई, सभापती, पंचायत समिती, मालेगांव
(१०) श्रीमती वर्षाताई नेमाने, सभापती, पंचायत समिती, कारंजा

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय**

(१) श्री. मनोज जाधव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय
(२) श्री. उत्तम कावडे, उप संचालक, (वित्त), ग्रामविकास विभाग, मंत्रालय

**विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती**

(१) श्री. राजाराम झेंडे, उप आयुक्त, (आस्थापना), आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग
(२) श्री. जी.एस. भगत, सहाय्यक आयुक्त, आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग

**जिल्हा परिषद, वाशिम**

(१) श्री. गणेश पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. संजय कापडणीस, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री. व्यंकट जोशी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(४) श्री. प्रमोद कापडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग)
(५) श्री. नितीन माने, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
(६) डॉ. डी.एस.सेलोकर, जिल्हा आरोग्य अधिकारी
(७) श्री. नरेंद्र बारापात्रे, प्रभारी कृषि विकास अधिकारी
(८) श्री. ए.एम. खान, प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग
(९) श्री. दिलीप इंगळे, प्रभारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी, बालकल्याण विभाग
(१०) श्री. अमोल यावलीकर, प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी
(११) श्री. अंबादास मानकर, प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
(१२) डॉ. ज्ञानेश्वर नागरे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
(१३) श्री. व्ही.बी.गहेरवार, कार्यकारी अभियंता, (बांधकाम विभाग)
(१४) श्री. मी.चु.उके, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग
(१५) डॉ. जे.पी.केंद्रे, प्रभारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
(१६) श्री. व्ही.एम.कोंडे, उप अभियंता (यांत्रिकी उप विभाग)
(१७) श्री. एस.आर.कोटकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगांव
(१८) श्री. सुरज गोहाड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मानोरा
(१९) श्री. ज्ञानेश्वर टाकरस, सहाय्यक गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मानोरा
(२०) श्री. एन.टी.खेटे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मंगरुळपीर
(२१) श्री. शिवशंकर भारसाकळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, रिसोड
(२२) श्री. डी.बी.पवार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कारंजा
(२३) श्री. आर.ओ.वाघ, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वाशिम
(२४) श्री. सुनील वायकर, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने वाशिम जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकार व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१२-२०१३ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील वाशिम जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक १८ जानेवारी, २०१९**
**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, वाशिम**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(४) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
(५) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(६) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(७) श्री. तुकाराम काते, वि.स.स.
(८) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(९) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(१०) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(११) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित सदस्य**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव
(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय**

(१) श्री. मनोज जाधव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय
(२) श्री. उत्तम कावडे, उप संचालक, (वित्त), ग्रामविकास विभाग, मंत्रालय

**विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती**

(१) श्री. राजाराम झेंडे, उप आयुक्त, (आस्थापना), आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग
(२) श्री. जी.एस. भगत, सहाय्यक आयुक्त, आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग

**जिल्हा परिषद, वाशिम**

(१) श्री. गणेश पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. संजय कापडणीस, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री. व्यंकट जोशी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(४) श्री. प्रमोद कापडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग)
(५) श्री. नितीन माने, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
(६) डॉ. डी.एस.सेलोकर, जिल्हा आरोग्य अधिकारी
(७) श्री. नरेंद्र बारापात्रे, प्रभारी कृषि विकास अधिकारी
(८) श्री. ए.एम. खान, प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग
(९) श्री. दिलीप इंगळे, प्रभारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी, बालकल्याण विभाग

(१०) श्री. अमोल यावलीकर, प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी
(११) श्री. अंबादास मानकर, प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
(१२) डॉ.ज्ञानेश्वर नागरे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
(१३) श्री. व्ही.बी.गहेरवार, कार्यकारी अभियंता, (बांधकाम विभाग)
(१४) श्री. मी.चु.उके, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग
(१५) डॉ.जे.पी.केंद्रे, प्रभारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
(१६) श्री. व्ही.एम.कोंडे, उप अभियंता (यांत्रिकी उप विभाग)
(१७) श्री. एस.आर.कोटकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगांव
(१८) श्री. सुरज गोहाड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मानोरा
(१९) श्री. ज्ञानेश्वर टाकरस, सहाय्यक गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मानोरा
(२०) श्री. एन.टी.खेटे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मंगरुळपीर
(२१) श्री. शिवशंकर भारसाकळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, रिसोड
(२२) श्री. डी.बी.पवार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कारंजा
(२३) श्री. आर.ओ.वाघ, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वाशिम
(२४) श्री. सुनील वायकर, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने वाशिम जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांची सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक-२ संदर्भात वाशिम जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक १९ जानेवारी, २०१८**
**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, वाशिम**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(४) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
(५) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(६) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(७) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

**विशेष निमंत्रित सदस्य**

(१) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री.विलास आठवले, उप सचिव
(२) श्री.प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरिक्षा**

श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखा

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय**

(१) श्री. मनोज जाधव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय
(२) श्री. उत्तम कावडे, उप संचालक, (वित्त), ग्रामविकास विभाग, मंत्रालय

**विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती**

(१) श्री. राजाराम झेंडे, उप आयुक्त, (आस्थापना), आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग
(२) श्री. जी.एस. भगत, सहाय्यक आयुक्त, आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग

**जिल्हा परिषद, वाशिम**

(१) श्री. गणेश पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. संजय कापडणीस, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री. व्यंकट जोशी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(४) श्री. प्रमोद कापडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग)
(५) श्री. नितीन माने, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
(६) डॉ.डी.एस.सेलोकर, जिल्हा आरोग्य अधिकारी
(७) श्री. नरेंद्र बारापात्रे, प्रभारी कृषि विकास अधिकारी
(८) श्री. ए.एम. खान, प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग
(९) श्री. दिलीप इंगळे, प्रभारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी, बालकल्याण विभाग
(१०) श्री. अमोल यावलीकर, प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी
(११) श्री. अंबादास मानकर, प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
(१२) डॉ.ज्ञानेश्वर नागरे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(शा.म.मु.) एचबी २५२४—१४ (४५०—६-२०१९)

(१३) श्री. व्ही.बी.गहेरवार, कार्यकारी अभियंता, (बांधकाम विभाग)

(१४) श्री. मी.चु.उके, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग

(१५) डॉ.जे.पी.केंद्रे, प्रभारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१६) श्री. व्ही.एम.कोंडे, उप अभियंता (यांत्रिकी उप विभाग)

(१७) श्री. एस.आर.कोटकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगांव

(१८) श्री. सुरज गोहाड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मानोरा

(१९) श्री. ज्ञानेश्वर टाकरस, सहाय्यक गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मानोरा

(२०) श्री. एन.टी.खेटे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मंगरुळपीर

(२१) श्री. शिवशंकर भारसाकळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, रिसोड

(२२) श्री. डी.बी.पवार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कारंजा

(२३) श्री. आर.ओ.वाघ, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वाशिम

(२४) श्री. सुनील वायकर, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने वाशिम जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१२-१३ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील वाशिम जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक २ जानेवारी, २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**विभागीय सचिव**

(१) श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. अनुप कुमार, प्रधान सचिव, कृषी व पदुम (पशुसंवर्धन) विभाग

(३) श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(४) श्री. एकनाथ डवले, सचिव, मृद व जलसंधारण विभाग

(५) श्रीमती विनिता वेद सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग

(६) डॉ. सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग

(७) श्री. फु.स.मेश्राम, सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग

(८) श्री. दिनेश डिंगळे, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(९) श्री. सु.नि.गावडे, सह सचिव, वने (भूसंपादन) विभाग

(१०) श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविका विभाग

(११) डॉ. प्रमोद शिंदे, उप सचिव, रोजगार हमी योजना विभाग

(१२) श्री. विजय चौधरी, उप सचिव, पशुसंवर्धन विभाग

(१३) डॉ. एस.एस.पंचपोर, अवर सचिव, पशुसंवर्धन विभाग

(१४) श्री. अ. प्र.अहिरे, अवर सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

**जिल्हा परिषद, वाशिम**

(१) श्री. दिपक कुमार मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम

(२) श्री. प्रमोद कापडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, वाशिम

(३) श्री. जी.व्ही.जोशी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम

(४) श्री. नितीन माने, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, वाशिम

(५) डॉ.आली आर खान, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम

(६) श्री. एन.एन.मोहुर्ले, महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम

(७) श्री. विजयसिंह गहेरवार, कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, वाशिम

(८) श्री. अभिषेक देशमुख, उपविभागीय अधिकारी, वाशिम

(९) श्री. जी.एस.डाहोरे, नायब तहसिलदार, वाशिम

(१०) श्री. सुनिल खमितकर, जि.रा.क.अ., जिल्हा परिषद, वाशिम

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २०१२-१३ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात वाशिम जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, कृषी व पदुम (पशुसंवर्धन) विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, सचिव, महिला व बालविकास विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सह सचिव, वने (भूसंपादन) विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, रोजगार हमी योजना विभाग, उप सचिव, पशुसंवर्धन विभाग, अवर सचिव, पशुसंवर्धन विभाग, अवर सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २२ जानेवारी, २०१९**
**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(३) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(४) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(५) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

(६) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.
(३) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का)
(२) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**विभागीय सचिव :**

(१) श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(३) श्री. चंद्रशेखर जोशी, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग

(४) श्री. सुभाष गावडे, सह सचिव, (भूसंपादन), महसूल व वन विभाग

(५) डॉ.प्रमोद शिंदे, उप सचिव, रोजगार हमी योजना

(६) श्री. विजयकुमार कलवले, सहाय्यक संचालक, मृद व जलसंधारण विभाग

(७) श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(८) श्री. बा.की.रासकर, उप सचिव, पशुसंवर्धन विभाग

(९) डॉ.एस.एस.पंचपोर, अवर सचिव, पशुसंवर्धन विभाग

(१०) श्री. अ.प्र.अहिरे, अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग

(११) श्री. नि.ग.सोनलसकर, कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग

**जिल्हा परिषद, वाशिम :**

(१) श्री. दीपक कुमार मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम
(२) श्री. प्रमोद कापडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग), जिल्हा परिषद, वाशिम

(३) श्री. नितीन माने, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, वाशिम
(४) श्री. व्ही.व्ही.जोशी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम
(५) श्री. नितीन मोहुर्ले, महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम
(६) श्री. सुभाष अवचार, कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम
(७) डॉ.आय.एस.खान, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम
(८) श्री. विजयसिंह गहेरवार, कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, वाशिम
(९) श्री. अंबादास मानकर, प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, वाशिम

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २०१२-१३ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात वाशिम जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, सह सचिव, (भूसंपादन), महसूल व वन विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, रोजगार हमी योजना, उप सचिव, पशुसंवर्धन विभाग, अवर सचिव, पशुसंवर्धन विभाग, अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, सहाय्यक संचालक, मृद व जलसंधारण विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम यांची उर्वरित साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९**
**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :-**

१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
३) ॲड.राहुल कुल, वि.स.स.
४) श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.
५) डॉ.सुरेश भाऊ खाडे, वि.स.स.
६) डॉ.सुधाकर भालेराव, वि.स.स.
७) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
८) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
९) श्री. तुकाराम काते, वि.स.स.
१०) श्री. भारत भालके, वि.स.स.
११) प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स.
१२) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.
१३) प्रा.डॉ.तानाजी सावंत, वि.प.स.

**विशेष निमंत्रित सदस्य :-**

१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.
३) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का)
श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

समितीने बैठकीत चोविसाव्या व पंचवीसाव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ दुरुस्त्यांसह संमत केले.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई